जळगाव

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६

आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६ पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६

जळगाव, सोमवार, १६ मार्च २०२६। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३२ । अंक : २१७। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८ +४ = १२। जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

### विचारपुष्प



भारतीय तत्त्वज्ञान हे एकात्मतेच्या जीवनदृष्टीवर आधारित आहे. निसर्गनिर्मित सगळ्या घटकांमध्ये सहअस्तित्वाची रचना आहे. सगळे पदार्थ एकमेकांस पूरक आहेत; परंतु निसर्गाचे हे देणे उपयोगात येत नाही. या अनैसर्गिक आणि अनाचारी अव्यवस्थेचे निराकरण करण्यासाठी आमच्या तत्त्वज्ञांनी एकात्मतेची जीवनदृष्टी दिली आहे. निसर्गाने मानवाला नवनिर्माण करण्याच्या क्षमतेचे वरदान दिले आहे. या वरदानामुळेच माणूस निसर्गाच्या साधनसामग्रीचा उपयोग करून जीवन अधिकाधिक सुखमय करतो आहे.

**भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# बिगुल वाजला

## आसाम, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, पुडुचेरीत विधानसभा निवडणुका घोषित

| राज्य | टप्पे | जागा | मतदार | मतदान |
|---|---|---|---|---|
| पश्चिम बंगाल | २ | २९४ | ६.४४ कोटी | २३ आणि २९ एप्रिल |
| तामिळनाडू | १ | २३४ | ५.६७ कोटी | २३ एप्रिल |
| केरळ | १ | १४० | २.७० कोटी | ९ एप्रिल |
| आसाम | १ | १२६ | २.५० कोटी | ९ एप्रिल |
| पुडुचेरी | १ | ३० | ९.४० लाख | ९ एप्रिल |

**४ मे रोजी होणार मतमोजणी**

◆ **नवी दिल्ली, १५ मार्च**

निवडणूक आयोगाने आसाम, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि केंद्रशासित प्रदेश पुडुचेरी येथे होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या तारखा रविवारी येथे झालेल्या पत्रपरिषदेत जाहीर केल्या. महाराष्ट्रातील राहुरी आणि बारामतीत २३ एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार आहे.

तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होईल. पश्चिम बंगालमध्ये मतदान दोन टप्प्यांत २३ एप्रिल आणि २९ एप्रिल रोजी पार पडेल. केरळ, आसाम आणि पुडुचेरी या तीन राज्यांमध्ये ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान घेण्यात येईल. या निवडणुकांचे निकाल ४ मे रोजी जाहीर केले जातील.

या चार राज्यांमध्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशात एकूण १७.४ कोटी मतदार आणि ८२४ जागांचा समावेश आहे, असे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

मागील १२ महिन्यांत निवडणूक आयोगाने पारदर्शकता वाढवण्यासाठी अनेक नवीन उपक्रम राबवले. यातील पहिला उपक्रम 'एसआयआर' हा होता. मतदारयादीत अपात्र व्यक्तीचे नाव राहणार नाही, अशी ही एक उपाययोजना आहे.

# संघाचा विस्तार म्हणजे राष्ट्रीय विचारांचा विस्तार

**रा. स्व. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांचे प्रतिपादन ● वसाहतवादी मानसिकतेतून मुक्तता आवश्यक**

◆ **समालखा (पानीपत), १५ मार्च**

संघाचा विस्तार म्हणजे राष्ट्रीय विचारांचा विस्तार आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी शनिवारी केले. रा. स्व संघाच्या अ. भा. प्रतिनिधी सभेची तीन दिवसीय बैठक संपन्न झाली. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.




अ. भा. प्रतिनिधी सभेची बैठक संघटनात्मक कार्याचा विस्तार करण्याचा, राष्ट्रहितासाठी समाजातील सज्जनशक्तींचा सहभाग वाढविण्याचा आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्याचा संकल्प करून संपन्न झाली. मागील वर्षभरात संघटनेच्या कार्यात लक्षणीय विस्तार झाला आहे. संघाच्या शाखांची संख्या वाढून ८८,००० झाली आहे. यात सुमारे ६,००० शाखांची वाढ झाली आहे, तर ज्या ठिकाणी या शाखा कार्यरत आहेत, अशा ठिकाणांची संख्याही वाढून ५५,००० पेक्षा जास्त झाली आहे. या व्यतिरिक्त साप्ताहिक मिलन आणि लहान गटांची संख्याही वाढली आहे. संघटनात्मक विस्ताराकडे या संदर्भात पाहणेही आवश्यक आहे की, संघाच्या शाखा आता अंदमान बेटे, अरुणाचल प्रदेश, लेह आणि दुर्गम आदिवासी भागांसारख्या प्रदेशांमध्ये कार्यरत आहेत. संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने आयोजित केल्या जात असलेल्या विविध कार्यक्रमांमध्येही हा संघटनात्मक विस्तार स्पष्टपणे दिसून येत आहे, असे दत्तात्रेय होसबळे यांनी सांगितले.

संघटनात्मक विस्तारासोबतच संघ समाजातील गुणवत्ता वाढवण्यासाठीही सातत्याने कार्यरत आहे, असे दत्तात्रेय होसबळे यांनी सांगितले. (पान ७ वर...)






## थोडक्यात महत्त्वाचे...



### मोटारसायकल चोरट्यास अवघ्या ४ तासांत अटक

**पाचोरा** : जामनेर रोडवरील राधास्वामी पेट्रोल पंप परिसरात मोटर सायकल चोरून नेल्याची घटना घडली होती. या बाबत शनिवारी पाचोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या ४ तासात सातगाव (डोंगरी) येथील मोटर सायकल चोरट्यास पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून चोरी गेलेली मोटर सायकल हस्तगत करण्यात आली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रशांत वाघ (वय-४२, रा. सातगांव डोंगरी, ता.पाचोरा) यांनी दि.१० मार्च रोजी ८.३७ वाजेच्या सुमारास जामनेर रोडवरील एका पेट्रोलपंपावर त्यांची मोटर सायकल क्र.(एम.एच.१९, बी.आर.४२११) पार्क केली होती. दरम्यान, अज्ञात चोरट्याने ती चोरुन नेली होती. याबाबत, पाचोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, भारत डेअरी बसस्टॉप परिसरात एक इसम हा त्याच्या ताब्यातील मोटार सायकलसह परीसराची टेहळणी करीत असल्याची माहिती पोलीस हेड कॉन्स्टेबल राहुल शिंपी, पोलीस कॉन्स्टेबल शरद पाटील यांना मिळाली होती. त्यानंतर त्यांनी या ठिकाणी धाव घेत त्या इसमा कारवाई केली. यावेळी तो चोरी झालेल्या दुचाकीवर आढळून आला. त्यानंतर त्याला पाचोरा पोलीस ठाणे येथे आणून त्याची चौकशी केल्यानंतर त्याने त्याचे नाव तुषार लक्ष्मण आघाडे (वय-२७, रा.सातगांव डोंगरी, ता.पाचोरा) असे असल्याचे सांगितले तसेच गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी जप्त करण्यात आली.

### जळगावात तरुणाला लाथाबुक्क्यांनी, तर तरुणीला चापटाबुक्क्यांनी मारहाण

**जळगाव** : गाडीला दुचाकीचा कट लागल्याच्या कारणावरुन तिघांनी तरुणाला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्याच्या सोबतच्या सहकारी तरुणीला चापटाबुक्क्यांनी संशयितांनी मारहाण केली. शुक्रवारी (१३ मार्च) सव्वानऊच्या सुमारास ही घटना शहरातील गेंदालाल मील परिसरात घडली. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मयुर रामसिंग दहीयेकर (वय २५,रा. कंजरवाडा, जाखनीनगर) या तरुणाच्या दुचाकीचा कट लागला या कारणावरुन तिघांनी त्याला मारहाण करत शिवीगाळ केली. हातातील कड्याने त्याच्या ओठांवर तोंडावर बुक्का मारत जखमी केले. आक्षेपार्ह शिवीगाळ केली. त्यानंतर तरुणा सोबत असलेल्या सहकारी तरुणीच्या डाव्या हाताला चापटाबुक्क्यांनी मारहाण केली. याप्रकरणी तक्रारीनुसार अरबाज, नाजीम, सोहेल (पूर्ण नाव माहित नाही) सर्व रा. गेंदालाल मील जळगाव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.पोलीस निरीक्षक सपागर शिंपी यांनी घटनास्थळी जावुन माहिती जाणुन घेतली. हवालदार प्रदीप पाटील हे गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

### संत गजानन महाराज मंदिराचा द्वितीय वर्धापन दिन उत्साहात

**जळगाव** : रायसोनी नगर येथे श्री संत गजानन महाराज चॅरिटेबल ट्रस्टच्या




अविरत प्रयत्नांनी नव्यानेच साकार झालेल्या श्री संत गजानन महाराज मंदिरात दुसरा वर्धापन दिवस भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. रविवारी (१५मार्च) सायंकाळी गणानामत्वाम परीवारातर्फे भजन सेवा देण्यात आली. सकाळी महाआरती, प्रसाद व पारायण झाले. तसेच संध्याकाळी श्री संत गजानन महाराज मंदिर परिसरात महाआरती, भजनसंध्या तसेच महाप्रसादाचा भक्त जणांनी व मान्यवरांनी लाभ घेतला. श्री संत गजानन महाराज चॅरिटेबल ट्रस्ट, रायसोनी नगर हे भविष्यात देखील श्री संत गजानन महाराजांची सेवा व त्यांचे इच्छेनुसार इतर गरजूंची समाजसेवा करणेस कटिबद्ध आहे.

### मातोश्री विद्यालयात 'गंमत-गोष्टी' उपक्रम उत्साहात


**जळगाव** : मातोश्री प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी 'गंमत-गोष्टी' हा मनोरंजक व ज्ञानवर्धक उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विविध प्रकारच्या टाळ्यांच्या माध्यमातून करण्यात आली. स्वागत टाळ्या, रॉकेट टाळ्या, लाडू टाळ्या, चुटकी टाळ्या आणि बाजूच्या टाळ्या अशा विविध टाळ्यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर विद्यार्थ्यांना एक-एक चिठ्ठी देऊन त्यामध्ये वेगवेगळे 'किरदार' देण्यात आले आणि काही प्रश्न विचारत 'एक पाऊल पुढे एक पाऊल मागे' हा आगळावेगळा व विचारप्रवर्तक खेळ घेण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी पारंपरिक 'वाघ-बकरी' हा खेळ घेण्यात आला. या खेळातून विद्यार्थ्यांना विचारशक्ती, नियोजन व संघभावनेचे महत्त्व समजावून देण्यात आले. उपक्रमासाठी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रबोधन संस्थेचे प्रशासकीय अधिकारी ॲड. कैलास सोनार, मुख्याध्यापक समाधान इंगळे यांनी केले आहे. उपशिक्षिका कविता गावित, उपशिक्षक मिलिंद नाईक यांनी कार्यक्रमांचे संयोजन केले.

## निधन वार्ता



### धर्मेंद्र मगरे

**चोपडा** : येथील महिला मंडळ शाळेतील निवृत्त क्रीडाशिक्षक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष धर्मेंद्र ऊर्फ साहेबराव देविदास मगरे (वय ६०) यांचे रविवारी (१५ मार्च) पहाटे चारच्या सुमारास अल्प आजाराने निधन झाले. धर्मेंद्र मगरे हे क्षत्रिय काचमाळी समाज मंडळाच्या महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात प्रदेशाचे माजी संचालक व श्री क्षत्रिय कांचमाळी समाज सुधारणा मंडळाचे माजी सचिव होते. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, पत्नी, दोन मुलगे, सून, नातवंडे असा परिवार आहे.



### सरूबाई पाटील

**म्हसास (ता. पाचोरा)** : येथील रहिवासी सरूबाई तुळशीराम पाटील (वय ९२) यांचे रविवारी (१५ मार्च) सकाळी साडेदहाच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुलगे, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माजी सरपंच किसन पाटील, अशोक पाटील, ईश्वर पाटील यांच्या मातोश्री, तर डॉ. वैभव पाटील व जामनेर येथील सोना मेडिकलचे संचालक पंकज पाटील यांच्या त्या आजी होत.



### अरुण पाटील

**चोपडा** : येथील हरेश्वर कॉलनीतील रहिवासी व पंचायत समितीचे निवृत्त कृषी अधिकारी अरुण विठ्ठल पाटील (वय ६७) यांचे रविवारी (१५ मार्च) पहाटे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.




# संसदेत कथित कृती करणाऱ्या राहुल गांधींचा निषेध

## भाजपा पदाधिकाऱ्यांनी इच्छादेवी चौकात पोस्टर जाळले

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १५ मार्च**

संसदेत केलेल्या कथित कृतीच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टीच्या वतीने जळगाव शहरात आंदोलन करण्यात आले. खासदार राहुल गांधी यांनी संसदेत सिलेंडरवर चहा करण्याबाबत केलेल्या प्रकाराचा निषेध करत भाजप कार्यकर्त्यांनी इच्छा देवी चौफुली येथे आंदोलन करत त्यांचे पोस्टर जाळून निषेध नोंदवला. या आंदोलनादरम्यान काही काळ वाहतूकही ठप्प झाल्याने परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

भाजपच्या कार्यकर्त्यांनी संध्याकाळी इच्छा देवी चौफुली येथे एकत्र येत जोरदार घोषणाबाजी केली. संसदेमध्ये राहुल गांधी यांनी केलेल्या कृतीचा निषेध करत त्यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांचे पोस्टर जाळत निषेध व्यक्त केला तसेच पोस्टरला चपला मारून संताप व्यक्त केला. आंदोलनामुळे काही काळासाठी चौफुली परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली होती. आंदोलनस्थळी मोठ्या संख्येने भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित असल्याने परिसरात गर्दी झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात ठेवत वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले.

### गांधींकडून देशाचा अवमान

आंदोलनकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर तीव्र नाराजी व्यक्त करत अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे देशाच्या संसद आणि जनतेचा अपमान होत असल्याचा आरोप केला. यापुढे अशा कृतीचा निषेध करण्यासाठी भाजप कार्यकर्ते रस्त्यावर उतरतील, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. दरम्यान, इच्छा देवी चौफुली येथे झालेल्या या आंदोलनामुळे काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती नियंत्रणात आली आणि वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली.

**यांचा होता सहभाग**

या आंदोलनात आमदार सुरेश भोळे, मनपा स्थायी समितीचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर पाटील, भाजप महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सुर्यवंशी, अजित राणे, दीपक परदेशी, राहुल वाघ, महिला मोर्चाच्या नीता परदेशी, विशाल त्रिपाठी, हर्षल सिकवाल, रेखा कुळकर्णी, यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.



# सोयगावमध्ये ढगे, गावडे यांचा इस्रो सहल निवडीबद्दल सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**सोयगाव, १५ मार्च**

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद शिक्षण विभागातर्फे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निवड चाचणीतून येथील जिल्हा परिषद प्रशाळेतील वैष्णवी कडुबा ढगे व जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील क्रांती नीलेश गावडे यांची जिल्हास्तरावरून निवड झाली. याबद्दल त्यांचा येथील जिल्हा परिषद प्रशाळेत सत्कार सोहळा पार पडला.

याप्रसगी गुरुमाउली स्वामी समर्थ केंद्रातर्फे आणि समाजसेवक रवींद्र काळे व शाळेतील शिक्षक भास्कर चौधरी यांच्यातर्फे वैष्णवी ढगे व क्रांती गावडे यांचा भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी कृषिभूषण अरुण सोहनी, समाजेवक कृष्णा पाटील-जुनघरे यांनी विद्यार्थ्यांसह मार्गदर्शक शिक्षक व शाळेचाही गौरव केला. या वेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील ठोंबरे, समाजसेवक संजय शहापूरकर, नगरसेवक राजू दुतोंडे, रवींद्र काळे, अरुण सोहनी, मयूर मनगटे, मंगेश सोहनी, रवींद्र साखळे, केंद्रीय मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, पंकज रगडे, प्रशाळेचे मुख्याध्यापक दादाराव राठोड यांचे प्रतिनिधी दौलतसिंग परदेशी यांच्यासह शिक्षक भास्कर चौधरी, शिवाजी नवले, विद्याधर बागुल, राजेंद्र उंबरकर, तुकाराम पायाघन, संगीता सोनवणे, जया वाघ, संतोष भारद्वाज, वैजनाथ सावळे, शिवराम आगे, सचिन ढगे, सीमा राऊत आदीसह पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

जिल्हा परिषदेच्या सदस्या पुष्पा काळे, पंचायत समिती सदस्या जयश्री पवार, सविता सोपान गव्हांडे, नगराध्यक्षा आशाबी तडवी, उपनगराध्यक्षा सुरेखा प्रभाकर (आबा) काळे, सोपान गव्हांडे, विजय काळे, हर्षल काळे, संदीप चौधरी, प्रा. नीलेश गाडेकर, सोयगावचे गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे, विस्तार अधिकारी सचिन पाटील, केंद्रप्रमुख फिरोज तडवी आदींनी दोघींचा गौरव केला.

# कर्जमाफी योजनेतील पात्र शेतकऱ्यांच्या गावनिहाय याद्या जाहीर करा

## जि.प.चे माजी सदस्य पद्मसिंग पाटील यांची निवेदनाद्वारे मागणी

**पाचोरा** : महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या म हाराणी अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेतील पात्र शेतकऱ्यांच्या गावनिहाय याद्या तातडीने जाहीर कराव्यात, अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य पदमसिंग पाटील यांनी प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात, या योजनेअंतर्गत दि.३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या पीककर्जावर २ लाख रुपयांपर्यंत (मुद्दल व व्याजासह) कर्जमाफी देण्यात येणार असून नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये कोणताही संभ्रम राहू नये व पात्र लाभार्थ्यांना स्पष्ट माहिती मिळावी, यासाठी गावनिहाय याद्या जाहीर करून त्या ग्रामपंचायत, चावडी, सोसायटी कार्यालय तसेच संबंधित बँकांमध्ये उपलब्ध करून द्याव्यात.



तसेच पारदर्शकतेसाठी या याद्या अधिकृत शासकीय संकेतस्थळावरही प्रसिद्ध कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रांताधिकारी भूषण अहिरे, तहसीलदार विजय बनसोडे यांना निवेदन देताना माजी जिल्हा परिषद सदस्य पदम सिंग पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख विनोद तावडे, वेरुळी विकास सोसायटीचे चेअरमन विजय पाटील, मोहाडीचे माजी सरपंच हेमराज पाटील, शेतकरी संतोष पाटील, राजू चौधरी, रोहित पाटील आदी उपस्थित होते.



# जळगावात ल्युपस आजारावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

## महादेव हॉस्पिटलमध्ये परिसंवाद उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १५ मार्च**

शहरातील महादेव हॉस्पिटल येथे गुरुवार, दि. १२ मार्च रोजी सिस्टेमिक ल्युपस एरिथेमॅटोसस या गंभीर व जुनाट आजारावर विशेष परिसंवाद आणि मार्गदर्शन सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी संधिवात तज्ज्ञ डॉ. आस्था अग्रवाल आणि ग्रंथीशास्त्र तज्ज्ञ डॉ. चिमु चिंते यांनी उपस्थितांना या आजाराचे स्वरूप, लक्षणे आणि आधुनिक उपचार पद्धतींबाबत सविस्तर माहिती दिली.

परिसंवादात मार्गदर्शन करताना डॉ. आस्था अग्रवाल व डॉ. चिमु चिंते यांनी सांगितले की, सिस्टेमिक ल्युपस एरिथेमॅटोसस हा एक ऑटोइम्यून आजार आहे. यामध्ये शरीरातील रोगप्रतिकारशक्ती चुकून स्वतःच्याच निरोगी पेशींवर हल्ला करू लागते. सोप्या भाषेत सांगायचे तर, शरीराची सुरक्षा यंत्रणा स्वतःच्याच अवयवांना शत्रू समजून त्यांच्यावर प्रहार करते. हा आजार सिस्टेमिक असल्याने त्वचा, सांधे, किडनी, हृदय किंवा मेंदू अशा शरीराच्या कोणत्याही भागावर याचा परिणाम होऊ शकतो. तज्ज्ञांनी ल्युपस ओळखण्यासाठी काही महत्त्वाची लक्षणे सांगितली. नाकाच्या पुलावर आणि दोन्ही गालांवर फुलपाखरासारखा लाल रंगाचा पुरळ येणे, सांध्यांमध्ये सूज येणे आणि सकाळी उठल्यावर सांधे जखडणे, विश्रांती घेऊनही न जाणारा प्रचंड थकवा आणि ताप येणे, सूर्यप्रकाशामुळे त्वचेवर पुरळ येणे, थंडीमुळे हातापायांची बोटे पांढरी किंवा निळी पडणे असे होत असेल तर उपचार सुरु केले पाहिजेत असे तज्ज्ञांनी सांगितले. ल्युपस होण्याची नेमकी कारणे अद्याप पूर्ण स्पष्ट नसली तरी, अनुवांशिकता हे एक मोठे कारण असू शकते. विशेष म्हणजे, या आजाराचे ९०% रुग्ण हे स्त्रिया असतात, ज्यामध्ये इस्ट्रोजेन या हार्मोनचा मोठा वाटा असल्याचे मानले जाते. याव्यतिरिक्त अतिनील किरण, संसर्ग किंवा काही औषधांमुळे हा आजार बळावू शकतो, असेही डॉक्टरांनी स्पष्ट केले.

आजच्या काळात वैद्यकीय क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे केवळ लक्षणे कमी करणे हे ध्येय नसून, आजार पूर्णपणे नियंत्रणात ठेवणे शक्य झाले आहे, असा विश्वास तज्ज्ञांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाप्रसंगी डॉ. सी. ए. कांते, डॉ. विनोद बाविस्कर, डॉ. सी. डी. सारंग, डॉ. रविंद्र पाटील, डॉ. तेजस खैरनार, डॉ. ओमप्रकाश काकडे, डॉ.आसावरी देशपांडे, डॉ. ऋषभ पाटील, डॉ. ललित कुमार, डॉ. स्वानंद झंवर, डॉ. रोहित कोळी यांच्यासह शहरातील इतर मान्यवर डॉक्टर्स आणि वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात 'नो स्मोकिंग डे'निमित्त जनजागृतीपर कार्यक्रम

**जळगाव** : एक सिगारेट आयुष्य कमी करत असेल, पण धूम्रपान न करण्याचा एक निर्णय आयुष्य वाचवू शकतो, असे प्रभावी प्रतिपादन प्रा. डॉ. दयाघन राणे यांनी केले.भुसावळ येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे नुकताच नो स्मोकिंग डे कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.




रोटरी क्लब ऑफ भुसावळ आणि डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी नशाबंदी मंडळ, महाराष्ट्र राज्याचे जळगाव जिल्हा संघटक तसेच नाशिक विभागीय संघटक प्रमुख म्हणून कार्यरत असलेले प्रा. डॉ. दयाघन राणे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमास डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालयाचे वैद्यकिय संचालक डॉ. एन. एस. आर्वीकर, अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके,हृदयरोग तज्ज्ञ संचालक_,डॉ. वैभव पाटील, स्त्रीरोग शास्त्र विभाग प्रमुख डॉ. माया आर्वीकर तसेच प्राध्यापक वर्ग आणि एम.बी.बी.एस.चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलतांना प्रा. डॉ. दयाघन राणे यांनी तंबाखू व सिगारेट सेवनाचे शरीरावर होणारे दुष्परिणाम,व्यसन कसे लागते आणि त्यातून अनेक गंभीर आजार कसे निर्माण होतात याची माहिती त्यांनी विविध सर्वेक्षणांच्या आधारे स्पष्ट केली. तंबाखूमुळे कर्करोग, हृदयरोग, फुफ्फुसांचे आजार तसेच श्वसनाचे गंभीर विकार होण्याचा धोका वाढतो, तसेच भारतात दरवर्षी लाखो मृत्यू तंबाखूजन्य आजारांमुळे होतात. डॉक्टर हे समाजासाठी रोल मॉडेल असतात. त्यामुळे डॉक्टरांनी स्वतः धूम्रपानापासून दूर राहून समाजाला योग्य संदेश द्यावा, असे आवाहनही त्यांनी मेडिकलच्या विद्यार्थ्यांना केले. एक सिगारेट आयुष्य कमी करत असेल, पण धूम्रपान न करण्याचा एक निर्णय आयुष्य वाचवू शकतो, असे सांगत त्यांनी धूम्रपानमुक्त जीवनाचा संदेश दिला.कार्यक्रमात प्रा. डॉ. दयाघन राणे यांचा परिचय वैद्यकिय संचालक डॉ. एन. एस. आर्वीकर यांनी करून दिला, तर स्वागत स्त्रीरोग शास्त्र विभाग प्रमुख डॉ. माया आर्वीकर यांनी केले. अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके तसेच डॉ. वैभव पाटील यांचे स्वागत

गजानन सेवलकर यांनी केले. रोटरी क्लब ऑफ भुसावळचे सचिव रत्नाकर क्षीरसागर यांचे स्वागत डॉ. _प्रशांत सोळंके यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन डॉ. एन. एस. आर्वीकर यांनी केले.

# पर्यावरण संवर्धन ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी

## प्राचार्य डॉ. फालक : भोळे महाविद्यालयात राष्ट्रीय ई-संमेलन उत्साहात

**भुसावळ** : आधुनिक युगातील विकासाच्या प्रक्रियेमुळे पर्यावरणावर मोठा ताण निर्माण झाला आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची किंवा शास्त्रज्ञांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.आर.पी. फालक यांनी केले.

दादासाहेब देविदास नामदेव भोळे महाविद्यालयात ई-संमेलन आयक्यूएसी सेल आणि वनस्पतिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि.१२ रोजी एक दिवसीय बहुविषयक राष्ट्रीय ई-संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जबलपूर येथील राणी दुर्गावती विद्यापीठाच्या मालवीय मिशन टीचर ट्रेनिंग सेंटरचे सहाय्यक संचालक प्रा.संजीवकुमार पांडे हे ऑनलाइन उपस्थित होते.

पुढे बोलतांना प्राचार्य फालक यांनी, शिक्षणसंस्था विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. शाश्वत विकासाचा विचार पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक परिषद संयोजक डॉ.अंजली पाटील यांनी केले तर आभार डॉ.माधुरी पाटील यांनी मानले.

परिषदेत देशातील विविध भागांतील प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यासाठी ९० हून अधिक सहभागींनी नोंदणी केली. यावेळी ६२ संशोधनपर शोधनिबंध प्राप्त झाले.

Kirloskar
जगप्रसिध्द किर्लोस्कर कंपनीचे सर्व प्रकारचे घरगुती, शेती उपयोगी, औद्योगिक व जीनींग प्रेसींग पंप, मोटर्स अल्टरनेटर्स उपलब्ध.



संपर्क : निलेश संघवी
M.9373232643
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'कस्तुरी' २६, नवीपेठ, जुन्या बस स्टॅन्ड समोरील गल्लीत, जळगांव
☎ 2232641 To 2232645

### खरेदीखताचा दस्त हरविल्याबाबतची तमाम जाहिर नोटीस

तमाम लोकांना, वित्तीय संस्थांना व को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना **१) मंगलसिंग निवृत्ती पाटील,** रा.गट नं.१/१, प्लॉट नं.१, शालिनी नगर, पिंप्राळा शिवार, जळगांव, **२) प्रविण हिलाल पाटील, ३) सुनिल मधुकर पाटील,** रा.७३, मु.पो. विरावली, ता.यावल, जि. जळगांव, **४) संजीवनी कैलास पाटील,** रा.मढी चौक, पिंप्राळा, ता.जि. जळगांव यांच्यावतीने या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**१) मिळकतीचे वर्णनः मौजे पिंप्राळा,** ता. जि. जळगांव येथील **शेत गट नं.१/१ मधील प्लॉट नं.३ यांसी क्षेत्र १६५.०० चौ.मी., आकार रु.२३०=०० पैसे, यांसी चतुःसिमाः-पुर्वेस-प्लॉट नं.४, पश्चिमेस प्लॉट नं. २, उत्तरेस गट नं. २, दक्षिणेस-९ मीटर रस्ता, तसेच प्लॉट नं.४ यांसी क्षेत्र १६५.०० चौ.मी., आकार रु.२३०=०० पैसे, यांसी चतुःसिमाः पुर्वेस प्लॉट नं.५, पश्चिमेस प्लॉट नं.३, उत्तरेस-गट नं.२, दक्षिणेस-९ मीटर रस्ता,** येणेप्रमाणे उपरोक्त मिळकतीत जाणे-येणेचे, वहीवाटीचे हक्कांसह तदंगभुत वस्तुसूध्दा.

२) वर कलम १ यांत वर्णन केलेली प्लॉट नं.३ व ४ या मिळकती, १) श्री. भगीरथ कन्हैय्यालाल सैनी व २) श्री.धर्मराज भगीरथमल सैनी दोघेही रा. रामेश्वर कॉलनी, मेहरुण, ता.जि. जळगांव यांनी श्री. नंदकुमार गोपाळराव बेंडाळे, दोघेही रा. जिवनधाम, पिंप्राळा शिवार, सिल्कमिल समोर, जळगांव दि.२१/३/२०१२ रोजी खरेदीखताने विकत घेतलेली असुन त्याबाबतचे खरेदीखत मे. दुय्यम निबंधक साहेब, जळगांव यांचे दप्तरी दस्त नं. १९७१/२०१२ अन्वये विकत घेतलेली आहे.

३) वर कलम १ यांत वर्णन केलेली प्लॉट नं. ३ व ४ या मिळकती, श्री. दयाराम धोंडू पाटील, रा.८, शंकरवाडी, जळगांव यांनी १) श्री. भगीरथ कन्हैय्यालाल सैनी व २) श्री. धर्मराज भगीरथमल सैनी दोघेही रा. रामेश्वर कॉलनी, मेहरुण, ता.जि. जळगांव यांचेकडुन दि.१६/२/२०१५ रोजी खरेदीखताने विकत घेतलेली असुन त्याबाबतचे खरेदीखत मे. दुय्यम निबंधक साहेब, जळगांव यांचे दप्तरी दस्त नं.८४९/२०१५ अन्वये विकत घेतलेली आहे.

**खरेदीखताचा दस्त नं.१९७१/२०१२, दि.२१/३/२०१२ रोजी व दस्त नं.८४९/२०१५, दि.१६/२/२०१५ रोजीचे खरेदीखतांची मुळ प्रत, मुळ एस. आर. आर. पावती, व मुळ इंडेक्स-२ चा उतारा गहाळ झालेले आहेत.**

आमचे अशिलांना वर नमुद दस्तांची आवश्यकता आहे. तरी उपरोक्त दस्त कोणासही आढळल्यास नोटीस देणार यांचेकडे किंवा त्यांच्या वकीलांकडुन ७ (सात) दिवसात आणून देण्याचे करावे, काही व्यवहार असल्यास तसे हरकतीद्वारे कळवावे. याउपर सदरचा दस्त न आढळल्यास आमचे अशिल पुढील बँकेसह संपूर्ण व्यवहार करण्यास मोकळे राहतील. सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकारांनी सांगितलेवरुन व माहिती दिलेवरुन आज रोजी प्रसिध्दीस दिली असे.

जळगांव
दिनांक
१३/०३/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश रविकांत नागला**
**ऑफिसः-** फ्लॅट नं. ३ पहिला मजला, कालिदास चेंबर्स (श्रध्दा अपार्टमेंट) शाहू कॉम्प्लेक्स जवळ, जळगांव.
मो.नं.८२०८००९६८९

ॲड.के.ए. बडगुजर

### जाहिर नोटीस

**भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी**

दिवाणी किरकोळ अर्ज कं. ०९/२०२६
निशाणी क.:-०८
पु. चौकशी तारीखः २८/०४/२०२६

**मुक्ताईनगर येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो यांचे न्यायालयात.....**

मृत व्यक्ती रूपाली राजेश पाटील रा. मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जि. जळगांव सामान्यतः राहणार किंवा संपत्ती बाळगणारच्या मृत्युपत्राचे संप्रमाण/या मृत व्यक्तीच्या इस्टेटीचे प्रशासनपत्र यावायत/चा

उत्तराधिकार मयताचा पत्ताः रूपाली राजेश पाटील रा. मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जि. जळगांव सामान्यतः राहणार किंवा संपत्ती बाळगणारच्या मृत्युप्रत्राचे संप्रमाण/या मृत व्यक्तीच्या इस्टेटीचे प्रशासनपत्र

**अर्जदार : १.** राजेश वासुदेव पाटील, उ.व. ४६ वर्षे **२.** खुशी राजेश पाटील, उ.व. १७ वर्षे, **३.** स्वरा राजेश पाटील, उ.व. १३ वर्षे, **४.** गुरूराज राजेश पाटील, उ.व. ०६ वर्षे, अ.क्र. २ ते ४ तर्फे अ.पा.क अ.क्र. १ वडील सर्व रा. प्लॉट नं. १७ दिवाणी न्यायालयाजवळ भुसावळ रोड मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जि. जळगांव

**विरूध्द ....कोणी नाही**

याद्वारे पुढीलप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे-

१) उक्त अर्जदार यांनी वर नमुद केल्याप्रमाणे **भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे वारस दाखला** मिळणेसाठी वारस मृत व्यक्ती **रूपाली राजेश पाटील** निवेदिलेले आहे की, सदर मृत व्यक्ती **रूपाली राजेश पाटील रा. मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जि. जळगांव** येथे सामान्यतः राहत होती किंवा संपत्ती बाळगुन होती. सदर मृत व्यक्ती **रूपाली राजेश पाटील** हे दिनांक २४/०२/२०२५ रोजी **मौजे एरंडोल ता. एरंडोल जि.जळगांव** येथे मरण पावले आणि मृताशी असलेले नाते किंवा अर्जात दिलेले अन्य कारण याठिकाणी लिहावयाचे पती/मुली/मुलगा या अधिकाराने उक्त अर्जदार संप्रमाणाची/प्रशासनपत्राची/उत्तराधिकार प्रमाणपत्राची मागणी करीत आहे.

२) मयत **रूपाली राजेश पाटील** यांचा दि. २४/०२/२०२५ रोजी एरंडोल येथे अपघातात मृत्यु झालेला असुन त्यांच्या मृत्यु पश्चात विम्याच्या रक्कमेसाठी विमा कंपनीने वारस दाखल्याची मागणी केल्यामुळे त्याकरीता वारस दाखल्याची आवश्यकता असल्यामुळे सदरचा अर्ज वारस दाखला मिळणेसाठी दाखल करीत आहे.

३) मुक्ताईनगर येथील मे. दिवाणी न्यायालय क. स्तर येथील न्यायालयाने सदर अर्जाच्या सुनावणीकरीता **दिनांक २८ माहे एप्रील सन २०२६** हा दिवस निश्चित केलेला आहे. मृत व्यक्ती **रूपाली राजेश पाटील रा. मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जि. जळगांव** यांच्या इस्टेटीत कोणताही हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे नोटीस देण्यात येत आहे की, त्यांनी संप्रमाण/प्रशासनपत्र दिले जाणेपुर्वी यावे व चाललेली कार्यवाही पहावी.

सदरहु नोटीस आज दि. १४ माहे मार्च सन २०२६ रोजी माझे सहीनिशी व मे. कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

**हुकुमावरून**
**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, मुक्ताईनगर**

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग**, डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com

# इराणच्या इस्फान शहरात विध्वंस

## अमेरिका-इस्रायलकडून शेकडो ड्रोनचा मारा, ४२ नागरिक ठार

◆ **तेहरान, १५ मार्च**

औद्योगिक शहर म्हणून प्रसिद्ध असलेल्या इराणच्या इस्फान शहरावर इस्रायल-अमेरिकेने रविवारी पहाटेपासून शेकडो ड्रोन आणि ५० पेक्षा अधिक क्षेपणास्त्रांचा मारा केला. यात लष्करी तळ, संरक्षण आणि औद्योगिक प्रतिष्ठाने उद्ध्वस्त झाली. या हल्ल्यात ४२ पेक्षा अधिक नागरिकांचा मृत्यू झाला, तर १२५ जखमी असल्याची माहिती इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांनी समाज माध्यमावरील पोस्टमधून दिली.

इस्फहान हे मध्य इराणमधील एक महत्त्वाचे औद्योगिक शहर असून, तेथे अनेक संरक्षण आणि तंत्रज्ञान प्रतिष्ठाने आहेत. इराणची राज्य वृत्तसंस्था, फार्सने दिलेल्या वृत्तात म्हटले की, रविवारी पहाटेपासून सकाळपर्यंत इस्रायल-अमेरिकेच्या वायुदलाने ड्रोन, क्षेपणास्त्राचा मारा केला. यात अनेक इमारती, शस्त्रनिर्मिती प्रतिष्ठाने आणि लष्करी तळ उद्ध्वस्त झाले. बचावपथकाने इमारतीच्या ढिगाऱ्यातून ४२ मृतदेह बाहेर काढले, तर १२५ पेक्षा अधिक जखमींना रुग्णालयात हलविले. बचावकार्य अजूनही सुरूच असल्याने मृतकांची संख्या वाढू शकते. राष्ट्रपती पेझेश्कियान यांनी हल्ल्याची पुष्टी केली आहे. निवासी भागांवर अनेक हल्ले चढविण्यात आले, यात निष्पाप लोकांना मृत्यू झाल्याचा आरोप त्यांनी केला. अमेरिकेची आखाती देशातील लष्करी आणि हवाई तळांवर ताकदीने प्रत्युत्तर देणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



### निष्पाप नागरिकांच्या मृत्यूचा सूड घेणार : पेझेश्कियान

पेझेश्कियान यांनी सांगितले की युद्ध असूनही, इराणमधील व्यवसाय सामान्यपणे सुरू आहे. आमच्या भागीदारांनी सेवा सुरळीतपणे चालू ठेवण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत. लादलेल्या आणि अन्याय्य युद्धाला पंधरा दिवस उलटून गेले आहेत आणि वाहतूक, दळणवळण आणि इतर आव्हानांना न जुमानता जनतेला देण्यात येणारी सेवा सुरळीत सुरू आहे. नुकत्यात झालेल्या हल्ल्यात निष्पाप नागरिकांचे बळी गेले. त्याचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाही. ■

### युएईवर बॉम्बचा वर्षाव

आयआरजीसीने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, युएईवर १,६०० ड्रोन, २९४ क्षेपणास्त्राचा मार करण्यात आले. ज्यामध्ये किमान २९४ लोक ठार झाले आणि १४१ जण जखमी आहे. त्यांनी हल्ल्याची चित्रफीत प्रसारित केली आहे. युएईने हल्ल्याची पुष्टी करताना म्हटले की, इराणने मारा केलेले सर्व ड्रोन, क्षेपणास्त्रे हवाई संरक्षण प्रणालीने नष्ट केले. त्यामुळे कोणतीही जीवितहानी झालेली नाही. ■

**दुबई, कुवेत विमानतळांवर हल्ले**

खार्ग बेट आणि इस्फान शहरावर झालेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने रविवारी दुबई आणि कुवेतच्या आंतरराष्ट्रीय विमानतळांवर क्षेपणास्त्र, ड्रोनचा मारा केला. या हल्ल्यांमुळे दोन्ही विमानतळावरील विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली. दुबईच्या मरीना आणि अल सुफूह भागात शक्तिशाली स्फोट झाले. कुवेतच्या फुजैराह शहरात झालेल्या हल्ल्यात १५ नागरिक जखमी झाले.

# आम्ही पाच वर्षे लढण्यास तयार

## इराणचा अमेरिकेला इशारा, कोणताही त्याग करण्यास तयार

◆ **तेहरान, १५ मार्च**

अमेरिकेशी आता कोणतीही चर्चा होणार नाही, गरज पडल्यास दीर्घ युद्ध लढण्यास तयार आहे आणि शत्रूंसमोर कदापि गुडघे टेकणार नाही. देशाला इराक युद्धाचा अनुभव आहे आणि लोक भूमीचे रक्षण करण्यासाठी कोणताही त्याग करण्यास तयार असल्याचा इशारा इराणच्या सर्वोच्च नेत्याचे प्रतिनिधी अब्दुल माजिद हकीम इलाही यांनी दिला.

संघर्ष पाच वर्षापर्यंत टिकला तरी, इराण शेवटपर्यंत लढण्यास तयार आहे. आम्ही रक्त सांडण्यास तयार आहोत, पण आमची एक इंचही जमीन सोडणार नाही. आम्ही यापूर्वी इराकविरुद्ध आठ वर्षांच्या युद्धाचा सामना केला. इराण अमेरिकेशी वाटाघाटी करणार नाही, युद्धाची सुरुवात त्यांनी केली मात्र अंत आम्हीच करणार असल्याचे वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत इलाही म्हणाले. इराणने वारंवार या प्रदेशात संघर्ष टाळण्यासाठी शेजारी देशांना मदतीचे आवाहन केले. मात्र आखाती देशांनी अमेरिकन सैन्याला मदत केली, याची किंमत त्यांना मोजावी लागेल.

### होर्मुझच्या सुरक्षेसाठी मदत करावी : ट्रम्प



राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, होर्मुझ जलमार्गाला सुरक्षित करण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहे. इतर देशांनी मदत केल्यास हा मार्ग खुला करण्यास मदत होऊ शकते. चीन, फ्रान्स, जपान, दक्षिण कोरिया, ब्रिटन आणि इतर देशांनी त्यांच्या युद्धनौका पाठवून अमेरिकेला सहकार्य करावे. एकत्र येऊन सर्वांनी इराणच्या प्रतिकाराला विरोध केल्यास या मार्गातून जहाजांची वाहतूक पूर्ववत होऊ शकते. ■

**युएईच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा**

संयुक्त अरब अमिराती (यूएई) सरकारने नागरिकांना सतर्कतेचा इशारा जारी करत बंदर, लष्करी तळ, अमेरिकेची कार्यालये यापासून दूर राहण्याच्या सूचना दिल्या आहे. इराणकडून कोणत्याही क्षणी या भागात हल्ला होण्याची शक्यता आहे.

# झारखंडच्या लातेहारमध्ये दोन माओवाद्यांना अटक

◆ **लातेहार, १५ मार्च**

झारखंडच्या लातेहार जिल्ह्यात सीपीआयच्या (माओवादी) दोन स्वयंघोषित कमांडरला अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी शनिवारी दिली. त्यांच्या ताब्यातून एके-४७ रायफल, इतर शस्त्रे आणि काडतुसे जप्त केली, असे त्यांनी सांगितले.

सीपीआयचा (माओवादी) एक विभागीय कमांडर आपल्या पथकासह नेतरहाट, मुआडांर, बारेसांड, गारू आणि छिपदोहर या भागांत फिरत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर हे अटकसत्र राबवण्यात आले, असे लातेहारचे पोलिस अधीक्षक कुमार गौरव यांनी सांगितले. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांचे एक पथक तयार करण्यात आले आणि छिपादोहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत शोधमोहीम राबवण्यात आली.

या मोहिमेदरम्यान दोघांना अटक करण्यात आली, तर इतर तिघे पळून जाण्यात यशस्वी ठरले, असे गौरव यांनी पत्रकारांना सांगितले. त्या दोघांवर एकूण १२ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. छत्तीसगडसह विविध जिल्ह्यांमधील व राज्यांमधील दाखल असलेल्या गुन्ह्यांच्या संदर्भात ते दोघेही पोलिसांना हवे होते, असे अधिकाऱ्याने सांगितले.

# श्रीलंकेतून ८४ इराणी खलाशांचे मृतदेह रवाना

**कोलंबो** : अमेरिकेच्या हल्ल्यात बुडालेली इराणी युद्धनौका आयआरआयएस डेना मधील ८४ खलाशांचे मृतदेह श्रीलंकेने इराणला पाठवले आहेत. ४ मार्च रोजी श्रीलंकेतील गॅलेच्या किनाऱ्यावर विशाखापट्टणम येथील नौदल सरावातून परत येत असताना यावर हल्ला झाला होता.

तुर्कीच्या एका खासगी विमानाने हे मृतदेह इराणला पाठवल्याची माहिती श्रीलंका सरकारने दिली. हल्ल्यानंतर ८४ खलाशांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले होते, तर ३२ जणांना श्रीलंकेच्या रुग्णालयात उपचारासाठी हलविले होते. श्रीलंकेच्या मुख्य दंडाधिकाऱ्यांनी करापिटिया राष्ट्रीय रुग्णालयाच्या संचालकांना मृतदेह इराणी दूतावासाकडे सोपवण्याचे आदेश दिले. ■

## कॅनडात पंजाबी तरुणाची हत्या

**ओटावा** : पंजाबच्या मोगा जिल्ह्यातील एका तरुणाची कॅनडात गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. तरुणाच्या टॅक्सीत बसलेल्या एका महिलेचा काही गुंड पाठलाग करत होते. त्यांनी टॅक्सीवर अंदाधुंद गोळीबार केला, यात त्याचा जागीच मृत्यू झाला. दविंदर सिंग असे मृतकाचे नाव आहे. मृत दौलतपुरा नीवां गावचा रहिवासी असून, चार तो वर्षांपूर्वी कामासाठी कॅनडाला गेला होता. ■

# आसाम सरकारचा चार सशस्त्र गटांसोबत करार

◆ **गुवाहाटी, १५ मार्च**

आसाम सरकारने रविवारी तीन कुकी आणि एका हमार सशस्त्र गटासोबत सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या असून, यामुळे राज्यातील वांशिक बंडखोरीचा अंत झाल्याचा दावा एका निवेदनात केला आहे.

या चार गटांनी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शस्त्रे खाली ठेवली होती आणि कारवाया स्थगिती करारावर स्वाक्षऱ्या केल्या होत्या. युनायटेड कुकीगम डिफेन्स आर्मी (यूकेडीए), कुकी रिव्हॉल्युशनरी आर्मी (केआरए) आणि कुकी लिबरेशन ऑर्गनायझेशन (केएलओ), कुकी लिबरेशन आमी (केएलए) या कुकी गटांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

हमार पीपल्स कन्व्हेन्शन डेमॉक्रॅटिकनेही (एचपीसी-डी) येथे आयोजित एका कार्यक्रमात सरकारसोबत अंतिम करारावर स्वाक्षऱ्या केल्या. त्रिपक्षीय चर्चेच्या अनेक फेऱ्या पार पडल्या आणि त्यांचा समारोप करारांमध्ये झाला, असे निवेदनात म्हटले आहे.

कुकी आणि हमार गटांशी करण्यात आलेल्या दोन करारांनुसार-ज्यामध्ये प्रत्येक गटाशी एका कराराचा समावेश आहे. कुकी आणि हमार लोकांसाठी कल्याण व विकास परिषदा स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. याचे मुख्यालय गुवाहाटी येथे असेल.

# पंजाबमध्ये इसिस मॉड्यूलचा भंडाफोड

## दोघांना अटक, शस्त्रसाठा जप्त

◆ **अमृतसर, १५ मार्च**

पंजाब पोलिसांनी अमृतसर ग्रामीण भागात इसिस पुरस्कृत दहशतवादी मॉड्यूलचा भंडाफोड करीत दोन आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून एक एके-४७ रायफलसह दारूगोळा जप्त केला. महावीर उर्फ काका आणि मनप्रीत उर्फ मणी अशी आरोपींची नावे आहेत.

दोन्ही आरोपी समाज माध्यमावरून परदेशी हँडलर्सच्या संपर्कात होते. हे मॉड्यूल कट्टरतावाद पसरवणे तसेच भारतविरोधी आणि पोलिसविरोधी कथानक प्रसारित करण्यात सहभागी असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. या कारवाईदरम्यान त्यांच्याकडून एक ९ एमएम ग्लॉक पिस्तूल आणि जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. प्राथमिक तपासात आरोपी परदेशातील गोपी नवशेहरिया आणि जस्सी कुलम यांच्या सूचनेवरून काम करत असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रतिबंधित दहशतवादी संघटना बब्बर खालसा इंटरनॅशनलशी संबंधित असल्याचे तपासात उघड झाले आहे. आरोपींनी परदेशी हँडलरच्या सूचनेवरून आयईडी आणि हँडग्रेनेड खरेदी केली होती.



उत्तर कोरियाने शनिवारी अनेक आंतरखंडीय क्षेपणास्त्रांची चाचणी केली. या चाचणीला उत्तर कोरियाचे हुकुमशहा किम जोंग मुलीसह उपस्थित होते. या चाचणीने कोरियन द्विपात शस्त्रस्पर्धा वाढण्याची भीती आहे

# नेपाळमध्ये बस अपघात, सात भारतीय ठार

◆ **काठमांडू, १५ मार्च**

नेपाळमधील गंडकी प्रांतातील गोरखा जिल्ह्यात शनिवारी रात्री भारतीय भाविकांनी भरलेली एक बस दरीत कोसळली. यात ७ लोकांचा मृत्यू झाला, तर ७ जण जखमी झाले आहेत. प्रवासी मनाकामना मंदिरातून दर्शन करून परत येत होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भाविकांना घेऊन जाणारी एक खासगी बस मनाकामना मंदिरातून परत येत असताना अनियंत्रित होऊन २०० फूट खोल दरीत कोसळली. अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांना भरतपूर येथील चितवन मेडिकल कॉलेजमध्ये उपचारासाठी पाठवण्यात आले, तिथे डॉक्टरांनी सात भारतीय नागरिकांना मृत घोषित केले, तर इतरांवर उपचार सुरू आहे. गोरखा जिल्हा वाहतूक पोलीस कार्यालयाचे प्रमुख सूरज अर्याल यांनी सांगितले की, मृतांमध्ये दोन महिला आणि पाच पुरुषांचा समावेश आहे. सर्व भारतीय नागरिक होते.

# भूमी सुपोषण चळवळीचा १९ रोजी राष्ट्रीय शुभारंभ



**अमळनेर, १५ मार्च**

अक्षय कृषी परिवार व मंगळ ग्रह सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भूमी सुपोषण चळवळीचा राष्ट्रीय शुभारंभ गुरुवार, दि.१९ रोजी येथील श्री मंगळग्रह मंदिर येथे केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवार, दि.१३ रोजी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री मंगळग्रह मंदिर येथे बैठक पार पडली.

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, पोलीस उपअधीक्षक विनायक कोते, जिल्हा कृषी अधीक्षक के.एन. तडवी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुभाष राऊत, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, बीडीओ एन.आर. पाटील, मुख्याधिकारी गणेश शिंदे, उपविभागीय कृषी अधिकारी सी.डी. साठे, कृषी विभागाचे उपसंचालक भरत इंगळे, महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता टी.एच. नेमाडे व उपकार्यकारी अभियंता नितीन चौधरी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रकाश ताडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गिरीश गोसावी, निवासी नायब तहसीलदार सी.यू. पाटील, नायब तहसीलदार ए.पी. कुलकर्णी यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मंदिराच्या अभिषेक गृहात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगसह बैठकीचे नियोजन करण्यात आले होते. आशिष चौधरी यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनसह अन्य डिजिटल जबाबदाऱ्या सांभाळल्या.

यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी रोहन घुगे म्हणाले की, देशातील कृषी क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त असलेली ही चळवळ खरे तर लोकचळवळ आहे. मात्र, या चळवळीला शासकीय पाठबळ मिळाल्यास ती अधिक प्रभावी व व्यापक होईल. त्यासाठी प्रशासनातील सर्वच विभागांनी आपापल्या परीने प्रयत्न करायचे असल्याचे सांगितले. अमळनेरकडे येणारे व बाहेर पडणारे सर्व रस्ते परीक्षण करून रस्त्याबाबतच्या समस्यांचे तत्काळ निराकरण करण्याचे आदेशही जिल्हाधिकारी घुगे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले तसेच सती माता मंदिराजवळील बोगदा व रस्ता या समस्येबाबतही त्यांनी युद्धपातळीवर मार्ग काढण्यास सांगितले.

सर्वच विभागाचे अधिकारी त्यांच्या जबाबदाऱ्या पूर्तीसाठी करीत असलेले व करणार असलेले प्रयत्न आदींची माहिती जाणून घेतली. सर्व अधिकाऱ्यांनी अत्यंत समाधानकारक प्रतिसाद दिला.

सीईओ करणवाल यांनी, कृषी क्षेत्रातील सर्वच घटकांपर्यंत जावून या उपक्रमाची माहिती व उपयुक्तता पटवून दिली पाहिजे, असे सांगितले तर मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांनी, १९ मार्च रोजी होणारा कार्यक्रम देशातील सर्व कृषी विद्यापीठ व कृषी महाविद्यालये तसेच देशातील प्रमुख ६०० जिल्ह्यांमध्ये थेट प्रक्षेपित केला जाणार आहे. त्यासाठीची सर्व तांत्रिक तयारी जवळपास पूर्ण झाली असल्याचे सांगितले.

बैठकीनंतर जिल्हाधिकाऱ्यांसह उपस्थित सर्व अधिकाऱ्यांनी कार्यक्रम स्थळ, पार्किंग, व्हीआयपी पार्किंग, आगमन व बाहेर पडण्याचे मार्ग, स्वच्छतागृहे, रस्ते आदी सुविधांची प्रत्यक्ष स्पॉटवर जावून माहिती घेतली. दरम्यान, बैठकीनंतर अप्पर पोलीस अधीक्षक कविता पवार-नेरकर यांनीही मंदिर व कार्यक्रम स्थळाला भेट दिली. सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून अत्यावश्यक सूचना दिल्या.

**दर्शन, स्वागत-सत्कार**

जिल्हाधिकारी पदाचा पदभार घेतल्यानंतर श्री. घुगे यांनी प्रथमच श्री मंगळग्रह मंदिराला भेट दिली. डॉ.महाले यांनी त्यांना मंदिराचा सर्व इतिहास व महत्व सांगितले. मंदिरात जिल्हाधिकारी घुगे व सीईओ करणवाल यांनीही विधिवत छोटेखानी पूजाही केली. मंदिरातर्फे उपाध्यक्ष एस.एन. पाटील, सचिव एस.बी. बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, मंगल सेवेकरी प्रकाश मेखा यांनी दोघांचा सत्कार केला.

### १९ मार्चचे वैशिष्ट्ये

गुरुवार, दि.१९ रोजी वर्षप्रतिपदा आहे. वर्षप्रतिपदा हा भूमी मातेचा जन्मदिवस आहे. त्याच दिवशी हिंदू नववर्षारंभ व साडेतीन मुहुर्तांपैकी एक शुभमुहूर्त असलेला अर्थात गुढीपाडवा आहे. त्यामुळेच १९ मार्च रोजी भूमी सुपोषण चळवळीचा राष्ट्रीय शुभारंभ करण्याचे सुनिश्चित झाले आहे.

### अमळनेरचीच निवड का?

अमळनेर येथील श्री मंगळग्रह मंदिर येथे विश्वातील दाक्षिणात्य शैलीतील भूमी मातेची एकमेव मूर्ती आहे. तसेच विश्वातील एकमेव भूमीपुत्र अर्थात श्री मंगळग्रहाची स्वयंभू मूर्ती आहे. त्यामुळेच अमळनेर या मंगल नगरीचे स्थानमहात्म्य विचारात घेऊन अमळनेरची निवड करण्यात आली आहे.

# समुद्राच्या लाटांपासून शुद्ध पाणी मिळणार

## एनआयओटीचा लक्षद्वीपमध्ये प्रकल्प, चोवीस तास वीजही तयार होणार

◆ **कवरत्ती, १५ मार्च**

चारही बाजूंनी समुद्राने वेढलेल्या बेटांवर राहणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याचे गोडे पाणी आणि स्वस्त वीज ही सर्वात मोठी आव्हाने आहेत. लक्षद्वीपमध्ये या दोन्हीवर समस्येवर तोडगा काढण्यात यश आले. राजधानी कवरत्तीमध्ये असा प्रकल्प तयार होत आहे जो समुद्रातील तापमानाच्या फरकामुळे वीज निर्माण करेल आणि त्याच प्रक्रियेत समुद्राच्या पाण्याला पिण्याच्या पाण्यात रूपांतरित करेल.

पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशन टेक्नॉलॉजी (एनआयओटी) ने अशा क्रांतिकारी तंत्रज्ञानावर काम सुरू केले आहे, जे या वर्षाच्या अखेरपर्यंत जगासाठी एक आदर्श बनेल. हा जगातील पहिला असा हायब्रीड प्रकल्प असेल जो समुद्राच्या लाटांपासून शुद्ध पाणी आणि चोवीस तास वीज देखील निर्माण करणार आहे. नवीन प्रकल्प ओशन थर्मल एनर्जी कन्व्हर्जन (ओटीईसी) तंत्रज्ञानावर आधारित आहे. यात समुद्राच्या पृष्ठभागावरील गरम पाणी आणि खोल समुद्रातील थंड पाणी वापरले जाईल. गरम पाणी व्हॅक्यूममध्ये टाकून वाफ तयार केली जाईल, ही वाफ टर्बाइन फिरवून वीज निर्माण करेल. नंतर खोल समुद्रातून आणलेल्या थंड पाण्याने वाफ थंड करून गोडे पाणी तयार केले जाईल.



### दररोज १ लाख लिटर गोडे पाणी तयार

प्रकल्पातून दररोज १ लाख लिटर गोडे पाणी तयार होणार आहे आणि गरजेची वीज स्वतःच निर्माण करेल. हे चालवण्यासाठी डिझेल किंवा विजेची गरज भासणार नाही. विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांनी या प्रकल्पाला भविष्यातील ऊर्जा सुरक्षेचा आधार म्हटले आहे. लक्षद्वीपमधील ८ बेटांवर आधीपासूनच थर्मल डीसॅलिनेशन तंत्रज्ञानाने पाणी तयार केले जात आहे. या प्रकल्पामध्ये समुद्रातील पाणी वाफवून नंतर थंड करून गोडे पाणी तयार केले जाते. मात्र, हे चालवण्यासाठी डिझेल जनरेटरमधून वीज द्यावी लागत होती. ■

**नवीन प्रकल्पाचे कार्य काय असेल ?**

कवरत्तीमध्ये उभारल्या जात असलेल्या या अभिनव प्रकल्पाचा सर्वात गुंतागुंतीचा भाग म्हणजे खोल समुद्रातून थंड पाणी आणणे. यासाठी शास्त्रज्ञांचे पथक सुमारे ३.८ किमी लांबीची प्रचंड पाइपलाइन टाकत आहे. ९०० मिमी व्यासाची ही हाय डेन्सिटी पॉलीएथिलीन पाइपलाइन समुद्राच्या तळाशी १००० मीटर खोलवरून बर्फासारखे थंड पाणी वर आणेल. कवरत्तीच्या खाडी क्षेत्रात याला वेल्डिंग करून समुद्रात बसवण्याचे काम वेगाने सुरू आहे.

### स्वच्छ ऊर्जेचा मार्ग मोकळा

सध्या लक्षद्वीपला डिझेल जनरेटरच्या माध्यमातून वीज मिळते. मुख्य भूमीवरून जहाजांद्वारे डिझेल आणणे महागडे असून, सागरी पर्यावरणासाठीही धोकादायक आहे. नवीन प्रकल्प दररोज ६५ मेगावॅट वीज स्वतः निर्माण करेल. विशेष म्हणजे, संपूर्ण लक्षद्वीपची दैनंदिन मागणी फक्त १०-१२ मेगावॅट आहे. याचा अर्थ, हा प्रकल्प स्वतःची गरज पूर्ण करण्यासोबतच इतर बेटांना अतिरिक्त स्वच्छ ऊर्जा देखील देईल. ■


स्व.ओच्छवलाल माणेकलाल देसाई
स्वर्गवास दि. १६/३/२००९
आपल्या पवित्र स्मृतीस
भावपूर्ण श्रद्धांजली
शोकाकुल
नैलेश देसाई, हेमेंद्र देसाई
हर्षिल देसाई, यश देसाई
समस्त देसाई परिवार
व मित्र परिवार, जळगाव

## अग्रलेख...

# युद्ध आणि विरोधकांची भूमिका

जग सध्या मोठ्या ऊर्जा संकटातून जात आहे. गॅस आणि पेट्रोल-डिझेलचा वापर आता शस्त्रासारखा होऊ लागला आहे. रशिया-युक्रेन युद्ध भरात असताना अमेरिका आणि मध्य पूर्वेतील तेल उत्पादक देशांनी त्या परिस्थितीचा फायदा उचलत कच्च्या तेलाचे दर वाढवीत भरपूर नफा कमाविला. अशा परिस्थितीत रशिया भारताच्या मदतीला आला. अमेरिकेच्या दबावाला न जुमानता रशियाकडून मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आयात करीत आपले ऊर्जा साठे आणखी मजबूत केले. रशिया-युक्रेन युद्ध लांबत असल्याने डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापार शुल्काचा दंडुका हातात घेतला आणि रशियाकडून तेल आयात करणाऱ्या देशांवर आर्थिक निर्बंध लादण्याची धमकी दिली. याचा जो परिणाम व्हायचा तो झालाच. भारताने एका झटक्यात रशियाकडून तेल आयात थांबविली नाही, पण त्यात मोठी कपात केली. स्वस्तात मिळणारे कच्चे तेल बंद झाले. इराणवरही आर्थिक निर्बंध असल्याने तेथूनही कच्चे तेल आयात करणे थांबले. वास्तविक पाहता इराणकडून कच्चे तेल आयात करणे भारताला आर्थिकदृष्ट्या परवडणारे आहे. पण, ट्रम्प यांच्या हेकेखोर वृत्तीचा फटका भारताला बसला. तेहरानपासून सुरू झालेले युद्ध आता समुद्रांमध्ये पोहोचले आहे. आशियाई देशांना होर्मुझ सामुद्रधुनीतून कच्चे तेल आणि वायूचा पुरवठा मोठ्या प्रमाणात होतो. पण, होर्मुझमध्ये सध्या शेकडो मालवाहू जहाजे अडकली आहेत. तेल घेऊन येणारी जहाजे अडकल्याने पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. तेलाचे दरही प्रती बॅरेल १०० डॉलर्सच्या वर गेले आहेत. भारतात अद्याप पेट्रोल-डिझेलचे दर वाढले नसले तरी युद्ध लांबल्यास परिस्थिती बिकट होऊ शकते. कच्च्या तेलाच्या किमती वाढत असल्याने पेट्रोलियम कंपन्यांचा तोटा वाढतो. पाठोपाठ चलनवाढ होऊन महागाई वाढते. म्हणूनच स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात सरकारला नाईलाजाने वाढ करावी लागली. तशी ही सामान्य परिस्थिती आहे. आपल्या पुरवठा साखळीशी संबंधित असलेल्या भागांत युद्ध सुरू झाल्यानंतर वस्तूंचा तुटवडा निर्माण झाल्याने किमती वाढणे अस्वाभाविक नाही. अशाप्रसंगी सरकार कुणाचे हे महत्त्वाचे नाही. २१ व्या शतकातील तिसरे दशक जगासाठी जणू संकटे घेऊन आले, असेच म्हणावे लागेल. भारताला तर एका वेळी अनेक संकटांचा सामना करावा लागत आहे.

कोरोनाच्या महामारीने जगात हाहाकार उडविला होता. लक्षावधी नागरिकांचा कोरोनाने बळी घेतला. जागतिक अर्थव्यवस्था पूर्णपणे कोसळली होती. अनेक देश देशोधडीला लागले. अशा आर्थिक संकटाच्या काळात रालोआ सरकारने परिस्थिती कुशलतेने हाताळली, असेच म्हणावे लागेल. कोरोनातून सावरत असतानाच २०२३ पासून रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाले. त्यात इस्रायल-हमासची भर पडली. त्याचा परिणाम हळूहळू का होईना, पण झालाच. भारत युक्रेनकडून सूर्यफूल बिया मोठ्या प्रमाणात आयात करतो. सोबतच उच्च दर्जाच्या मक्यालाही मागणी होती. पण, गेली चार वर्षे युद्ध सुरू असल्याने व्यापार विस्कळीत झाला. तेलाच्या किमती गगनाला भिडू लागल्या. पर्यायी मार्ग शोधल्याने कमोडिटी मार्केट स्थिरस्थावर होत असतानाच डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आले. त्यांनी टॅरिफ वॉर सुरू करून जगाला पुन्हा संकटात टाकले. भारतावर ५० टक्के व्यापार शुल्क आकारले. भारताला याचा मोठा फटका बसला. अमेरिकेत होणारी काही वस्तूंची निर्यात घटली. तब्बल सहा महिने अशीच परिस्थिती राहिली आणि अखेर दोन्ही देशांत व्यापार करार झाला. व्यापार शुल्क ५० वरून १८ टक्क्यांवर आले. या व्यापार कराराची दोन्ही बाजूंनी अधिकृत घोषणा आणि अंमलबजावणीही झालेली नसताना इराण-इस्रायल-अमेरिका युद्ध भडकले. जगात पुन्हा अस्थैर्य निर्माण झाले. इंधन आणि वायू पुरवठा विस्कळीत झाला. पंधरा दिवस लोटून आणि दोन्ही बाजूंचे मोठे जीवित आणि आर्थिक नुकसान होऊनही संघर्ष थांबण्याची चिन्हे नाहीत. उलट, संघर्षाची नवी केंद्रे निर्माण होत आहेत. तेहराननंतर युद्ध आता समुद्रात शिरले आहे. होर्मुझ सामुद्रधुनीत धुमश्चक्री सुरू झाली. वायू आणि कच्चे तेल हे खाडी देशांच्या श्रीमंतीचे गमक आहे. होर्मुझमधील अडथळे दूर करण्यासाठी अमेरिकेने इराणच्या खर्ग बेटावर हल्ला केला. या बेटावर इराणची सर्वांत मोठी रिफायनरी आहे. विशेष म्हणजे या बेटावरून चीनला इंधनाचा पुरवठा होतो. येथूनच इराणच्या ९० टक्के इंधनाची निर्यात होते. अमेरिकेने याच बेटावर असलेल्या लष्करी तळाला लक्ष्य केले. सध्या फक्त लष्करी तळांनाच लक्ष्य केले. इराण शरण न आल्यास तेलसाठे आणि रिफायनरीजवर हल्ले करण्याचा इशारा ट्रम्प यांनी दिला.

चीन हा इराणसाठी कच्च्या तेलाचा सर्वांत मोठा आयातदार देश आहे. होर्मुझपेक्षा खर्ग बेटावरून चीनकडे दररोज अधिक मालवाहू जहाजे जात असतात. अमेरिकेची ही कारवाई एकप्रकारे चीनला दिलेला इशारा आहे. कारण, खामेनेई राजवटीच्या मागे चीन ठामपणे उभा आहे. इराणच्या लष्करी शक्तीबाबात इस्रायल आणि अमेरिकेने लावलेले अंदाज चुकीचे ठरत आहेत. पंधरा दिवस होऊनही आणि प्रचंड नुकसान झेलूनही इराण मागे हटायला तयार नाही. युद्ध केवळ शस्त्रास्त्रे आणि मनुष्यबळांची उपलब्धता यावर लढली जात नाहीत. ती इच्छाशक्तीच्या बळावर लढली आणि जिंकली जातात हे वारंवार सिद्ध झाले आहे. बलाढ्य सैन्यशक्ती असलेल्या अमेरिकेच्या तोंडाला इराणने सध्या फेस आणला आहे. इस्रायलच्या तर अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे. इराणच्या स्वस्त, हलक्या आणि विध्वंसक ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रांच्या माऱ्याने अमेरिकेचे मध्यपूर्वेतील लष्करी तळ नेस्तनाबूत झाले आहेत. युद्ध कोणत्या दिशेने जाईल याचा अंदाज बांधणे कठीण झाले आहे. इराण लवकरच शरण येईल, ही डोनाल्ड ट्रम्प यांची अपेक्षा फोल ठरली. शेकडो सैनिक ठार झाले, प्रत्यक्ष सर्वोच्च नेते अली खामेनेई यांनाही गमावले. तरीही इराण अजूनही मैदानात पाय रोवून उभा आहे. या संघर्षात मध्यपूर्वेतील अनेक देश होरपळत आहेत. कतार, सौदी अरब, बहरीन, कुवैत, संयुक्त अरब अमिरात या देशांचे मोठे नुकसान झाले. वायू आणि कच्च्या तेलाची निर्यातच ठप्प झाल्याने व्यापारातील तोटा वाढला आहे. अशा कठीण प्रसंगातही भारत संयम ठेवून परिस्थिती हाताळत आहे. गॅसची कमतरता भासू नये म्हणून इराण आणि रशियासोबत बोलणी सुरू केली आहे. होर्मुझ सामुद्रधुनीत अडकलेल्या आणि एलपीजी घेऊन निघालेल्या दोन जहाजांना जाऊ देण्यास इराणने होकार दर्शविला आहे. एवढेच नव्हे तर भारताला त्रास होणार नाही, याची काळजी घेण्यात येणार असल्याचे इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांनी म्हटले आहे. संकट डोक्यावर असतानाही युद्धग्रस्त देशांमधील जनता राज्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. भारतात मात्र उलटे चित्र दिसत आहे. काँग्रेससह अन्य विरोधी पक्ष या युद्धाच्या आडून स्वतःचा राजकीय फायदा शोधत आहेत. देशात सिलेंडर आणि इंधनाचा साठा मुबलक असून, नागरिकांनी घाबरू नये, असे आवाहन सरकारने केलेले असतानाही काँग्रेस रस्त्यावर उतरून जनतेच्या मनात भीती निर्माण करण्याचे काम करीत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा पसरविल्या जात आहेत. परिणामी मोठ्या प्रमाणात सिलेंडरची पॅनिक बुकिंग केली जात आहे. काँग्रेससह साऱ्या विरोधी पक्षांना विरोध करण्याचा अधिकार आहे. पण देशात अराजक निर्माण होईल, अशी परिस्थिती निर्माण होणार नाही, याची दक्षता घेणेही आवश्यक आहे. युद्ध किती काळ चालेल हे कुणालाही माहीत नाही. पण, जणू काही भारतामुळेच मध्यपूर्वेतील युद्ध भडकले, अशा पद्धतीने विरोधकांनी सरकारला कोंडीत पकडण्याचे प्रयत्न चालविले आहेत. ठिकठिकाणी सरकारविरुद्ध काँग्रेसने रान उठविणे सुरू केले आहे. विरोध करणे हे त्यांचे काम असले तरी त्यामागे ठोस कारण असले पाहिजे. परिस्थिती निवळण्यास मदत करण्याऐवजी ती कशी चिघळेल, यासाठीच विरोधकांकडून प्रयत्न केले जात आहेत, जे चुकीचे आहे. संकटाच्या परिस्थितीत राजकीय नफा-तोट्याचे गणित बाजूला ठेवून सरकारच्या पाठीशी उभे राहण्याची भारतात आतापर्यंत पद्धत होती. ती पद्धत विरोधक विसरले असतील तर आता जनतेने शहाणे व्हायला हवे, एवढेच सध्या म्हणता येते.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# डॉलर-बॅरलचे युद्ध!

''राजकीय सत्ता ही बंदुकीच्या बॅरलमधून प्रवाहित होत असते.'' चीनचे नेते माओ त्से तुंग यांचे हे एक प्रसिद्ध विधान होते. अर्थात ते विसाव्या शतकातील होते. एकविसाव्या शतकात सत्तेचे माध्यम बदलले आहे. आता ही सत्ता कच्च्या तेलाचा बॅरल आणि अमेरिकन डॉलर यातून प्रवाहित होत आहे. आणि त्यावरील पकड मजबूत करण्यासाठी मध्यपूर्वेत युद्ध छेडले गेले आहे.

**दोनशे डॉलर?** : युद्ध आणखी काही काळ सुरू राहिल्यास तेलाच्या एका बॅरलसाठी २०० डॉलर मोजण्याची तयारी जगाने ठेवावी अशी भाषा इराणने उच्चारली आहे. आताच एका बॅरलने शंभर डॉलरची पातळी ओलांडली आहे तर दुसरीकडे एक डॉलर शंभर रुपयांचा होण्याची वाटचाल सुरू आहे. हा सारा परिणाम आहे- अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा. या युद्धाशी संयुक्त अरब अमिरात, सौदी अरेबिया, टर्की, कुवैत, कतार या देशांचा काहीही संबंध नाही. पण, त्या देशांना या युद्धाचे परिणाम भोगावे लागत आहेत. तीच स्थिती भारताची झाली आहे. भारताचे इस्रायल व इराण या दोन्ही देशांची चांगले संबंध. पण, त्यांच्यातील युद्धाचा फटका भारताला, भारतीय जनतेला बसणे सुरू झाले आहे.

मध्यपूर्वेत सुरू झालेले हे युद्ध आणखी किती दिवस चालेल याची कल्पना करणे अवघड आहे. कारण, इस्रायल व अमेरिका या दोन्ही देशांची उद्दिष्ट्ये वेगवेगळी आहेत. इराणी नेते खामेनी यांना ठार करणे व इराणचा आण्विक कार्यक्रम उद्ध्वस्त करणे हे इस्रायलाचे मर्यादत उद्दिष्ट होते. ते युद्धाच्या पहिल्याच दिवशी साध्य झाले. त्यानंतर इस्रायलने हे युद्ध थांबवावयास हवे होते. पण, अमेरिकेमुळे इस्रायलला हे करता आलेले नाही.

**अमेरिकेचे उद्दिष्ट** : अमेरिकेला इराणमध्ये कठपुतली सरकार हवे आहे, जेणेकरून इराणच्या कच्च्या तेलावर अमेरिकेला आपला हक्क सांगता येईल. अमेरिकेचे हे उद्दिष्ट साध्य होणे जरा अवघड आहे. कारण, इराणच्या तेलावर चीनने आपला हक्क अगोदरच सांगितलेला आहे. इराणच्या एकूण तेल निर्यातीपैकी ८६ टक्के निर्यात एकट्या चीनला होते. आणि चीनच्या एकूण तेल आयातीत इराणचा वाटा सर्वांत मोठा आहे.

**चीन निश्चिंत** : इराणने आपली आपली हार्मुजची खाडी बंद केल्याने काही तेल उत्पादक देश चिंतित आहेत. इराणने काही तेलवाहक जहाजांना आगी लावल्या आहेत. या खाडीतून एक लिटर तेलही बाहेर जाणार नाही अशी घोषणा इराणने केली आहे. पर्शियन आखात आणि ओमानचे आखात यांना जोडणारी खाडी म्हणजे हार्मुजची खाडी. काही ठिकाणी ही खाडी एवढी उथळ आहे की मोठ्या तेलवाहक जहाजांना इराणच्या किनारपट्टीला लागूनच प्रवास करावा लागतो आणि तो सारा भाग इराणने बंद केला आहे. यात चीन असा एकमेव देश आहे की त्याच्यावर हार्मुज खाडी बंद झाल्याचा कोणताही परिणाम होणार नाही. कारण, चीनने इराणचे तेल आयात करण्यासाठी काही वर्षांपूर्वीच रेल्वे मार्ग बांधला आहे. इराणचे कच्चे तेल सागरीमार्गाने चीनच्या तेल शुद्धीकरण कारखान्यात पोहोचण्यास ४५ दिवस लागतात तर रेल्वेने हेच काम १५ दिवसांत पूर्ण केले जाते. १०,४०० किलोमीटर लांबीचा हा रेल्वेमार्ग २०२५ च्या जून महिन्यात पूर्ण करण्यात आला. तेहरानजवळील अप्रीन बंदर ते चीनमधील झियान यांना जोडणारा हा रेल्वेमार्ग चीनच्या महत्त्वाकांक्षी योजनेनुसार पूर्ण करण्यात आला. चीन यावरच थांबलेला नाही. त्याने आणखी एक पर्यायी रेल्वे मार्ग बांधण्याची योजना आखली आहे. पाच देशांना जोडणारा हा नवा रेल्वे मार्ग काहीसा जास्त वेळ घेणारा असला तरी तो पूर्ण करण्याचा चीनचा मनोदय आहे. याशिवाय चीन-इराण यांच्यात २५ वर्षांचा सुरक्षा करारही झाला आहे. म्हणजे वेळ पडल्यास चीन इराणच्या रक्षणासाठी उघडपणे समोर येण्यास मागे-पुढे पाहणार नाही.



**खामेनींची निवड** : इराणने अयातताेल्ला खामेनी यांचे पुत्र मोताबा खामेनी यांना उत्तराधिकारी निवडून अमेरिकेला एकप्रकारे आव्हान दिले आहे. सुरक्षेच्या कारणांसाठी ही निवड 'ऑनलाईन' करण्यात आली. ८८ पैकी ८० 'मतदारांनी' मोताबा खामेनींना पाठिंबा दिला. यात इराणच्या लष्कराची फार मोठी भूमिका होती. या निवडीला चीनचा आशीर्वाद असल्याचे सांगितले जाते. इराणच्या नव्या राजवटीमागे चीन व रशिया हे दोन्ही देश असल्याने अमेरिकेचे उद्दिष्ट कसे साध्य होणार हा एक मोठा प्रश्न आहे. आमच्या पाठिंब्याशिवाय इराणमध्ये नवा नेता निवडला जाऊ शकत नाही असे राष्ट्रपती ट्रम्प वारंवार सांगत असले तरी इराणने अगोदरच चीनचे मांडलिकत्व पत्करले आहे.

**तेल भडकले** : मध्यपूर्वेतील या युद्धाची किंमत आता साऱ्या जगाला मोजावी लागत आहे. ब्रेंट कच्चे तेल १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेले आहे. याशिवाय आखाती देशांनी तेलाचे दररोजचे उत्पादन ८ मिलियन बॅरल म्हणजे ८० लाख बॅरलने घटविले आहे. जे तेल उत्पादित होते, ते हार्मुजची खाडी बंद असल्याने बाहेर पाठविणे अशक्य झाले आहे. याने साऱ्या जगभर हाहाकार होण्याची स्थिती तयार होत आहे. म्हणजे हे युद्ध लवकर न थांबल्यास एक वेगळ्या प्रकारचा 'लॉकडाऊन' जगात सुरू होईल.

**डॉलर-बॅरल** : राष्ट्रपती ट्रम्प यांनी सत्ता हाती घेतल्यापासून ते सातत्याने डॉलरला मजबूत करण्याची भाषा बोलत आहेत. ब्रिक्स म्हणजे ब्राझील, रशिया, भारत, चीन हे देश युरोच्या धर्तीवर नवे चलन तयार करण्याच्या प्रयत्नात आहेत असे ट्रम्प यांना वाटत होते. त्यात भारतही सामील असल्याचा त्यांना संशय होता. त्यातून त्यांचा भारतविरोधी पारा अधिक भडकत गेला. अमेरिका कोणत्याही परिस्थितीत डॉलर कमजोर होऊ देणार नाही असे प्रतिपादन ते करीत आले आहेत.

**विकासाचे इंजिन** : प्रत्येक देशाला आपल्या विकासासाठी लागणारे इंधन म्हणजे कच्चे तेल. या तेलावर कब्जा करावयाचा अशी महत्त्वाकांक्षा बाळगून ट्रम्प निर्णय घेत आहेत. रशियाचे खच्चीकरण करावयाचे असेल तर व्हेनेझुएलाच्या तेलावर ताबा मिळवावा लागेल या योजनेतून त्यांनी या देशाच्या राष्ट्रपतीलाच पळविले आणि आता ते तेथील नामधारी सरकारकडून कच्चे तेल मिळवीत आहेत.

इराण हा चीनच्या विकासाचे एक प्रकारचे इंजिन आहे असे ट्रम्प यांना वाटते. त्यांनी व्हेनेझुएलाची पुनरावृत्ती या देशात करण्याचा प्रयत्न चालविला आहे. इराणच्या सर्वोच्च नेत्याचे अपहरण करणे शक्य नसल्याने त्याची चक्क हत्याच करण्यात आली. आता इराणमध्ये सत्तापालट करण्याचा त्यांचा मनोदय आहे. ते कितपत साध्य होईल असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे.

**जीपीएस विरुद्ध बीडीएस** : २०२५ च्या मे महिन्यात भारत- पाकिस्तान यांच्यात झडलेल्या संघर्षाची एका वेगळ्या प्रकारची पुनरावृत्ती या संघर्षात दिसत आहे. चार दिवसांच्या युद्धादरम्यान, चीन पाकिस्तानला भारताच्या लष्करी हालचालींचे 'लाईव्ह लोकेशन' पुरवीत होता आणि पाकिस्तान त्याआधारे आपले हल्ले चढवीत होता. अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धात हेच होत असल्याचे म्हटले जाते. इराण ज्या अचूकपणे अमेरिकन लष्करी तळांना व इस्रायली लष्करी केंद्रांना लक्ष्य बनवीत आहे ही सारी चीनची करामत असल्याचे मानले जाते. कुवैतमध्ये अमेरिकेची किमान तीन एफ-१५ विमाने इराणने पाडली. यामागे चीन होता असे आता मानले जाते.

अमेरिका-इस्रायल हे जीपीएस म्हणजे ग्राऊंड पोझिशनिंग सिस्टिमचा वापर करून इराणवर हल्ले चढवीत आहेत तर इराणने चीनच्या बीडीएस म्हणजे बायदू सिस्टिमचा वापर चालविला आहे. बहुतेक तज्ज्ञांच्या मते चीनची बायदू प्रणाली ही अमेरिकेच्या जीपीएसपेक्षा कितीतरी पटीने अचूक आहे. त्याचा प्रत्यय या युद्धात येत आहे. अगदी नेमक्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, अमेरिका व चीन यांच्यातील युद्ध मध्यपूर्वेच्या रणांगणात लढले जात आहे.

## वेध

सोनाली पवन ठेंगडी

# वारसा परंपरेचा

अवघ्या दोन दिवसांनी चैत्र महिना सुरू होईल. गुढीपाडव्याची तयारी घरोघरी एव्हाना सुरू देखील झाली असेल. अर्थात, हे काम घरातील आई-वडील, आजी-आजोबाच सांभाळतात. गुढीसाठी काठी काढून धुतली जाईल, गुढीचे वस्त्र पाहून ठेवले जाईल. गाठी ठेवलेलीच असणार. या दिवशी मेन्यू काय करावा, त्यावरही आई-आजीची चर्चा सुरू असेल. गुढीची पूजा दरवर्षीप्रमाणे बाबाच करतील, आई नैवेद्य आणून ठेवेल, गुढीला हळदी-कुंकू वाहून नमस्कार करेल. तिचे औक्षण केले जाईल. संध्याकाळी सूर्यास्तापूर्वी बाबा ती गुढी व्यवस्थित खाली उतरवून ठेवतील आणि आई, बाबा, आजी, आजोबा गाठीचा आणि कडूलिंबाच्या पानांचा प्रसाद मोठ्या श्रद्धेने ग्रहण करतील. पण, हे काय, या संपूर्ण चित्रात नवीन पिढी कुठेच दिसत नाही. दुर्दैवाने ही वास्तविकता आहे की, आपल्या या पारंपरिक सणांमध्ये नवीन पिढीचा सहभाग फारच कमी आहे.



आज चाळीस-पन्नासच्या वयात असलेल्या मंडळींनी आपल्या लहानपणीचा गुढीपाडवा आठवून पाहावा. काठी शोधून ती धुऊन ठेवणे, गुढीची तयारी करणे, घरातील अन्य कामांत मदत करणे, गुढीची पूजा झाल्यानंतर तिला मनोभावे नमस्कार करणे, सायंकाळी गुढी उतरवल्यानंतर इच्छा नसली तरीही कडूलिंबाचा प्रसाद ग्रहण करणे असा सहभाग घरातील मुलांचा नक्कीच असायचा.

आताचे चित्र जरा वेगळे आहे. गुढीपाडवा असला तरी घरातील मुलगा किंवा मुलगी स्वत:च्या वेळेवरच झोपून उठणार, वर सांगितल्याप्रमाणे गुढीपाडव्याच्या एकूणच छोटेखानी समारंभात घरातील अपत्याची भूमिका अगदी पाहुणे कलाकारासारखीही नसते. याला दोषी ही नवीन पिढी नाही तर घरातील आई-वडील आणि मोठी मंडळी आहेत. कारण त्यांनी मुलांना आपल्या परंपरेचा वारसा योग्य पद्धतीने हस्तांतरित केलेलाच नाही.

हा आपला सण आहे आणि याचे महत्त्व काय आहे, हे नवीन पिढीला पटेल अशा पद्धतीने सांगण्यातच आलेले नाही. याआधीची पिढी धाकाने सर्वकाही करायची. पण, आताच्या पिढीला धाक कामाचा नाही. त्यांना विश्वासात घेऊन शांतपणे सारे काही समजावले पाहिजे. त्यांनी सणांसाठीची तयारी स्वत:हून, उत्साहाने करावी इतका जोश पालकांनीच त्यांच्यात भरला पाहिजे. हा आपला सण आहे आणि आजपासून आपले नवे वर्ष सुरू होत आहे. तुम्ही ३१ डिसेंबरला रात्री १२ वाजता नवीन वर्षाचा जल्लोष करता, पण आपला सण सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत असतो. तुम्ही जसे नवीन वर्षासाठी काहीतरी 'रिसोल्यूशन' ठेवता त्याच पद्धतीने आपण या कालावधीत आपण संकल्पाची गुढी उभारतो. सर्वांना सुखी, आरोग्यपूर्ण, संपन्न जीवन मिळावे, अशी कामना करतो. या दिवशी नवे कपडे घालायचे, गुढीला नमस्कार करून घरातील सर्व मोठ्यांचेही आशीर्वाद घ्यायचे. गोडा-धोडाचे जेवण करायचे आणि संपूर्ण दिवस कुटुंबासोबत आनंदाने घालवून सायंकाळी सूर्यास्तापूर्वी गुढीला नमस्कार करून खाली उतरवायचे. गुढीला बांधलेल्या कडूलिंब आणि गाठीच्या प्रसादाचेही अपार महत्त्व आहे. कडू-गोडाचा हा मिलाफ आयुष्याचे रंग दाखवतोच पण, त्या दिवशी खाल्लेला कडूलिंबाचा पाला आगामी काळातील व्याधींपासून रक्षण करतो.

अशा सर्व पद्धतीने नव्या पिढीला या सणाचे स्वरूप समजावले तर कदाचित ते पुढील वर्षी स्वत:हून याच्यासाठी सज्ज राहतील. त्यांना यातील आनंदाची जाणीव झाली तर ते त्यांच्या पिढीतील इतरांना आणि नंतर आपल्या मुलांनाही तो वारसा अलगद सोपवतील.

अजूनही वेळ गेलेली नाही. त्यामुळे घरातील मोठ्यांनी लहानांना गुढीपाडव्याच्या सणात सहभागी करून घेण्याची पूर्वतयारी करावी. घरातील काठी शोधण्यापेक्षाही आपल्या परंपरेचा आधार असणारी नव्या पिढीची काठी शोधणे जास्त गरजेचे आहे. गुढीच्या गाठीइतक्याच नात्यांतील गाठीत देखील गोडवा निर्माण होणे गरजेचे आहे आणि कडूलिंबाचा पाला खाण्याइतके हे काम कठीण वाटत असले तरी निरोगी समाजव्यवस्था तसेच कुटुंबव्यवस्थेसाठी हे जास्त गरजेचे आहे. हे काम घरातील मोठ्यांनी यशस्वीपणे पार पाडले तर यंदा गुढीपाडव्याला आपण नव्या पिढीला काहीतरी चांगला वारसा सोपवतोय, याचे समाधान नक्कीच मिळेल.

७७५५९३८८२२

## कानोसा

अमोल पुसदकर

# संघ-युगाचा शालिवाहन

''उजाळीलेस तू तममय जीवन, संघ युगाचा शालिवाहन'' अशा पद्धतीचे संघामध्ये एक गीत आहे. ज्याप्रमाणे शकांचा पूर्णपणे पराभव करणारा शालिवाहन राजा याने भारतभूमीला संकटमुक्त केले, यासाठी त्याने मातीतून सैनिक निर्माण केले. मातीतून सैनिक निर्माण केले म्हणजे या वाक्याचे अनेक अर्थ असू शकतात. याच मातीत जन्मलेल्या लोकांतून त्यांनी सैनिक निर्माण केले, हा त्याचा एक अर्थ असू शकतो. मातीप्रमाणे थंड आणि आकारहीन लोकांना त्यांनी राष्ट्रभक्तीचे संस्कार देऊन शकांविरुद्ध उभे केले आणि त्यातून भारतभूमीला संकटमुक्त केले.

वर्ष प्रतिपदा हा पूजनीय डॉ. केशव बळीराम हेडगेवार, ज्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली, त्यांचा जन्मदिवस आहे. संघामध्ये सहा उत्सव साजरे केले जातात. हे सर्व उत्सव समाजप्रबोधनाचे माध्यम आहेत. संघामध्ये कोणाचीही जयंती आणि पुण्यतिथी साजरी केली जात नाही. डॉ. हेडगेवार सुद्धा याला अपवाद नाहीत. संघामध्ये वर्ष प्रतिपदा हा सहा उत्सवांपैकी एक उत्सव आहे. तो त्याच्या पौराणिक आणि ऐतिहासिक महत्त्वामुळे आहे. तो डॉक्टरांचा जन्मदिवस आहे म्हणून संघात उत्सव म्हणून साजरा केला जात नाही.

संघ हा व्यक्तिपूजक नाही. ज्या डॉक्टरांनी संघाची स्थापना केली त्यांनी सुद्धा जंगल सत्याग्रहामध्ये सहभागी होताना आपले सरसंघचालकपद डॉक्टर परांजपे यांना सोपविले. आज आपण समाजामध्ये एकाच पदाला वर्षानुवर्षे चिकटून राहणारे लोक बघतो, त्यावेळेस आपल्याला पूजनीय डॉक्टरांचे वेगळेपण लक्षात येते. संघामध्ये पद हा शब्द नाही. त्याला दायित्व असे म्हटले जाते. ''देअर आर नो डेकोरेटिव्ह पोस्ट्स इन आरएसएस.'' संघामध्ये शोभेचे कोणतेही पद नाही. प्रत्येकाला जबाबदारी समजून कार्य करावेच लागते.

स्वयंसेवकांना उद्देशून डॉक्टरजी म्हणतात की, आज जरी मी संघाचा सरसंघचालक असलो तरीसुद्धा उद्या तुम्हाला असे वाटले की मी या कामासाठी योग्य नाही तर माझ्यापेक्षा योग्य व्यक्तीला तुम्ही हे कार्य द्या. तुम्ही ज्याला नियुक्त कराल त्याच्या सोबत मी एक सामान्य स्वयंसेवक म्हणून कार्य करेल, असा विश्वास तुम्ही असू द्या.

संघामध्ये गुरू कोणाला मानले पाहिजे या विषयावर जेव्हा चर्चा झाली, त्यावेळेस स्वाभाविकपणे सर्व स्वयंसेवकांनी असे मत दिले की, डॉक्टरजी तुम्ही संघाची स्थापना केलेली आहे त्यामुळे तुम्हीच संघाचे गुरू असायला पाहिजे. त्यावेळेला त्यांच्या जागी दुसरी व्यक्ती असती तर तिला मनातून आनंद झाला असता व त्याने ''ठीक आहे बाबा, तुम्ही म्हणता तर मी गुरू होतो'' असे म्हटले असते. परंतु ते म्हणाले की, बघा आपल्या संघाचे काम काय आहे. आपल्याला हिंदूंचे संघटन करायचे आहे. हिंदू समाजाचे आयुष्य हे शेकडो, हजारो वर्षांचे आहे. इतक्या वर्षांपर्यंत त्याला मार्गदर्शन करेल अशा कुठल्यातरी प्रतीकाला आपण गुरुस्थानी ठेवले पाहिजे.

त्यानंतर भगव्या ध्वजाला गुरुस्थानी मानण्यात आले. या सर्व उदाहरणांकडून आपल्याला लक्षात येते की डॉक्टरांनी कधीही स्वतःचे कुणालाही स्तोम माजवू दिले नाही. संघामध्ये वर्ष प्रतिपदेच्या कार्यक्रमाच्या आधी आद्य सरसंघचालक प्रणाम देण्यात येतो. हा प्रणाम सुद्धा व्यक्तिपूजेचा भाग नाही, तर हा कार्यपद्धतीचा भाग आहे. त्याचबरोबर डॉक्टरांच्या जन्मजात देशभक्तीला केलेला हा प्रणाम आहे. राष्ट्रनिर्मितीसाठी संघाची स्थापना करून सर्वस्वाचा होम करणाऱ्या त्यांच्या त्यागी वृत्तीला हा प्रणाम आहे.



'' संघटना के पुण्यकार्य में कण कण होम किया था
हिंदुराष्ट्र है भारत तुमने यह उद्‌घोष किया था''

व्यवसायाने जरी ते डॉक्टर नसले तरी शिक्षणाने डॉक्टर होते. त्यांचे निदान अचूक होते. कोट्यवधी लोकांच्या देशावर मूठभर इंग्रज राज्य कसे करू शकतात, या प्रश्नाने त्यांना बेजार केलेले होते. देश आणि समाजाच्या समस्या ते बघत होते. देशाच्या इतिहासाचा त्यांनी अभ्यास केलेला होता. त्यातून जे सत्य त्यांच्या मनाला उमजलेले होते ते म्हणजे समाजामध्ये असलेली अनुशासनहीनता, स्वार्थकेंद्रिता, संघटनेचा अभाव, देशभक्तीला प्राधान्य नसणे, स्वबोध नसणे हे होय.

आता जे समाजात दोष आहेत ते कदाचित काही काळ काम केल्यावर निघून जातील, परंतु ते पुन्हा निर्माण होणार नाहीत असे नाही. ते निर्माण झाले असता त्याचे निराकरण पुन्हा कोण करणार? त्यामुळे वर्षानुवर्षे समाजातील, देशापुढील समस्यांना सोडवू शकेल अशी राष्ट्रभक्त, संघटित, नित्यसिद्ध शक्ती त्यांना हवी होती.

त्यांच्या दृष्टिकोनातून देशभक्ती ही काही तात्पुरती किंवा हंगामी भावना नव्हती. हंगामी देशभक्तीच्या भावनेने राष्ट्र कधीही संकटमुक्त होणार नाही हे त्यांना माहीत होते. म्हणूनच देशभक्तीची ज्योत सदा सर्वकाळ समाजामध्ये तेवत राहावी यासाठीच त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली.

संघाच्या स्थापनेनंतर संघाला उपेक्षेचा सामना करावा लागला. किशोरवयीन मुलांना एकत्र करून त्यांनी संघाची शाखा सुरू केली. किशोरवयीन मुलांसोबत उभे असलेले प्रसिद्ध पुढारी व क्रांतिकारक डॉ. हेडगेवार यांना पाहिल्यावर लोक थट्टा करायचे. संघ सुरू झाला तेव्हा त्याचे नाव ठरलेले नव्हते, प्रमुख कोण राहणार हे ठरलेले नव्हते, शाखा नावाची कार्यपद्धती सुद्धा ठरलेली नव्हती. देशासाठी कार्य करणारी देशभक्त, जागृत, सक्रिय संघटना उभी करायची एवढेच त्यांच्या मनामध्ये होते.

एखाद्या कळीचे फुलामध्ये रूपांतर व्हावे तसे संघाची कार्यपद्धती हळूहळू विकसित होत गेली. सुरुवातीला जे शब्द होते त्याचा पुढे मंत्र झाला. याच सामान्य कार्यपद्धतीतून असामान्य स्वयंसेवक व नेतृत्व निर्माण झाले. संघामध्ये आयात केलेल्या नेतृत्वाची आवश्यकता राहत नाही. जे येतात ते येथील कार्यपद्धतीतून संघकार्य करण्यासाठी कुशल बनतात.

पूजनीय डॉ. हेडगेवारांच्या काळामध्ये जे कुशपथक होते, त्या कुशपथकामध्ये बाल स्वयंसेवक म्हणून प्रवेश करणारे पूजनीय बाळासाहेब देवरस हे पुढे संघाचे तृतीय सरसंघचालक झाले. संघाने जातिभेद नष्ट करण्याच्या घोषणा दिल्या नाहीत, फक्त हिंदुत्वाच्या आधारावर संघटन सुरू ठेवले. त्याचा योग्य तो परिणाम झाला.

''जातीपंथ भाषेचे अंकुर कधी न येथे रुजले''

संघामध्ये कुठलीही घराणेशाही नाही. येथील सामान्य स्वयंसेवक सुद्धा संघाच्या सर्वोच्च सरसंघचालक पदावर आरूढ होऊ शकतो. संघाला घराणेशाहीचा इतिहास नाही.

पूजनीय डॉ. हेडगेवार यांच्यानंतर ''हू आफ्टर हेडगेवार'', ''हेडगेवार यांच्यानंतर कोण'' असा प्रश्न कधीही संघात निर्माण झाला नाही. डॉक्टरांच्या निधनानंतर सरसंघचालक कोण होईल याचे उत्तर डॉक्टरांनी पत्रामध्ये लिहून ठेवलेले होते. त्यांच्या इच्छेप्रमाणे माधव सदाशिवराव गोळवलकर अर्थात श्रीगुरुजी हे संघाचे द्वितीय सरसंघचालक झाले.

त्यावेळेस श्रीगुरुजींपेक्षाही संघकार्याचा अधिक अनुभव असलेले अनेक ज्येष्ठ, श्रेष्ठ कार्यकर्ते संघामध्ये होते. तरीही संघामध्ये त्यांचे गट निर्माण झाले नाहीत, दुफळी माजली नाही. सगळ्यांनी डॉक्टरांचा आदेश शिरसावंद्य मानला. डॉक्टरांचे नेतृत्व असे असामान्य होते.

डॉक्टरांच्या निधनानंतर सरसंघचालकपद स्वीकारल्यानंतर बोलताना पूजनीय श्रीगुरुजी म्हणाले होते की, संघाचे सरसंघचालकाचे पद हे विक्रमादित्याचे सिंहासन आहे. या सिंहासनावर बसलेला गुराख्याचा पोर देखील योग्य तोच न्याय करेल.

आज संघाला शंभर वर्षे पूर्ण झालेले आहेत. समाजाला संघातून निर्माण झालेल्या विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय मजदूर संघ, राजकीय क्षेत्रात काम करणारी भाजप अशा संघटना व त्यांचे नेते माहीत आहेत. परंतु ज्यातून या फांद्या निर्माण झाल्या तो वटवृक्ष आणि तो वटवृक्ष ज्या बीजातून उत्पन्न झाला ते बीज म्हणजे पूजनीय डॉक्टर हेडगेवार हे अजूनही समाजाला माहीत नाही.

**थे अकेले आप, लेकिन बीज का था भाव पाया।**
**बो दिया नीज को अमर वट, संघ भारत में उगाया।**
**राष्ट्र ही क्या, अखिल जगत का आसरा हो जाय।**
**और उसकी हम टहनियाँ पत्तियाँ बन जाय।**
**हम सभी का जन्म तव प्रतिबिंब सा बन जाय।**
**और अधुरी साधना चिर पूर्ण बस हो जाय।**

डॉक्टरांनी जे कार्य सुरू केले ते अजूनही अपूर्ण आहे. वर्ष प्रतिपदा हा हिंदू नवीन वर्षाचा प्रारंभ दिवस आहे. हा नवसंकल्प दिवस आहे. स्वार्थत्यागी, राष्ट्रसमर्पित जीवन माझे बनावे यासाठी व्यक्ती म्हणून मी अल्पसा का होईना प्रयत्न करीन, अशा पद्धतीचा संकल्प करणे हा संघनिर्मात्याला केलेला प्रणाम असेल. हा नवसंकल्प हीच खरी वर्ष प्रतिपदा ठरेल.

राष्ट्र देवतेच्या या साधकास शतशत वंदन.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### 'स्वार्थ, सहकार्य आणि संस्कृतीचा संघर्ष' रोखठोक मत

'स्वार्थ, सहकार्य आणि संस्कृतीचा संघर्ष' हा रोखठोकमधील लेख मानवी स्वभावाचे योग्य विश्लेषण करणारा आहे. एखाद्या परिस्थितीत कसलीही टंचाई निर्माण झाली की त्याचा साठा करणे हा मानवी स्वभाव आहे तर तो बंदिस्त ठेवून जास्त किमतीला विकणे ही तापल्या तव्यावर पोळी भाजायची विकृती आहे. आजच्या एलपीजी सिलेंडरची टंचाई ही खूपशी मानवनिर्मितच वाटते कारण सर्वसाधारणपणे सर्वांकडे दोन सिलेंडर असतात व एक संपला की दुसरा लावला जातो व नवीन सिलेंडरसाठी बुकिंग केले जाते. प्रश्न आहे तो बिनानंबरचे सिलेंडर घेणारे यांचा. मुळात आता गॅस कनेक्शन सहजगत्या मिळते तरीही काळ्या बाजारातून सिलेंडर घेणे चुकीचे आहे. त्यांना जर त्रास होत असेल तर ही त्यांच्या चुकीच्या वागण्याची परिणती आहे. एकूणच जेव्हा जग युद्धात लोटले गेलं आहे तिथे आपल्या देशात इंधनाचे दर स्थिर असून इराणने भारताच्या तेल बोटी सोडल्या आहेत त्यामुळे अति टंचाई होण्याची शक्यता कमीच वाटते. मुळात सर्वांनीच आपल्या साठेबाज वृत्तीला लगाम घालणे गरजेचे आहे.

**माया हेमंत भाटकर**

## महत्त्वाचे

### जय शाह यांना उत्कृष्ट योगदानाबद्दल पुरस्कार



**मुंबई** :मुंबईत आयोजित इंडियन बिझनेस लीडर अवॉर्ड्स सोहळ्यात केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष जय शाह यांनी क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दलचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शाह यांनी ऑक्टोबर २०१९ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव म्हणून कार्यभार सांभाळला आणि त्यानंतर त्यांनी आयसीसीच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली. बीसीसीआय मधील त्यांच्या कार्यकाळात भारताने लक्षणीय यश संपादन केले; यामध्ये दोन १९ वर्षांखालील पुरुष विश्वचषक व दोन १९वर्षांखालील महिला विश्वचषकांचा समावेश आहे. वरिष्ठ संघांनीही उत्कृष्ट कामगिरी करत पुरुष टी-२० विश्वचषक २०२४ चे विजेतेपद पटकावले. याशिवाय दोन जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धांमध्ये व पुरुष क्रिकेट विश्वचषक २०२३ मध्ये भारत उपविजेता ठरला.

# संजू सहा षटकांतच सामना जिंकून देऊ शकतो : गंभीर

**नवी दिल्ली, १५ मार्च**

संजू सॅमसनमध्ये अशी जबरदस्त क्षमता आहे की, जेव्हा तो आपल्या सर्वोत्तम व आक्रमक लयीत असतो, तेव्हा तो पॉवरप्लेमध्येच प्रतिस्पर्ध्यांच्या हातून सामना हिरावून घेऊ शकतो, असे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी म्हटले आहे.

पुरुष टी-२० विश्वचषकाच्या निर्णायक टप्प्यावर सॅमसनने अत्यंत महत्वपूर्ण कामगिरी बजावली; उपांत्य व अंतिम सामन्यात त्याने धडाकेबाज अर्धशतके झळकावत भारताला विक्रमी तिसरे विजेतेपद पटकावून देण्यात मोलाचा वाटा उचलला.

अभिषेक शर्माच्या साथीने, सॅमसनने अंतिम सामन्यात पॉवरप्लेमध्येच ९२ धावा काढत न्यूझीलंडकडून सामना हिरावून घेतला.

संजू काय करू शकतो हे आम्हाला ठाऊक आहे; त्याच्या प्रतिभा व आक्रमकतेबद्दल आमच्या मनात कधीच कोणतीही शंका नव्हती. जर त्याला सूर गवसला, तर तो पहिल्या सहा षटकांतच सामना जिंकवून देऊ शकतो, असे गंभीरने सांगितले.



गौतम गंभीर व संजू सॅमसन

न्यूझीलंडविरुद्धच्या विश्वचषकापूर्वीच्या मालिकेत वाईट कामगिरी झाल्यामुळे सॅमसनला विश्वचषकातील सुरुवातीच्या सामन्यांमध्ये अंतिम एकादशमध्ये स्थान मिळाले नव्हते.

मात्र, झिम्बाब्वेविरुद्धच्या जिंकणे अनिवार्य असलेल्या सामन्यात जेव्हा त्याला संधी देण्यात आली, तेव्हा सॅमसनने १५ चेंडूंत २४ धावांची जलद खेळी करत भारताला एक जबरदस्त सुरुवात करून दिली.

भारताच्या शेवटच्या तीन सामन्यांमध्ये त्याने अनुक्रमे ९७ (नाबाद), ८९ आणि ८९ धावांची खेळी केली. मी त्याला जिममध्ये असतानाच याबद्दल सांगितले होते. खरे तर, आम्ही दोघेही एकत्रच सराव करत होतो. मी त्याला सहजच सांगितले की, तू झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्यात खेळणार आहेस. त्यावर तो म्हणाला, येऊ दे तो सामना! आमच्यात अशाच प्रकारची अनौपचारिक चर्चा होत असते. आमच्यातील नाते हे केवळ मुख्य प्रशिक्षक आणि खेळाडू यांच्यातील औपचारिक नाते नाही, तर ते असे नाते आहे जिथे आमच्यातील बहुतेक वैयक्तिक चर्चा सराव सत्रांदरम्यानच होत असतात, असेही गंभीर म्हणाला.

संघात सॅमसनचा समावेश नसताना भारताच्या फलंदाजीच्या अव्वल फळीत- ईशान किशन, अभिषेक शर्मा व तिलक वर्मा या तीन डावखुऱ्या फलंदाजांचा समावेश होता. मात्र, सॅमसनला अंतिम एकादशमध्ये स्थान देण्याचा निर्णय हा डावखुऱ्या फलंदाजांची ती जोडी तोडण्याच्या उद्देशाने घेतला नव्हता, तर संघाच्या फलंदाजीमध्ये अधिक आक्रमकता आणि ताकद वाढवण्याच्या उद्देशाने घेतला होता, असे गंभीरने स्पष्ट केले. गत दीड वर्षापासून मैदानात उतरून शक्य तितका आक्रमक खेळ करायचा अशीच आमची विचारसरणी राहिली आहे, असे तो म्हणाला. अभिषेकला या स्पर्धेचा पहिला टप्पा कठीण गेला, त्याला तीन वेळा शून्य धावांवर बाद व्हावे लागले. मात्र, या सलामीच्या फलंदाजाने जोरदार पुनरागमन केले आणि दोन अर्धशतके झळकावली, यात अंतिम सामन्यातील एका अर्धशतकाचाही समावेश होता.

अभिषेकबद्दल आमच्या मनात यत्किंचितही शंका नव्हती. खरे सांगायचे तर, त्या ड्रेसिंग रूममधील कोणत्याही खेळाडूच्या बाबतीत आमची हीच भावना होती. टी-२० विश्वचषकासाठी देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ज्यांची निवड झाली होती, त्या प्रत्येकावर आमचा नेहमीच पूर्ण विश्वास होता, असे ते म्हणाले.



पदक विजेते भारतीय मुष्टियोद्धे प्रशिक्षणकांसमवेत

# भारताची ५ पदकांसह सांगता

### जागतिक मुष्टियुद्ध फ्युचर्स चषक

**बँकॉक, १५ मार्च**

बँकॉक येथे आयोजित जागतिक मुष्टियुद्ध फ्युचर्स चषक २०२६ स्पर्धेतील भारताच्या मोहिमेची सांगता एकूण पाच पदकांसह झाली. यामध्ये एका सुवर्ण, तीन रौप्य आणि एका कांस्य पदकाचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाच्या युवा मुष्टियुद्ध खेळाडूंची होत असलेली सातत्यपूर्ण प्रगती प्रकर्षाने दिसून येते.

भारताच्या या कामगिरीचे नेतृत्व चंद्रिका पुजारी हिने केले. महिलांच्या ५१ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत तिने अत्यंत वर्चस्वपूर्ण कामगिरी करत, उझबेकिस्तानच्या मार्दोनोव्हा नाझोकतचा एकमताने दिलेल्या निर्णयाद्वारे पराभव केला.

युवा ऑलिम्पिकच्या विविध वजनी गटांमध्ये स्पर्धा करताना, भारताच्या १९ वर्षांखालील पुरुष व महिला संघाने आंतरराष्ट्रीय स्तरावरील दर्जेदार प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध आत्मविश्वासाने भरलेल्या कामगिरीची मालिकाच सादर केली. या स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय पथकातील निम्म्याहून अधिक खेळाडूंनी पदके जिंकून मायदेशी परतीचा प्रवास केला.

जागतिक बॉक्सिंगचे अध्यक्ष गेनाडी गोलोव्हकिन व बीएफआयचे अध्यक्ष अजय सिंग हे या स्पर्धेचे बारकाईने निरीक्षण करत असताना, बँकॉक येथील या प्रदर्शनाने भारताच्या युवा बॉक्सिंग परिसंस्थेची होत असलेली सातत्यपूर्ण जडणघडण दर्शविली. तीन भारतीय बॉक्सर्सनी आपापल्या वजनी गटांच्या अंतिम फेरीत धडक मारल्यानंतर रौप्य पदकांवर समाधान मानावे लागले. गुंजन (४८ किलो) हिला अंतिम फेरीत इंग्लंडच्या प्रतिस्पर्ध्याकडून ५-० अशा निर्णयाने पराभव पत्करावा लागला, तर जॉयश्री देवी (५४ किलो) हिने कडवी झुंज दिली, मात्र तिला अमेरिकेच्या बॉक्सरकडून ४-१ ने पराभूत व्हावे लागले. पुरुषांच्या ५० किलो वजनी गटात, एल. अंबेकर मीतेई यालाही अंतिम लढतीत युक्रेनच्या प्रतिस्पर्ध्याकडून पराभव पत्करावा लागल्याने रौप्य पदकावरच समाधान मानावे लागले. या स्पर्धेच्या सुरुवातीच्या टप्प्यात, राधामणी लोंगजाम (५७ किलो) हिने कांस्य पदक निश्चित केले. उपांत्य फेरीत युक्रेनच्या येव्हानहेलिना पेट्रुकविरुद्ध झालेल्या अत्यंत अटीतटीच्या लढतीत पराभव पत्करावा लागल्याने तिला अंतिम फेरीत प्रवेश करता आला नाही.

### फिरकीपटू कुलदीप यादव मसुरीमध्ये विवाहबंधनात



**डेहराडून** : भारतीय क्रिकेटपटू कुलदीप यादव याने मसुरी या निसर्गरम्य गिरीस्थानात आयोजित एका खाजगी, तरीही अनेक मान्यवरांच्या उपस्थितीने बहरलेल्या समारंभात आपली होणारी पत्नी वंशिका सिंग हिच्याशी विवाह केला. या विवाह सोहळ्याला क्रिकेट विश्वातील अनेक नामवंत व्यक्तींनी उपस्थिती लावली होती. यामध्ये तिलक वर्मा, रिंकू सिंग, युजवेंद्र चहल, मोहम्मद कैफ, आर.पी. सिंग आणि सुरेश रैना यांचा समावेश होता; या सर्वांनी भारताच्या या फिरकी गोलंदाजासोबत हा विशेष प्रसंग साजरा करण्यासाठी एकत्र हजेरी लावली. विवाहाचे विधी आठवड्याच्या सुरुवातीला सुरू झाले होते आणि शनिवारच्या रात्री उशिरापर्यंत सुरू राहिले, ते या लोकप्रिय पर्यटन स्थळावरील एका प्रसिद्ध आलिशान हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आले होते. या समारंभासाठी विवाहस्थळ विशेषत्वाने सजवण्यात आले होते. बागेश्वर धामचे आध्यात्मिक गुरु धीरेंद्र शास्त्री यांनीही या समारंभाला उपस्थिती लावली आणि नवविवाहित जोडप्याला आपले आशीर्वाद दिले.

### भारत-हाँगकाँग आशियाई कप पात्रता सामना ३१ मार्च रोजी

**नवी दिल्ली** : भारतीय पुरुष फुटबॉल संघाचा एएफसी आशियाई चषक सौदी अरब २०२७ पात्रता फेरीतील हाँगकाँगविरुद्धचा अखेरचा सामना ३१ मार्च रोजी कोची येथे खेळला जाणार आहे. एएफसी आशियाई चषक २०२७ स्पर्धेतील स्थान मिळवण्याच्या शर्यतीतून बाहेर पडलेल्या भारताचे ध्येय आपली पात्रता मोहीम विजयासह संपवण्याचे असेल. पात्रता फेरीच्या संदर्भात हा सामना केवळ औपचारिकता असेल, कारण हाँगकाँग संघही स्पर्धेबाहेर झाला आहे, तरीही फिफा क्रमवारीचे गुण मिळवण्याची संधी असल्याने या सामन्याला अजूनही महत्त्व आहे. एएफसी आशियाई चषक सौद अरब २०२७ पात्रता फेरीच्या अंतिम टप्प्यात भारतासाठी हे तिसरे वेगळे यजमान शहर असेल. यापूर्वी गत मार्चमध्ये शिलाँगने बांगलादेशविरुद्धच्या सामन्याचे, तर गत ऑक्टोबरमध्ये मडगावने सिंगापूरविरुद्धच्या सामन्याचे यजमानपद भूषवले होते. या सामन्याद्वारे, कोची येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर भारतीय संघ खेळण्याची घटना १० वर्षांनंतर प्रथमच घडणार आहे. मार्च २०१६ मध्ये, याच मैदानावर भारताचा सामना फिफा विश्वचषक पात्रता फेरीत तुर्कमेनिस्तानविरुद्ध झाला होता.

# सरफराज अहमद निवृत्त

### प्रशिक्षक होण्याचा मार्ग मोकळा

**कराची, १५ मार्च**

पारंपारिक प्रतिस्पर्धी असलेल्या भारतावर मात करत, दोन प्रमुख आयसीसी स्पर्धांचे अंतिम सामने जिंकणारा एकमेव पाकिस्तान संघाचा कर्णधार आणि यष्टिरक्षक-फलंदाज सरफराज अहमद याने रविवारी क्रिकेटच्या सर्व प्रकारांतून निवृत्ती जाहीर केली.

डिसेंबर २०२३ मध्ये पर्थ येथे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी सामन्यात अखेरचा राष्ट्रीय संघाकडून खेळणाऱ्या सरफराजने एका निवेदनाद्वारे आपल्या या निर्णयाची माहिती दिली.

या औपचारिक घोषणेमुळे आता पीसीबीला सरफराजची राष्ट्रीय कसोटी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी दीर्घकालीन कालावधीसाठी नियुक्ती करणे शक्य होईल.



कसोटी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जागा गत काही काळापासून रिक्त होती. गत वर्षी कसोटी संघाचे हंगामी मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहणारे अष्टपैलू खेळाडू अझहर महमूद यांचा करार पीसीबीने संपुष्टात आणल्यानंतर हे पद रिक्त झाले होते.

मे महिन्यात ३९ वर्षांचा होणाऱ्या सरफराजची अलीकडेच पाकिस्तानच्या १९ वर्षांखालील संघाचा व शाहीन संघांचा मार्गदर्शक व व्यवस्थापक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर आता त्याची राष्ट्रीय निवड समितीचा सदस्य म्हणूनही नियुक्ती करण्यात आली आहे.

### रोहित डावाची सुरुवात करेल : हरभजन सिंग

**नवी दिल्ली, १५ मार्च**

आगामी इंडियन प्रीमियर लीगमध्ये मुंबई इंडियन्सकडून रोहित शर्मा डावाची सुरुवात करेल व त्याच्यासोबत रायन रिकेल्टन किंवा क्विंटन डी कॉक फलंदाजी करतील. दोघांना अव्वल फळीत एकत्र खेळविणे कठीण होईल, कारण संघात आधीच अनेक भारतीय फलंदाज आहेत, असे मत माजी भारतीय फिरकी गोलंदाज हरभजन सिंगने व्यक्त केले. आयपीएल २०२६ ची उलटी गिनती सुरू आहे आणि मुंबई इंडियन्सच्या अंतिम एकादशवर चर्चा सुरू असताना हरभ जन सिंगने मुंबई इंडियन्स संघाच्या सलामी व फिरकी विभागाबाबत आपले मत व्यक्त केले. फिरकी विभागात हरभजनने अल्लाह गझनफर किंवा मिशेल सॅण्टनर यापैकी कोणाला आघाडीचा गोलंदाज ठरवण्याची शिफारस केली. गझनफरमध्ये विविध प्रकार आहेत, तर सॅण्टनरला काही परिस्थितींमध्ये चेन्नईसारख्या फिरकी-अनुकूल मैदानावर संधी मिळू शकते, असेही तो म्हणाला.

# सूर्यवंशीची फलंदाजी केवळ नशिबावर अवलंबून : उथप्पा

**नवी दिल्ली, १५ मार्च**

युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी हुशार खेळाडू आहे, पण त्याची फलंदाजी बरेच काही नशिबावर अवलंबून आहे. केवळ नशिबावर टिकणे दीर्घकाळ उच्च-स्तरीय क्रिकेटमध्ये कठीण आहे व या हंगामात वैभवला बरेच काही शिकावे लागेल, असे मत माजी भारतीय क्रिकेटपटू रॉबिन उथप्पाने व्यक्त केले.



राजस्थान रॉयल्सचे युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी आयपीएलमध्ये अलिकडेच आपले कौशल्य सिद्ध करत चर्चेत आला आहे. आयपीएल २०२५ मध्ये सात सामन्यांत शतक झळकावून त्याने आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्याचबरोबर १९ वर्षांखालील विश्वचषकात इंग्लंडविरुद्ध ८० चेंडूत १७५ धावा करत त्याने उल्लेखनीय कामगिरी केली. उथप्पाने आयपीएल २०२६ आधी वैभवच्या फलंदाजीबाबत मत व्यक्त केले.

राजस्थान रॉयल्सने आयपीएल २०२६ साठी वैभवला कायम ठेवले असून, तो रियान परागच्या नेतृत्वाखाली खेळेल. गत हंगामात वैभवने २५२ धावा केल्या होत्या, परंतु सर्व सामन्यांत खेळण्याची संधी मिळाली नव्हती. तो या हंगामात सलग खेळून आपली चमक दाखवेल, अशी अपेक्षा आहे.

# दक्षिण आफ्रिकेचा न्यूझीलंडवर ७ गड्यांनी विजय

**माऊंट माऊन्गानुई, १५ मार्च**

चार नवोदित खेळाडूंचा समावेश असलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या संघाने पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात विश्वचषक उपविजेत्या न्यूझीलंडवर ७ गड्यांनी विजय नोंदविला.

रविवारी प्रथम फलंदाजी करणाऱ्या न्यूझीलंडला १४.३ षटकांत अवघ्या ९१ धावांवर गुंडाळल्यानंतर दक्षिण आफ्रिकेने १६.४ षटकांत ३ गडी गमावित ९३ धावा काढून लक्ष्य साधले.

दक्षिण आफ्रिकेच्या डावाची सुरुवात करताना सलामीवीर कॉनर एस्टरहुइझेनने ४८ चेंडूंत नाबाद ४५ धावांची खेळी करीत संघाचा डाव समर्थपणे सावरला, त्यामुळे दक्षिण आफ्रिकेने २० चेंडू शिल्लक असतानाच विजय मिळवला. त्याला पदार्पण करणाऱ्या डायन फॉरेस्टरची चांगली साथ लाभली. त्याने एस्टरहुइझेनसोबत सहा षटकांहून अधिक काळ फलंदाजी केली आणि अखेरीस तो १६ धावांवर नाबाद राहिला.

१७ व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर काईल जेमिसनच्या गोलंदाजीवर षट्कार ठोकत एस्टरहुइझेनने विजयासाठी आवश्यक असलेल्या धावा पूर्ण केल्या.

न्यूझीलंडच्या फिरकी गोलंदाजांनी सामन्यात चुरस निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कर्णधार मिचेल सॅण्टनरने आपल्या चार षटकांत केवळ ८ धावा देत १ बळी मिळवला.मला वाटते की आमच्या सर्व रणनीती यशस्वी ठरल्या आणि आमच्या गोलंदाजांनी त्यांची अंमलबजावणी अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने केली, असे दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार केशव महाराज म्हणाला. आमची गोलंदाजी फळी जरी नवखी (तरुण) असली, तरी आम्ही त्यांना जे काही करण्यास सांगितले, ते त्यांनी समर्थपणे करून दाखवले, असेही तो म्हणाला.



पाटणा येथे 'नशा मुक्त बिहारसाठी दौड' या पाटणा मॅराथॉनच्या शुभारंभप्रसंगी भारतीय बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधू (डावीकडून दुसरी) आणि इतर मान्यवर

# महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी पुणे शहर संघाची निवड

**पुणे, १५ मार्च**

६८ व्या महाराष्ट्र केसरी व वरिष्ठ राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी पुणे शहर संघाची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय तालीम संघाच्या वतीने आयोजित पुणे शहर संघ निवड चाचणी स्पर्धेतून विविध वजनी गटांतील कुस्तीगीरांची निवड करण्यात आली. यामध्ये मानाच्या महाराष्ट्र केसरी (८६ ते १२५ किलो) गटात श्रेयस अनिल होळकर पुणे शहराचे प्रतिनिधित्व करणार आहे.

निवड झालेले इतर खेळाडू व त्यांचे वजनी गट :



५७ किलो : स्वप्निल शेलार, ६१ किलो : पृथ्वीराज कोंडे, ६५ किलो : तनिष्क कदम, ७० किलो : रावसाहेब घोरपडे, ७४ किलो : करत फुलमाळी, ७९ किलो : मेघराज काजळे, ८६ किलो : वैभव तांगडे, ९२ किलो : अनिकेत कोकाटे, ९७ किलो : अथर्व चव्हाण

या निवड चाचणीचा बक्षीस वितरण समारंभ आमदार बापूसाहेब पठारे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, राष्ट्रीय तालीम संघाचे सरचिटणीस शिवाजीराव बुचडे, जयसिंग पवार, वस्ताद सुभाष पोकळे, मधुकर फडतरे, अविनाश टकले, माऊली मांगडे, योगेश पवार, सुनील देवकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

शिवाजीराव बुचडे यांनी निवड झालेल्या सर्व खेळाडूंना आवश्यक कागदपत्रांसह राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# सौदी अरब, बहरीनमधील फॉर्म्युला वन शर्यती रद्द

### युद्धाचा क्रीडा विश्वावर परिणाम

**रियाध, १५ मार्च**

मध्य पूर्वेतील इस्रायल आणि इराणमधील युद्धाचा परिणाम आता राजकारण आणि अर्थशास्त्रापुरता मर्यादित नाही, तर क्रीडा जगतावरही त्याचा परिणाम झाला आहे. गंभीर सुरक्षा धोक्यांमुळे, फॉर्म्युला वन व्यवस्थापनाने सौदी अरब व बहरीनमध्ये एप्रिलमध्ये होणारे मोठे कार्यक्रम पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.

या प्रदेशातील अनेक देशांमध्ये प्रत्युत्तरात्मक हल्ल्यांमध्ये वाढ होत असताना हा निर्णय घेण्यात आला आहे, त्यामुळे खेळाडू व प्रेक्षकांचे जीवन धोक्यात येऊ शकले असते. सध्याच्या परिस्थितीत अशा मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे सुरळीत आयोजन अशक्य आहे आणि त्यामुळे अरब



देशांच्या प्रतिमेवरही परिणाम होईल असे तज्ज्ञांचे मत आहे. सध्याच्या युद्धादरम्यान एप्रिलमध्ये होणाऱ्या दोन्ही प्रमुख शर्यती आयोजित केल्या जाऊ शकत नाहीत. इस्रायली आणि अमेरिकेने इस्रायली लष्करी कारवाईनंतर या प्रदेशात झालेल्या प्रत्युत्तरात्मक हल्ल्यांमुळे बहरीन आणि सौदी अरेबियामधील सुरक्षा परिस्थितीवर गंभीर परिणाम झाला आहे. संघ सदस्य, चालक व चाहत्यांची सुरक्षा ही त्यांची सर्वोच्च प्राथमिकता आहे, त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव यावर्षीची शर्यत होणार नाही, असे फॉर्म्युला वन व त्याची प्रशासकीय संस्था, एफआयएने अधिकृतपणे जाहीर केले आहे. बहरीन ग्रांप्री मूळतः १२ एप्रिल रोजी नियोजित होती, त्यानंतर १९ एप्रिल रोजी जेद्दाह येथे सौदी अरब ग्रांप्री होणार आहे. या परिस्थितीत शर्यत रद्द करणे हा एक कठीण निर्णय होता, परंतु शांतता आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक पाऊल होते, असे एफ१ चे मुख्य कार्यकारी अधिकारी स्टेफानो डोमेनिकली यांनी सांगितले. रद्द झालेल्या दोन शर्यतींच्या जागी एप्रिलमध्ये व्यवस्थापनाने दुसऱ्या देशात कोणत्याही पर्यायी शर्यती न आयोजित करण्याचा निर्णय घेतला.

जागतिक सुरक्षा बदल आणि जोखीम लक्षात घेता सौदी अरब व बहरीनमध्ये शर्यती आयोजित करणाऱ्या स्थानिक कंपन्यांनीही या निर्णयाला पूर्ण पाठिंबा दिला आहे.

### केकेआरचा 'तो' सर्वात वाईट निर्णय : कुंबळे

**नवी दिल्ली, १५ मार्च**

भारताचा माजी क्रिकेटपटू अनिल कुंबळेने कोलकाता नाईट रायडर्सच्या २०२५ मेगा लिलावापूर्वी घेतलेल्या निर्णयावर टीका केली आहे. २०२४ मध्ये केकेआरने आयपीएल ट्रॉफी जिंकली असतानाही त्यांनी श्रेयस अय्यर व फिल साल्टला करारमुक्त केले. हा संघाचा आतापर्यंतचा सर्वात वाईट निर्णय होता, असे मत कुंबळेने व्यक्त केले.

विजय मिळवणाऱ्या प्रमुख खेळाडूंना संघात कायम राखणे महत्त्वाचे आहे, अन्यथा संघ ट्रॉफी दावेदार राहू शकत नाही. अय्यर नवीन फ्रॅन्चायझीत जाऊन अंतिम फेरीत पोहोचला, तर फिल साल्टही संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती, याकडेही कुंबळेने लक्ष वेधले.

# मेदवेदेवकडून अल्काराझला पराभवाचा धक्का

### इंडियन वेल्सच्या अंतिम फेरीत सिनरशी गाठ

**इंडियन वेल्स, १५ मार्च**

डॅनिल मेदवेदेवने अव्वल मानांकित कार्लोस अल्काराझला या वर्षातील पहिला पराभवचा धक्का दिला आणि ६-३, ७-६ (३) अशा विजयासह तो इंडियन वेल्स टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल झाला.

रशियाचा ११ वा मानांकित खेळाडू मेद्वेदेव याचा सामना आता इटलीच्या दुसऱ्या मानांकित खेळाडू जानिक सिनरशी होईल. सिनरने अलेक्झांडर झ्वेरेव्हचा ६-२, ६-४ असा पराभव केला.

अल्काराझने या वर्षी सलग १६ सामने जिंकले होते; यामध्ये ऑस्ट्रेलियन ओपन आणि कतार ओपन या स्पर्धांमधील विजेतेपदांचाही समावेश होता. मात्र,



मेदवेदेवचे अभिनंदन करताना कार्लोस अल्काराझ

मेद्वेदेवने अल्काराझ विरुद्ध सिनर अशी अंतिम लढत होण्याची शक्यता संपुष्टात आणली. अल्काराझविरुद्धच्या मागील चारही सामन्यांमध्ये मेदवेदेवला पराभवाचा सामना करावा लागला होता, यात २०२४ च्या इंडियन वेल्स अंतिम सामन्यातील पराभवाचाही समावेश होता. २०२३ च्या यू.एस. ओपन उपांत्य फेरीनंतर अल्काराझवर मेदवेदेवचा हा पहिलाच विजय ठरला.

महिला दुहेरीच्या अंतिम सामन्यात, टेलर टाउनसेंड आणि कॅटेरिना सिनियाकोवा या जोडीने ॲना डॅनिलिना आणि अलेक्झांड्रा क्रुनिच या जोडीचा ७-६ (४), ६-४ असा पराभव केला. हा विजय टाउनसेंडसाठी इंडियन वेल्समधील पहिला, तर सिनियाकोवासाठी दुसरा विजय ठरला. सिनियाकोवाने २०२३ मध्येही आपली दीर्घकालीन जोडीदार बार्बोरा क्रेजसिकोवा हिच्यासोबत या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले होते.

पुरुष दुहेरीच्या अंतिम सामन्यात, गिदो आंद्रेओझी आणि मॅन्युएल गिनार्ड या जोडीने आर्थर रिंडरकनेश आणि व्हॅलेंटिन वाचेरो या जोडीचा ७-६ (३), ६-३ असा पराभव केला. मिश्र दुहेरीत, बेलिंडा बेन्सिक आणि फ्लाव्हिओ कोबोली यांनी अव्वल मानांकित गॅब्रिएला डाब्रोव्स्की आणि लॉयड ग्लासपूल यांचा ६-३, २-६, १०-७ असा पराभव केला.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### सिल्व्हर झोन ऑलिम्पियाड परीक्षेतील यशसीव विद्यार्थ्यांचा एकलव्य शाळेत गौरव

**नंदुरबार** : डिसेंबरमध्ये सिल्व्हर झोन ऑलिम्पियाडतर्फे घेण्यात आलेल्या इंग्लिश ऑलिम्पियाड परीक्षा २०२५-२६ मध्ये एकलव्य विद्यालयाला ११ पदके मिळाली. त्यात चार सुवर्ण, चार रजत, तीन कांस्यपदकांचा समावेश आहे. यात प्रणाली विजयसिंग ईशी, वंश परेश चव्हाण, कृष्णा किशोर मराठे, युवराज शांताराम माळी यांना सुवर्ण, जिया फातेमा अन्सार शेख, रेवा रवींद्र पवार, नचिकेत विवेक अर्थेकर, अर्णव गौरीशंकर धुमाळ यांना रजत आणि सिद्धी शैलेश श्रॉफ, मृणाली भगवान कुवर व दिव्यम सचिन कुमावत यांना कांस्यपदक मिळाले. परीक्षेतून दुसऱ्या स्तरासाठी प्रणाली विजयसिंह ईशी व वंश परेश चव्हाण यांची निवड झाली. यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुहास नटावदकर, माजी प्राचार्या सुहासिनी नटावदकर यांनी गौरव केला. व्यासपीठावर ऑलिम्पियाड स्पर्धा संस्था समन्वयक प्रकाश चौधरी, मिलिंद वडनगरे, धर्मेंद्र मराठे, टीका पाडवी, डॉ. गिरीश पवार, दीपक माळी, मोनाली त्रिकाळ, कन्हैया बोरसे, मीनल वसावे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना भूपेंद्र पाटील, संतोष पाटील, राजेंद्र आंधळे, राजेंद्र पाटील, मोनाली त्रिकाळ, सुनील पाटील, कन्हैय्या बोरसे यांचे मार्गदर्शन लाभले. संतोष पाटील यांनी सूत्रसंचालन केले. राजेंद्र पाटील यांनी आभार मानले.



### जी. टी. पाटील महाविद्यालयातील भूगोलच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासदौरा

**नंदुरबार** : शहरातील जी. टी. पाटील महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे अभ्यासदौरा काढण्यात आला. प्राचार्य डॉ. एम. जे. रघुवंशी, संस्थेचे समन्वयक डॉ. एम. एस. रघुवंशी, उपप्रचार्य प्रा. डॉ. संदीप पाटील व भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. एफ. आर. खांडेकर यांच्या मार्गदर्शनातून अभ्यासदौऱ्याचे नियोजन करण्यात आले. कोकणातील विविध भौगोलिक क्षेत्रांना भेट दिली. अभ्यासदौऱ्यात भूगोल विषयातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष पदवी व प्रथम व द्वितीय पदव्युत्तर (भूगोल) वर्गातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. क्षेत्रभेटीदरम्यान महाराष्ट्रातील अष्टविनायकापैकी महड व पाली, महाबळेश्वर, प्रतिबालाजी आदी धार्मिक स्थळांना, महाड व रायगड या ऐतिहासिक स्थळाला, काशीद, दिवेआगार, हरिहरेश्वर आदी समुद्रकिनारी स्थळांना, तर महाबळेश्वर आणि पाचगणी या थंड हवेच्या ठिकाणांना भौगोलिकदृष्ट्या वैशिष्ट्य असलेल्या क्षेत्रांचा अभ्यास तसेच पर्यावरण समृद्धतेचा व बदलांचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला. यासाठी प्रा. डॉ. एफ. आर. खांडेकर, प्रा डॉ. आर. आर. देवरे, प्रा. डॉ. संजय कपले, प्रा. तेजश्री शिरसाठ यांनी प्रत्यक्ष क्षेत्रभेटीमध्ये विविध भौगोलिक घटकांची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. प्रा. डॉ. अमोल भुयार, प्रा. एम. बी. पाटील, प्रा. मोईन शेख प्रा. ममता पाटील, डॉ. संदीप भावसार, प्रा. गंगाराम वसावे, डॉ. मनीष सावंत, बी. बी. पिंपळे यांनी सहकार्य केले.



### डॉ. समिधा नटावदकरांचा शिवकन्या पुरस्काराने गौरव

**नंदुरबार** : 'मानवसेवा हीच ईश्वरसेवा आहे' या उक्तीप्रमाणे डॉ. समिधा नटावदकर यांनी जिल्ह्यात मोफत ग्रामीण भागात वैद्यकीय शिबिरे घेत मार्गदर्शनहगी केले. रेवा फाउंडेशनच्या माध्यमातून गरीब व गरजू लोकांना कपडे, अन्नदानासह रक्तदान शिबिर तसेच सॅनिटरी नॅपकिन व वृक्षारोपणासह विविध सामाजिक उपक्रमही राबविले. याची दखल घेत नाशिक येथील शिवपुत्र छत्रपती संभाजीराजे विभागातर्फे बालरोगतज्ज्ञ व रेवा फाउंडेशनच्या डॉ. समिधा नटावदकर यांना शिवकन्या पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आरोग्यावर तसेच अंधश्रद्धा निर्मूलन यावर आधारित कामांचे मूल्यमापन पाहिले गेले. पुरस्कार वितरण नाशिक येथे झाले. याप्रसंगी महापौर हिमगौरी आडके-आहेर, निवृत्त न्या. वसंतराव पाटील, न्या. हेमंत धात्रक, वीरपत्नी हर्षदा खैरनार, शिवपुत्र संभाजीराजे संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील, सामाजिक कार्यकर्ते संतोष मराठे आदी उपस्थित होते. या वेळी डॉ. नटावदकर यांनी, पुरस्कार प्रेरणा देतात व प्रेरणा कार्याच्या शिखराकडे नेत असते व माणसाची मानसिकता ही प्रबळ होत असते, असे सांगितले.



### मोरंबा आश्रमशाळेत आत्मरक्षा अभियानांतर्गत प्रशिक्षण

**तळोदा** : मोरंबा (ता. अक्कलकुवा) येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शासकीय आश्रमशाळेत राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा अभियानांतर्गत विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेतर्फे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांतील शाळांमध्ये १५ लाख मुलींसाठी राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा अभियान राबविले जात आहे. अभियानांतर्गत जिल्ह्यातील २३३ शाळांमध्ये विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. अभियानांतर्गत मोरंबा येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शासकीय आश्रमशाळेत अभियानांतर्गत विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले. कार्यक्रमास मुख्याध्यापक सूरज पावरा, जिल्हा समन्वयक दीपक पाठक, प्रणाली चव्हाण यांची उपस्थिती होती.

### बंगळुरू येथे विज्ञानसंवर्धन कार्यक्रमासाठी अक्कलकुवा येथील जयेंद्र पावराची निवड

**अक्कलकुवा** : येथील जवाहर नवोदय विद्यालयाचा अकरातील जयेंद्र पावराची बंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स संस्थेत आयोजित विज्ञानसंवर्धन कार्यक्रमासाठी निवड झाली आहे. विज्ञानसंवर्धन हा विज्ञानावर आधारित एक महिन्याचा विशेष शैक्षणिक कार्यक्रम असून, तो २७ एप्रिल ते ३० मेदरम्यान होणार आहे. कार्यक्रमासाठी देशातील विविध प्रांतांतील शाळांतून निवडक प्रतिभावान विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना अत्याधुनिक प्रयोगशाळेत काम करण्याची संधी, विविध वैज्ञानिक प्रयोग, नामांकित वैज्ञानिकांचे मार्गदर्शन तसेच संशोधनप्रक्रियेची प्रत्यक्ष ओळख करून देण्यात येणार आहे. कार्यक्रमासाठी नंदुरबार जिल्ह्याला प्रथमच जयेंद्र पावरा याच्या माध्यमातून संधी मिळाली आहे. त्याचा या यशाबद्दल नवोदय विद्यालय समितीच्या अध्यक्षा तथा जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, प्राचार्य विलास पाटील व पालकांनी गौरव केला.



# रमजानमुळे टरबूज, खरबुजांना वाढली मागणी

## शिरपूरला ग्रामीण भागातून होतेय दोन-तीन मेटॅडोर भरून आवक

**तभा वृत्तसेवा**
**शिरपूर, १५ मार्च**

उन्हाळ्यासोबतच रमजान महिना सुरू झाला असून, अंतिम टप्प्यात आहे. रमजान महिन्यामुळे टरबूज आणि खरबुजाची आवक वाढली असून, ग्रामीण भागातून रोज बाजारात दोन ते तीन मेटॅडोरमध्ये टरबूज व खरबूज भरून विक्रीसाठी सध्या येऊ लागले आहेत. मुस्लिम बांधव जास्त प्रमाणात सायंकाळी रोजा हीच फळे खाऊन सोडतात. त्यामुळे या फळाची सध्या मोठ्या प्रमाणावर मागणी वाढली आहे. आता प्रखर उन्हाळ्याला सुरुवात झाली असून, सर्वाधिक थंडगार व गोड फळ म्हणून टरबूज व खरबुजाला ओळखले जाते. तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी टरबूज व खरबूज या फळांची लागवड केली आहे. या फळांना कडाक्याच्या उन्हाळ्यात



मोठी मागणी राहते. त्यातच सध्या मुस्लिम बांधवांचा रमजान महिनाही सुरू आहे. सर्वच बांधव दिवसभर रोजा धरतात आणि सायंकाळी टरबूज व खरबूज खाऊनच उपवास सोडतात. उन्हाळा सुरू झाल्याने सर्वजण ही फळे खरेदी करू लागले आहेत. मागणीही वाढल्याने तऱ्हाडी (ता. शिरपूर) येथील बाजारात ही फळे विक्रीसाठी सध्या अधिक येऊ लागली आहेत. तसेच नारळ, पपई, अंगुर आदी फळांची दुकाने थाटण्यात आली आहेत.

दरम्यान, गत महिन्यात टरबूज व खरबूज कवडीमोल दराने शेतकऱ्यांना विकावे लागले. मात्र, सध्या रमजान महिना व उन्हाळा एकाच वेळी आल्याने या फळांच्या मागणीत रोज वाढ होऊ लागली आहे. रोज विविध वाहनांतून ही फळे विक्रीसाठी सकाळपासूनच शेतकरी येत आहेत. गत महिन्याच्या तुलनेत या महिन्याच्या सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांच्या या फळांना बऱ्यापैकी भाव मिळू लागला आहे, असे विक्रेत्यांनी सांगितले.

> थंडगार व गोड फळ म्हणून टरबूज व खरबूज असतात. आता रमजान महिना सुरू झाला असून, तो अंतिम टप्प्यात आहे. मुस्लिम बांधव जास्त प्रमाणात सायंकाळी रोजा हीच फळे खाऊन सोडतात. ग्रामीण भागातून रोज बाजारात दोन ते तीन मेटॅडोरमध्ये टरबूज व खरबूज भरून विक्रीसाठी सध्या येत आहेत. रमजान महिन्यामुळे या फळांना बऱ्यापैकी भावही मिळत आहे.
>
> **- किरण भोई (घाऊक फळ विक्रेता, शिरपूर)**

### सुपर लीग स्पर्धेसाठी सेक्रेटरी संघात शिरपूरचा संमेक जगतापची निवड



**शिरपूर** : महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित दोनदिवसीय खुल्या गटाच्या सुपर लीग क्रिकेट स्पर्धेसाठी धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा अष्टपैलू क्रिकेटपटू संमेक संजय जगताप याची सेक्रेटरी संघात निवड करण्यात आली आहे. पुणे येथे नुकत्याच खुल्या गटाची आमंत्रित क्रिकेट स्पर्धा झाली. स्पर्धेत संमेक जगताप याने धुळे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करीत संपूर्ण स्पर्धेत फलंदाजीत ३६३ धावा केल्या. यात त्याच्या दोन शतकांचा समावेश होता. त्यासोबत गोलंदाजीत भेदक मारा करीत १९ बळीही घेतले. संमेक जगतापने आपल्या अप्रतिम अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले. संमेक हा शिरपूर तालुका क्रिकेट असोसिएशनच्या आर. सी. पटेल फॉर्मसी महाविद्यालयाच्या मैदानावर गेल्या १२ वर्षांपासून तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली नियमित तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेत आहे. या निवडीबद्दल धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल व सल्लागार तथा माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांनी त्याचा गौरव केला.

### ऑटोरिक्षा, टॅक्सी परवान्यांचे खुले धोरण बंद

**धुळे** : राज्यातील विविध संघटनांकडून करण्यात आलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर ऑटोरिक्षा व टॅक्सी परवान्यांचे खुले धोरण बंद करण्याबाबत ९ मार्च २०२६ रोजी परिवहनमंत्र्यांनी निर्देश दिले आहेत. या निर्देशानुसार नवीन ऑटोरिक्षा व टॅक्सी परवान्यासाठी इरादापत्र देण्याची प्रक्रिया सध्या स्थगित करण्यात आली असून, यासंदर्भात संघटनांनी तसेच नवीन ऑटोरिक्षा व टॅक्सी घेण्याचा विचार करणाऱ्यांनी याची नोंद घ्यावी, असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल कदम यांनी कळविले आहे.



# तळोदा एकात्मिक विकास प्रकल्पांतर्गत पथराई येथे क्रीडा स्पर्धा उत्साहात

## पाचशेवर अधिकारी, कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**तळोदा, १५ मार्च**

तळोदा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या शासकीय अनुदानित आश्रमशाळा व वसतिगृहातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दोनदिवसीय क्रीडा स्पर्धा पथराई येथे उत्साहात झाल्या. स्पर्धांमध्ये सुमारे पाचशे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

पथराई येथील के. डी. गावित शैक्षणिक संकुलाच्या क्रीडांगणावर शनिवारी (१४ मार्च) सकाळी देवमोगरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्रकुमार गावित यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करून क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. प्रकल्प अधिकारी अनय नावंदर अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून देवमोगरा एज्युकेशन सोसायटीच्या सचिव विभूती गावित, नंदुरबार जिल्हा क्रीडा अधिकारी संघटनेच्या सचिव ऋक्षिका गावित, सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रभात गायकवाड, उत्तम राऊत, देवेंद्र वाणी, अरविंद वळवी, बबन मुगळे आदी उपस्थित होते.

स्पर्धांमध्ये क्रिकेट, कबड्डी, व्हॉलिबॉल, लांब उडी, उंच उडी, बुद्धिबळ अशा सांघिक व व्यक्तिगत क्रीडाप्रकारांचा समावेश होता. तालुकानिहाय अनुदानित व शासकीय अशा गटांमध्ये या क्रीडा स्पर्धेतील सामने खेळविण्यात आले. महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही उत्साहपूर्ण सहभाग पाहायला मिळाला.

विद्यार्थ्यांसोबत शिक्षकांच्या सर्वांगीण विकासाचे धोरण आदिवासी विकास विभागाने आखले त्यानुसार सांघिक व व्यक्तिगत क्रीडाप्रकारात स्पर्धा घेण्यात आल्या. तळोदा प्रकल्प हे नाशिक विभागातील पहिले असल्याची माहिती प्रास्ताविकात बबन मुगळे यांनी दिली.

या क्रीडा स्पर्धांमध्ये सर्व खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रकल्प कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसह अनुदानित शासकीय आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उत्स्फूर्त सहभागी झाले.

# देवरे अभियांत्रिकीत 'इमसेट' शोधनिबंध सादरीकरण परिषद

## पावणेचारशेवर प्राध्यापकांसह विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**धुळे** : शहरातील श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजीराव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयात इंटरनॅशनल मल्टिडिसिप्लिनरी कॉन्फरन्स ऑन इमर्जिंग ट्रेंड्स इन रिसर्च, इनोव्हेशन्स अँड टेक्नॉलॉजीज अर्थात इमसेट-२०२६ शोधनिबंध सादरीकरण परिषद घेण्यात आली. परिषदेत पावणेचारहून अधिक प्राध्यापकांसह ८० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

शिक्षणतज्ज्ञ, संशोधक, उद्योगतज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांकडील अभिनव संकल्पना आणि अलीकडील संशोधन निष्कर्ष देवाणघेवाण करण्यासाठी जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा परिषदेचा उद्देश होता. याप्रसंगी सीओईपी तांत्रिक विद्यापीठाचे (पुणे) कुलगुरू प्रा. डॉ. सुनील भिरुड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे (लोणेरे) माजी कुलगुरू डॉ. व्ही. आर. शास्त्री, महाविद्यालयाचे अध्यक्ष सुभाष देवरे, संस्थेचे उपाध्यक्ष प्रफुल्ल सिसोदे, प्राचार्य प्रा. डॉ. राहुल बारजिभे (भुसावळ), प्राचार्य व परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. हितेंद्र पाटील, तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा. संजय हिरे, परिषदेचे सचिव प्रा. डॉ. योगेश पाटील व विभाग प्रमुख व्यासपीठावर उपस्थित होते.

अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, उपयोजित विज्ञान, भाषा वाणिज्य आणि



व्यवस्थापन या तीन विषयांतील नावीन्यपूर्ण संकल्पनांवर लक्ष केंद्रित करणे या स्पर्धेचा औपचारिक प्रारंभ महाविद्यालय सभागृहात उत्साहात झाला. स्पर्धेत शंभरावर शोधनिबंध सादर करण्यात आले. त्यात ३७५ हून अधिक प्राध्यापक ऑनलाइन-ऑफलाइन प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. अभियांत्रिकीच्या विविध शाखांमधील ८० विद्यार्थीही सहभागी झाले होते.

प्राचार्य प्रा डॉ हितेंद्र पाटील यांनी परिषदेच्या आयोजनामागील संकल्पना मांडली. प्रा. डॉ. सुनील भिरुड यांनी उद्घाटनपर सत्रात प्राध्यापकांना मार्गदर्शन करताना आर्टिफिशियल इंटेलिजन्स प्रणालीचा उपयोग करून विद्यार्थ्यांना प्रभावी शिक्षण देणे शक्य आहे व विद्यार्थ्यांसाठीही एआय प्रणाली सुलभ असल्याने त्याचा उपयोग करावा, असे आवाहन केले. प्रा. डॉ. व्ही. आर. शास्त्री यांनी, गेल्या काही वर्षांत भारताने सर्व क्षेत्रांत केलेल्या प्रगतीचा आढावा घेत भारत विकसित होत असून, जागतिक महासत्ता बनण्याकडे देशाची वाटचाल सुरू असल्याचे सांगितले, प्राध्यापकांनी सदैव नवनवे तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी सज्ज असावे, असे आवाहन केले.

सुभाष देवरे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते परिषदेच्या विशेष जर्नलचे प्रकाशन करण्यात आले. माजी विद्यार्थिनी व भारतीय सैन्यदलातील अधिकारी सलोनी बोरसे यांचा याप्रसंगी सन्मान करण्यात आला. प्रा. डॉ. सुरेखा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सचिव प्रा. डॉ. योगेश पाटील यांनी आभार मानले. विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. डी. सूर्यवंशी, प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रा. डॉ. इंद्रभान बोरसे, प्रा. डॉ. विनोद शिंदे, प्रा. डॉ. जितेंद्र व्यास, प्रा. डॉ. अभिजित मोरे यांनी परिषदेचे संयोजन केले. संस्थेचे अध्यक्ष कुणाल पाटील, महाविद्यालयाचे अध्यक्ष सुभाष देवरे, उद्योजक विलास देवरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात अभियांत्रिकी महाविद्यालयाने इमसेट-२०२६ परिषदेचे संयोजन केले.

# राज्य शासनाचे विविध कृषी पुरस्कार आता 'डिजिटल'

## पारंपरिक पद्धतीला फाटा; अर्ज ऑनलाइन पद्धतीने करा : शंकर किरवे

**नंदुरबार** : महाराष्ट्र राज्य कृषी विभागातर्फे देण्यात येणारे विविध कृषी पुरस्कार आता पूर्णपणे डिजिटल झाले आहेत. या पुरस्कारांसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि वेळबद्ध करण्यासाठी विभागाने स्वतंत्र ऑनलाइन संगणकीय प्रणाली विकसित केली असून, २०२५ पासूनचे सर्व अर्ज आता केवळ ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारले जाणार आहेत, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी दिली.

यापूर्वी कृषी पुरस्कारांसाठीचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाइन पद्धतीने सादर करावे लागत होते. या प्रक्रियेत कागदपत्रांची जुळवाजुळव करणे, छपाई आणि पोस्टाचा खर्च यांमुळे अनेक इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. तसेच पडताळणी आणि संकलनासाठी बराच वेळ लागत असे. हीच अडचण लक्षात घेऊन कृषी विभागाने ही प्रक्रिया ऑनलाइन केली आहे.

> **पुरस्कारांची व्याप्ती**
>
> या प्रणालीद्वारे राज्यातील शेतकरी, महिला, संस्था आणि कृषी विभागातील कर्मचारी विविध पुरस्कारांसाठी अर्ज करू शकतात. त्यात डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण व शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, जिजामाता कृषिभूषण, उद्यानपंडित आणि युवा शेतकरी पुरस्कार, सेंद्रिय शेतीसाठी कृषिभूषण पुरस्कार, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न (कृषी विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी) यांचा समावेश आहे.

**शेतकऱ्यांना होणारे फायदे**

शेतकऱ्यांना आता कार्यालयात न जाता घरबसल्या अर्ज सादर करता येईल. छपाई, झेरॉक्स, प्रवास आणि पोस्टाचा खर्च वाचणार आहे. अर्ज सध्या कोणत्या टप्प्यावर आहे, याची माहिती ऑनलाइन पाहता येईल. एकदा अपलोड केलेली कागदपत्रे पुन्हा देण्याची गरज भासणार नाही.

**असा करा अर्ज**

इच्छुक शेतकरी, संस्था किंवा गटांनी कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) जाऊन 'कृषी पुरस्कार' या टॅबमध्ये अर्ज सादर करावा. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी किरवे यांनी केले आहे.

# खेळाडूंच्या ५ टक्के आरक्षणासाठी क्रीडा ई-प्रमाण प्रणाली कार्यान्वित

**आता घरबसल्या मिळणार प्रमाणपत्र**

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, १५ मार्च**

राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळावा यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने क्रीडा ई-प्रमाण ही नवीन प्रणाली सुरू केली आहे. ही प्रणाली ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित असून, यामुळे बोगस प्रमाणपत्रांना आळा बसणार आहे.

या प्रणालीमध्ये मानवी हस्तक्षेप नसल्यामुळे फेरफार करणे शक्य नाही. खेळाडूने माहिती भरल्यानंतर आणि ती मूळ डेटाशी जुळल्यास, अवघ्या २४ तासांच्या आत डिजिटल पडताळणी अहवाल उपलब्ध होतो. प्रत्येक प्रमाणपत्रावर एक क्यूआर कोड असेल, ज्याद्वारे महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) किंवा पोलीस भरती यांसारखे नियुक्ती प्राधिकारी प्रमाणपत्राची सत्यता त्वरित पडताळू शकतील.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच इतर सर्व शासकीय पदभरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंना आता या क्रीडा ई-प्रमाणपत्राची प्रत जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. ज्या खेळाडूंनी यापूर्वी विभागीय उपसंचालकांकडून पडताळणी केली आहे, त्यांनाही आता या नवीन प्रणालीद्वारे प्रमाणपत्र तयार करून घेणे आवश्यक आहे.

पात्र खेळाडूंनी क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळाला (https://sports.maharashtra.gov.in/) भेट द्यावी. तेथे 'Our Services' मधील ५ टक्के टॅबमध्ये जाऊन आपली नोंदणी पूर्ण करावी. नोंदणीसाठी आधार-संलग्न मोबाइल क्रमांक, ई-मेल आयडी, आधार कार्डची पीडीएफ आणि क्रीडा प्रमाणपत्राची पीडीएफ फाइल सोबत ठेवावी. ज्या खेळाडूंची माहिती तांत्रिक कारणास्तव प्रणालीवर दिसत नसेल, त्यांनी support@kridaepramaan.org या ई-मेलवर आपली तक्रार नोंदवावी. तक्रारीसोबत स्पर्धेचे अचूक नाव, वर्ष आणि मूळ प्रमाणपत्राची स्कॅन प्रत जोडणे आवश्यक आहे.

सध्या कबड्डी, फेन्सिंग, ट्रायथलॉन (२०२५), ज्यूदो (२०२४) आणि कुराश (२०१७-१८ व २०२४-२५) या खेळांचे अभिलेख ऑनलाइन उपलब्ध आहेत. इतर खेळांच्या माहितीचे काम प्रगतिपथावर असून, सर्व पात्र खेळाडूंनी आपली नोंदणी पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'परसबाग'ला आदिवासी भागातून उत्स्फूर्त प्रतिसाद

## अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशन, मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्टतर्फे उपक्रम

**शिरपूर** : अस्तित्व सोशल वेल्फअर फाउंडेशन व मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्टच्या 'गंगा माँ मंडळ परसबाग' उपक्रमाला तालुक्यातील आदिवासी भागात सातत्यपूर्ण व उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. दरम्यान, परसबाग उपक्रमात कुपोषण, संतुलित आहार, जीवनसत्वयुक्त पोषण आहार तसेच सिकलसेल आजाराबाबत ग्रामीण भागात मार्गदर्शन करण्यात येत आहे.

आदिवासी पाडे व गावांमध्ये अपूर्ण पोषणामुळे कुपोषणाची गंभीर समस्या निर्माण होत असते. विशेषतः गरोदर माता, स्तनदा माता, नवजात शिशू व लहान मुलांना सकस व प्रथिनयुक्त आहार न मिळाल्याने आरोग्याच्या समस्या वाढतात. या पार्श्वभूमीवर आदिवासी महिलांमध्ये जनजागृती निर्माण व्हावी व कुटुंबांना घरच्या घरी



पोषणयुक्त आहार उपलब्ध व्हावा, या उद्देशाने अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशनच्या संचालिका द्वेता करण नथवानी यांच्या संकल्पनेतून 'गंगा माँ मंडळ परसबाग' ही अभिनव योजना राबविण्यात येत आहे.

योजनेंतर्गत फाउंडेशनतर्फे आदिवासी भागात परसबागा तयार केल्या जात असून, आदिवासी भागात एक गुंठा क्षेत्रावर परसबाग विकसित करण्यात येते. या परसबागेत सात दिवस सात प्रकारच्या भाज्या उपलब्ध होतात. घरच्या घरी सेंद्रिय, सकस व प्रथिनयुक्त भाजीपाला रोज मिळत असल्याने कुटुंबांचे पोषण सुधारते. याशिवाय अतिरिक्त उत्पादन गावातील बाजारात विक्री करून महिलांना आर्थिक सक्षमता मिळण्यासही मदत होत आहे. ही संकल्पना आदिवासी महिलांच्या आरोग्य सुदृढतेसाठी तसेच आर्थिक सक्षमीकरणासाठी उपयुक्त ठरत आहे.

फाउंडेशनच्या माध्यमातून आतापर्यंत २२ खेड्यांमध्ये १८० परसबागांची निर्मिती करण्यात आली आहे. प्रत्येक परसबागेत एकूण २२ ते २५ प्रकारचा सेंद्रिय भाजीपाला लावण्यात येतो. परसबाग तयार करण्यासाठी लागणारे साहित्य मोफत वाटप करण्यात येते. भाजीपाला बियाणे किट, ग्रीन नेट, सेंद्रिय खते, बियाणे खते, जाळी, सेंद्रिय औषधे फवारणी, रोपे वाटप तसेच वेळोवेळी फाउंडेशनच्या परसबाग निर्मिती पथकाच्या माध्यमातून परसबागेची पाहणी केली जाते.

उपक्रमांतर्गत गावात सभा घेणे, ग्रामस्थांना विशेषतः महिलांना आरोग्य व परसबागेची माहिती देणे, कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण करणे, योग्य लाभार्थी निवडणे, जागेची तपासणी, परसबाग लागवड, सेंद्रिय शेतीविषयी प्रशिक्षण, खत, पाणी, सेंद्रिय फवारणी, जाळी व व्यवस्थापन, तसेच परसबागेची सातत्याने पाहणी केली जाते. यासोबतच वृक्षारोपण व वृक्षवाटप कार्यक्रमही राबविण्यात येतात.

परसबाग उपक्रमास नुकतीच भेट देण्यात आली. यावेळी मुंबई येथील सेतू शाह, प्राची देवधर, पूर्वी शिवलकर, केतकी सुखतनकर उपस्थित होते. फाउंडेशनच्या समन्वयिका सोनिया भसीन, स्वीय सहाय्यक योगेश्वर माळी यांनी उपस्थितांना उपक्रमाची माहिती दिली.



> **परसबागेत लागवड होणाऱ्या प्रमुख भाज्या**
>
> भेंडी, गवार, चवळी, कोथिंबीर, पालक, मेथी, पोकोडा, शेपू, काकडी, काकडी खीर, गिलकी, कारले, दुधी, गंगाफळ, दोडका, वालपापडी, मुळा, बीट, गाजर, टिंडा, टरबूज, शेवगा, वांगे, टोमॅटो आदी भाजीपाल्याचा समावेश आहे.

**ग्रामविकासात परसबाग उपक्रम ठरतोय प्रभावी**

आदिवासीबहुल भागात कुपोषणाला आळा घालणे, सिकलसेलग्रस्त कुटुंबांना पोषण आहार उपलब्ध करून देणे, सेंद्रिय शेती व भाजीपाला लागवडीस प्रोत्साहन देणे तसेच निरोगी आरोग्यासाठी परसबाग संकल्पना रुजवणे, या उद्देशाने 'गंगा माँ मंडळ परसबाग' योजना ग्रामीण विकासाच्या दिशेने आदर्श आणि प्रभावी पाऊल ठरत आहे.

## महत्त्वाचे

### दुबई, अबू धाबीला जाणारी उड्डाणे रद्द

**नवी दिल्ली :** इराण-इस्रायल तणावामुळे एअर इंडिया, स्पाइसजेट आणि इंडिगो कंपनीने रविवारी भारतातून दुबई आणि अबू धाबीला जाणारी उड्डाणे रद्द केली. इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील सुरू असलेल्या संघर्षामुळे आणि हवाई निर्बंधांमुळे हा निर्णय घेण्यात आला. एअर इंडिया समूहाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, संयुक्त अरब अमिराती (यूएई) मधील विमानतळ अधिकाऱ्यांनी नवीन निर्देश जारी केले, ज्यामुळे १५ मार्च रोजी उड्डाणे कमी करावी लागली. दिल्ली आणि दुबई दरम्यानची उड्डाणे रद्द करण्यात आली. दिल्लीहून दुबईला जाण्यासाठी केवळ एकच विमान सुरू राहणार आहे. याशिवाय अबू धाबीला जाणाऱ्या पाचही विमानसेवा रद्द करण्यात आल्या. तथापि, शारजाहहून दिल्ली, कन्नूर, कोची, कोझिकोड, मुंबई आणि तिरुवनंतपुरम यासारख्या शहरांसाठी विमानसेवा सुरू करण्यात येणार आहे. इंडिगोने दुबईला जाणाऱ्या विमानसेवाही रद्द केल्या आहेत. स्पाइसजेटने एका पोस्टमध्ये म्हटले की, पश्चिम आशियातील बिघडत्या परिस्थितीमुळे दुबईला जाणाऱ्या आणि येणाऱ्या विमानांची सेवा स्थगित करण्यात आली.

### मायानगरीत गोड बोलून फसवितातः तनुश्री दत्ता

**मुंबई :** बॉलिवूडमधील अभिनेत्री तनुश्री दत्ताने मनोरंजन क्षेत्रातील शोषणावर गंभीर टिप्पणी केली आहे. तनुश्रीने बॉलिवूडमध्ये नवोदित कलाकारांना गोड बोलून जाळ्यात ओढले जाते आणि प्रसंगी त्यांना देहव्यापाराकडेही ढकलले जात असल्याचे आरोप केले आहेत. मायानगरीतील अनेक कलाकार मानसिकदृष्ट्या खचून जातात. काही जण आल्या पावली परत जातात. त्यामुळे नवोदित कलाकारांनी सावध राहावे, असा इशाराही तनुश्रीने दिला आहे.

### बादशाहला बिश्नोई गँगने दिली धमकी



**मुंबई :** बॉलिवूडचा प्रसिद्ध सिंगर आणि रॅपर बादशाह आपल्या गाण्यामुळे सध्या मोठ्या वादात सापडला आहे. त्याचे 'टटीरी' हे हरियाणवी गाणे हरियाणाची संस्कृती बिघडवणारे असल्याचा आरोप करत लॉरेन्स बिश्नोई गँगने त्याला थेट धमकी दिली आहे. पानिपत येथील गोळीबाराच्या घटनेची जबाबदारी घेत फेसबुकवर एक पोस्ट करत बिश्नोई गँगने बादशाहला २०२४ मध्ये केलेल्या धमकीवरून 'पुढच्या वेळी तुझ्या कपाळात गोळी मारू,' अशी धमकी दिली आहे. १ मार्च रोजी बादशाहचे 'टटीरी' हे गाणे रिलीज झाले होते. या गाण्याचे बोल आणि व्हिडिओमधील दृश्ये काहींना आक्षेपार्ह वाटली आणि त्यामुळे वाद सुरू झाला. महिला आयोगाने गाण्याच्या बोलांवर तक्रार दाखल केली आणि ते गाणे समाजावर वाईट प्रभाव टाकत असल्याचा आरोप केला. गाण्याच्या विवादाच्या पार्श्वभूमीवर बादशाहने सार्वजनिकपणे माफी मागितली होती.

# होर्मुझ केवळ शत्रूंच्या जहाजांसाठी बंद

**इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांची माहिती**

**तेहरान, १५ मार्च**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मित्र राष्ट्रांना होर्मुझच्या सामुद्रधुनीत त्यांचे नौदल पाठवण्याचे आवाहन केल्यानंतर इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी स्पष्ट केले की, होर्मुझ केवळ आमच्या मित्र देशांसाठी खुली करण्यात आली, तर शत्रू राष्ट्रांच्या जहाजांसाठी ती बंदच राहणार आहे.




होर्मुझची सामुद्रधुनी खुली आहे आणि हा धोरणात्मक मार्ग केवळ अमेरिका, इस्रायल आणि त्यांना मदत करणाऱ्या राष्ट्रांच्या जहाजांसाठीच बंद आहे. सुरक्षेच्या कारणास्तव ही नाकेबंदी करण्यात आली आहे. रशिया आणि चीन हे आमचे धोरणात्मक भागीदार आहेत.

दोन्ही देशांसोबत आमचे संबंध बळकट असून, यात लष्करी सहकार्याचा समावेश असल्याचे अराघची वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत म्हणाले. इराणचे नौदल शत्रू राष्ट्रांच्या जहाजांना वगळता इतर कोणालाही लक्ष्य करणार नाही. अमेरिका अफवा पसरवत आहे. होर्मुझची सामुद्रधुनी लष्करीदृष्ट्या बंद केलेली नाही, तर ती केवळ इराणी नियंत्रणाखाली आहे.

### अमेरिकेच्या सैन्याला हाकलून लावा

आखाती देशांना शांतता आणि स्थैर्य हवे असल्यास त्यांनी अमेरिकेच्या सैन्याला त्यांच्या देशातून हाकलून लावावे. आखाती भूभागाचा वापर आमच्या देशावर हल्ले करण्यासाठी होत आहे. त्यामुळेच आम्हाला त्या देशातील लष्करी आणि हवाई तळांवर लक्ष्य करावे लागत असल्याचे अराघची यांनी स्पष्ट केले.



# आखाती सागरात १७ जहाजांवर हल्ले

## युनायटेड किंग्डम मेरीटाईम ट्रेडची माहिती, जागतिक व्यापार विस्कळीत

**लंडन, १५ मार्च**

पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम आता सागरी मार्गांवरही होत आहे. गेल्या दोन आठवड्यात, पर्शियन आखात, होर्मुझची सामुद्रधुनी आणि ओमानच्या आखातासारख्या महत्त्वाच्या सागरी मार्गांवर १७ जहाजांवर हल्ले झाले आहेत. या घटनांमुळे आंतरराष्ट्रीय व्यापार विस्कळीत झाल्याची माहिती युनायटेड किंग्डम मेरीटाईम ट्रेडच्या अहवालातून समोर आली.

पर्शियन आखात, होर्मुझची सामुद्रधुनी आणि ओमानच्या आखातात १ मार्चपासून हे हल्ले झाले. पहिला हल्ला होर्मुझ जलमार्गावर झाला, यात दोन टँकरवर नष्ट करण्यात आले. ३ मार्च रोजी ओमानच्या आखातात दोन जहाजांवर हल्ला. ४ मार्च रोजी होर्मुझच्या सामुद्रधुनीत आणि पर्शियन आखातात दोन जहाजांवर स्फोट झाले. ७ मार्च रोजी पर्शियन आखातातील एका ड्रिलिंग रिगवर ड्रोन हल्ला झाला, ज्यामुळे कामगार जखमी झाले आणि त्यांना बाहेर काढावे लागले. १० मार्च रोजी पर्शियन आखातात एका जहाजावर ड्रोन हल्ला झाला. ११ मार्च रोजी होर्मुझच्या सामुद्रधुनीत मयुरी नारी या कंटेनर जहाजावर हल्ला करण्यात आला आणि पर्शियन आखातात इतर तीन जहाजांनाही लक्ष्य करण्यात आले. १२ मार्च रोजी, पर्शियन आखातातील एका कंटेनर जहाजाला आग लागली.



### युरोपियन जहाजांना लक्ष्य

सामान्यतः दररोज अंदाजे १३८ जहाजे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जातात, परंतु आता केवळ २ जहाजेच जात आहेत. युरोपियन देशांच्या जहाजांना सर्वाधित लक्ष्य केले जात आहे. हे अडथळे केवळ पर्शियन आखातापुरते मर्यादित नाहीत; ते लाल समुद्र आणि बाब-एल-मंडेब सामुद्रधुनीवर देखील परिणाम करत आहेत. यामुळे ऊर्जा आणि खते यासारख्या उत्पादनांच्या पुरवठा साखळीवर परिणाम होत आहे.

### राष्ट्र सेविका समितीच्या रेखाताई राजे यांचे निधन

**नागपूर, १५ मार्च**

राष्ट्र सेविका समितीच्या माजी सहकार्यवाहिका रेखाताई राजे यांचे निधन झाले. रविवारी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास त्यांनी वयाच्या ७५व्या वर्षी दिल्लीत शेवटचा श्वास घेतला. त्या मूळच्या कानपूरच्या होत्या. अशोक सिंघल व सिंधूताई फाटक यांच्या प्रेरणेतून रेखाताई यांनी राष्ट्र सेविका समितीच्या पूर्णवेळ प्रचारिका म्हणून व्रत स्वीकारले. त्यांनी कानपूरला सत्याग्रह करून महिला आंदोलनाचे नेतृत्व केले होते. दिल्लीच्या प्रांत प्रचारिका, उत्तर क्षेत्र प्रचारिका, अ. भा. प्रचारिका प्रमुख, सहकार्यवाहिका असे महत्त्वाचे दायित्व त्यांनी पार पाडले. जालंधर येथे केंद्र स्थापन करून त्यांनी संपूर्ण उत्तर क्षेत्रात समितीचे काम वाढविले. लव्ह जिहादमध्ये अडकलेल्या अनेक मुलींना परत आणण्यात रेखाताईंचा मोठा वाटा होता. त्यांच्यावर कानपूर येथे सोमवारी सायंकाळी शासकीय इतमामात अन्यसंस्कार करणायात येतील.





दैनिक तरुण भारतची पुणे आवृत्ती वाचकांच्या सेवेत दाखल झाली आहे. रविवारी पुणे मेट्रो भवनच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले होते. यावेळी त्यांनी दैनिक 'तरुण भारत'च्या पुणे आवृत्तीचे अनौपचारिक स्वागत करत शुभेच्छा दिल्या. 'तरुण भारत'च्या पुणे आवृत्तीचे निवासी संपादक सचिन कापसे यांनी त्यांना अंकाबद्दल माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार मेधा कुलकर्णी, महापौर मंजुषा नागपुरे, 'तरुण भारत'चे सहयोगी संपादक विजय लाड, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, भाजपा पदाधिकारी जयंत येरवडेकर तसेच भाजपचे पश्चिम महाराष्ट्र माध्यम विभाग प्रमुख अमोल कविटकर उपस्थित होते.

# वि. सा. संघाच्या अध्यक्षपदी डॉ. गिरीश गांधी

**सर्वाधिक २ हजार ६६१ मते प्राप्त**

**प्रदीप दाते यांचा १ हजार ४७४ मतांनी पराभव**



विजयाचा जल्लोष करताना डॉ. गिरीश गांधी यांचे समर्थक

**नागपूर, १५ मार्च**

सुरुवातीपासूनच चर्चेत राहिलेल्या विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीची मतमोजणी अखेर आज पार पडली. अध्यक्षपदाची माळ डॉ. गिरीश गांधी यांच्या गळ्यात पडली. डॉ. गांधी यांनी मावळते अध्यक्ष प्रदीप दाते यांचा १ हजार ४७४ मतांनी पराभव केला. रविवारी या निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आला.

विदर्भ साहित्य संघाची २०२६ ते २०३१ या कार्यकाळाकरिता निवडणूक घेण्यात आली. मतमोजणीला रविवारी सकाळी नऊ वाजता प्रारंभ झाला. अवैध मते बाजूला काढून वैध मतांची मोजणी करण्यात आली. अध्यक्षपद आणि कार्यकारिणीसाठी दोन स्वतंत्र रंगांच्या मतपत्रिका तयार करण्यात आल्या होत्या. या दोन्ही मतमोजणी प्रक्रिया एकाच वेळी सुरू करण्यात आल्या. रात्री ८ वाजताच्या सुमारास अध्यक्षपदासाठीच्या निवडणुकीची मतमोजणी पूर्ण झाली. यात डॉ. गिरीश गांधी यांनी सर्वाधिक २ हजार ६६१ मते मिळविली. त्यांच्या पाठोपाठ अध्यक्ष प्रदीप दाते यांना १ हजार १८७, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांना ७०१, डॉ. रवींद्र शोभणे यांना २०५, डॉ. रंजन दारव्हेकर यांना ११४ मते मिळाली. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. मोहन पारखी यांनी दिलेल्या माहितीनुसार ४ हजार ८६८ मते वैध ठरली, तर ६३ मते अवैध असल्याचे निदर्शनास आले.

### कार्यकारिणीचा निकाल आज

कार्यकारिणीतील २२ पदांसाठी ८३ उमेदवार रिंगणात आहेत. शेवटी हाती आलेल्या वृत्तानुसार केवळ सहा फेऱ्या आज पार पडल्या होत्या. अजून १८ फेऱ्या शिल्लक आहेत. जवळपास ८० विद्यार्थी व प्राध्यापक या मतमोजणी प्रक्रियेत सहभागी झाले आहेत. मतमोजणी अखंड सुरू राहणार असून, सोमवारी रात्रीपर्यंतचा अवधी लागणार असल्याचे पारखी यांनी सांगितले. त्यामुळे कार्यकारिणीच्या निकालाची उत्सुकता अद्याप कायम आहे.

### अध्यक्षपदाच्या उमेदवारांना मिळालेली मते

| | |
|---|---|
| डॉ. गिरीश गांधी | - २६६१ |
| प्रदीप दाते | - ११८७ |
| डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी | - ७०१ |
| डॉ. रवींद्र शोभणे | - २०५ |
| डॉ. रंजन दारव्हेकर | - ११४ |
| वैध मते | - ४८६८ |
| अवैध मते | - ६३ |

### विजयाचा जल्लोष

विजयी होताच डॉ. गिरीश गांधी विदर्भ साहित्य संघात दाखल झाले. येथे अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले. सर्वांच्या विजयाचा स्वीकार करून ते मावळते अध्यक्ष प्रदीप दाते यांना भेटले. दाते यांनीही त्यांचे अभिनंदन केले. डॉ. गांधी यांच्या पॅनेलमधील उमेदवारांसह समर्थकांनी विजयाचा जल्लोष केला.

### हा विजय प्राचार्य शेवाळकरांच्या स्मृतींना अर्पण

अतिशय आनंदाने आणि कृतज्ञतेने हा विजय मी स्वीकृत करतो आणि तो प्राचार्य राम शेवाळकर यांच्या स्मृतींना, कर्तृत्वाला मनोभावे अर्पण करतो. वि. सा. संघाच्या परंपरेतील चांगल्या गोष्टी मनोभावे कायम ठेवण्यात येतील. परंतु काही गोष्टी बदलविण्याची वेळ आल्यास त्यात बदल करण्याचा व सर्व चांगल्या गोष्टींचा स्वीकार करून राहिलेल्या त्रुटी दूर करण्याचा माझा प्रयत्न राहील. येथे आजवर अध्यक्षपदी विराजमान प्रभृतींची आणि माझी तुलनाच होऊ शकत नाही. मला माझ्या मर्यादा ठाऊक आहेत आणि त्या मर्यादित राहूनच पुढे वि. सा. संघासाठी कार्य करणार आहे.

**- डॉ. गिरीश गांधी,** नवनिर्वाचित अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ.

# संघाचा विस्तार म्हणजे राष्ट्रीय विचारांचा विस्तार

**(पान १ वरून)** 'पंच परिवर्तन' या माध्यमाद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवून आणणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतीयत्व किंवा हिंदुत्व ही केवळ एक संकल्पना नसून, ती एक जीवनपद्धती आहे आणि तिच्या माध्यमातून संपूर्ण समाजात गुणांचा विस्तार व्हायला हवा. यासाठी समाजातील सज्जनशक्तींना संघटित करणे आणि 'पॉवर ऑफ गॉड' राष्ट्रीय हिताच्या दिशेने वळवणे अत्यावश्यक आहे. समाजाने जात व पंथाचे भेद विसरून थोर विभूतींच्या योगदानाचा स्वीकार करावा आणि त्यांच्या माध्यमातून सकारात्मक बदलाच्या दिशेने वाटचाल करावी, असे प्रतिपादन सरकार्यवाहांनी केले. याच दिशेने, गुरू श्री तेग बहादूरजी यांच्या हौतात्म्याच्या ३५० व्या वर्षानिमित्त संघाच्या स्वयंसेवकांनी देशभरात २,००० पेक्षा जास्त कार्यक्रमांचे आयोजन केले. यामध्ये सात लाखांपेक्षा जास्त लोकांनी सहभाग घेतला. त्याचप्रमाणे राष्ट्रगान 'वंदे मातरम्'चा १५० वा वर्धापन दिनही अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. संत शिरोमणी रविदासजी महाराज यांच्या ६५० व्या जयंतीनिमित्त आगामी वर्षात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याच्या योजना आखण्यात आल्या आहेत. संघाच्या आगामी वर्षातील नियमित प्रशिक्षण शिबिरांबाबत माहिती देण्यात आली असून, त्यानुसार एकूण ९६ शिबिरे आयोजित केली जातील. यात ११ विभागांमधील शिबिरांचा तसेच नागपूर येथील एका शिबिराचा समावेश आहे. प्रतिनिधी सभेत गोकल्याण आणि ग्रामीण विकासाशी संबंधित योजनांवरही चर्चा करण्यात आली आहे. नागरिकांना त्यांच्या घरांच्या छतावर भाजीपाला पिकवण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. यासाठी ते देशी गाईचे शेण आणि गोमूत्र यांचा खत म्हणून वापर करू शकतील. अशा प्रकारे प्रत्येक जण गोसंवर्धनाच्या कार्यात आपले योगदान देऊ शकेल. त्याचप्रमाणे, नागरिक हरितगृहांची उभारणी करण्याचाही संकल्प करू शकतात. याद्वारे घरातील पॉलिथिनचा वापर कमी करणे आणि पाण्याची बचत करणे यासारख्या प्रयत्नांना चालना मिळेल, असे दत्तात्रेय होसबळे यांनी सांगितले. संघाच्या संघटनात्मक रचनेतील बदलांविषयीच्या प्रश्नाला उत्तर देताना दत्तात्रेय होसबळे यांनी सांगितले की, या रचनेच्या विकेंद्रीकरणावर विचारविनिमय करण्यात आला असून, त्यामध्ये सध्याच्या 'प्रांतां'च्या जागी लहान विभाग स्थापन करण्याचा प्रस्ताव समाविष्ट आहे. या प्रस्तावाची अंमलबजावणी झाल्यास, सध्याच्या ४६ प्रांतांची जागा ८० पेक्षा जास्त विभाग घेतील. एका प्रश्नाला उत्तर देताना सरकार्यवाह म्हणाले की, समाजात अस्तित्वात असलेला जातीय भेदभाव नष्ट करण्यासाठी प्रसारमाध्यमांनीही पुढाकार घेतला पाहिजे आणि कोणत्याही निवडणुकीदरम्यान मतदारांच्या रचनेचे जातीय निकषांवर आधारित विश्लेषण प्रकाशित करणे थांबवले पाहिजे. सध्याच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत, राष्ट्रीय हितासाठी सरकारकडून केल्या जात असलेल्या राजनैतिक प्रयत्नांची त्यांनी स्तुती केली तसेच जागतिक स्तरावर संघ हा शांतता आणि विकासाचा पुरस्कर्ता म्हणून उभा आहे, असेही नमूद केले. डॉ. हेडगेवार यांनी कोणत्याही समुदायाचा, पंथाचा अथवा उपासना पद्धतीचा विरोध करण्यासाठी संघाची स्थापना केली नाही, असे दत्तात्रेय होसबळे यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. आपले पूर्वज एकच आहेत आणि उपासनेच्या पद्धतींमधील फरकामुळे काहीही फरक पडत नाही, असे प्रतिपादन संघाचे द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजी यांनी केले होते. त्यांनी 'डीएनए' हा शब्द वापरला नसला, तरी त्यामागील मूळ उद्देश नेमका हाच होता. जे कोणी भारताला आपली मातृभूमी आणि राष्ट्र मानतात आणि ज्यांच्या ठायी भारतीयत्वाचा भाव वसलेला आहे, ते सर्व जण हिंदू आहेत. संघामध्ये प्रत्येकाचे स्वागत आहे. समाजासाठी चांगले कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला आम्ही संघाचा स्वयंसेवक मानतो, असे प्रतिपादन तृतीय सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी केले होते.

### अंदमान आणि अरुणाचलसह देशभरात संघाविषयी उत्साह

सरसंघचालकांच्या उपस्थितीत अंदमानमध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका हिंदू परिषदेत, नऊ प्रमुख बेटांवरील १३,००० पेक्षा जास्त लोकांनी सहभाग घेतला. त्याचप्रमाणे अरुणाचल प्रदेशसारख्या कमी लोकसंख्या घनता असलेल्या राज्यातही २१ स्वधर्म परिषदांमध्ये ३७,००० पेक्षा जास्त लोकांनी सहभाग नोंदवला.

### जाती-धर्माच्या भेदांपलीकडे जाऊन महान व्यक्तींचा सन्मान

समाजाने जाती-धर्माच्या भेदांपलीकडे जाऊन महान व्यक्तींच्या योगदानाची दखल घेतली पाहिजे आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन सकारात्मक सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल केली पाहिजे. याच भावनेने प्रेरित होऊन, संघाच्या स्वयंसेवकांनी गुरू श्री तेग बहादूरजी यांच्या हौतात्म्याच्या ३५० व्या स्मृतिदिनानिमित्त देशभरात २,००० पेक्षा जास्त कार्यक्रमांचे आयोजन केले. या कार्यक्रमांना ७ लाखांपेक्षा जास्त लोकांनी उपस्थिती लावली.

### दिग्गीराजा आणि गिरिराजसिंह यांची जुगलबंदी

**काँग्रेसचे** ज्येष्ठ नेते आणि मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजयसिंह यांचा राज्यसभा सदस्य म्हणून कार्यकाळ संपत आला आला. फेरनियुक्तीची कोणतीच शक्यता दिसत नसल्यामुळे दिग्गीराजांनी काही महिने आधीच आपल्या राजकारण निवृत्तीची घोषणा करत आयुष्यात पहिल्यांदाच राजकीय शहाणपणा दाखवला. राज्यसभेत एक प्रश्न विचारतांना दिग्गीराजांनी अनावश्यक हुषारी दाखवली, आणि आपल्या हाताने आपली फजिती करुन घेतली. वस्त्रोद्योग मंत्री गिरिराजसिंह यांना प्रश्न विचारतांना, गिरिराजसिंह माझे नातलग आहेत, असा उल्लेख करत त्यांना चिमटा काढण्याचा प्रयत्न केला, त्यांचे सरकारमध्ये किती चालते, मला माहिती नाही, पण या मुद्यावर मंत्रिमहोदय पंतप्रधानांशी बोलू शकतील का, अशी विचारणा दिग्गीराजा यांनी केली. यावर गिरिराजसिंह काय उत्तर देतात, याकडे सभागृहाचे लक्ष लागले होते. दिग्विजयसिंह यांची फिरकी घेतांना गिरिराजसिंह म्हणाले की, याचे नातेसंबंध तर मुघलांशी पण होते, यांना आपल्या पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांना भेटण्यासाठीही वेळ मिळतो की नाही, मला माहिती नाही, पण आमची तर पंतप्रधानांशी पाच मिनिटे का होईना, फोनवर चर्चा होऊन जाते. गिरिराजसिंह यांच्या या उत्तराने दिग्गीराजांचा चेहरा पाहण्यासारखा झाला. मात्र त्यानंतर एक प्रश्न सगळ्यांना छळु लागला, तो म्हणजे दिग्गीराजा आणि गिरिराजसिंह यांच्यात कोणते नातेसबंध आहे, ज्याचा आजपर्यंत दोघांनी खुलासा केला नाही. आताच दिग्गीराजांनी गिरिराजसिंह यांच्याशी असलेले आपले नातेसंबंध जाहीर का केले?

●● ●●

### आधी तिकीट कापले मग धडक मारली, आनंद शर्मा झाले दुःखी

**आनंद शर्मा** काँग्रेसमधील असंतुष्ट गटाने नेते समजले जातात. काँग्रेस नेतृत्वाला पत्र पाठवणाऱ्या जी २३ गटात ते होते. गेल्या काही वर्षापासून आनंद शर्मा संसदेच्या कोणत्याच सभागृहाचे सदस्य नाही. मुळ हिमाचलप्रदेशचे असलेल्या आनंद शर्मा यांना यावेळी हिमाचल प्रदेशमधून होत असलेल्या राज्यसभा निवडणुकीत मोठी अपेक्षा होती. काँग्रेस नेतृत्वाकडून संकेत मिळाल्यामुळे आनंद शर्मा अर्ज दाखल करण्यास सिमल्याला पोहोचलेही. पण ऐनवेळी काँग्रेसनेतृत्वाने आनंद शर्मा यांना डावलून अनुराग शर्मा या नवख्या नेत्याला उमेदवारी दिली. अपेक्षेप्रमाणे अनुराग शर्मा अविरोध विजयीही झाले. याचा धक्का आनंद शर्मा यांना बसला आणि नाव आनंद असले तरी ते दुःखी झाले. काही वेळा आत्मसन्मान अतिशय महागात पडतो, खरं बोलण्याची राजकीय किंमत चुकवावी लागते, या शब्दात त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली.

आनंद शर्मा यांची उमेदवारी काँग्रेस महासचिव के.सी. वेणुगोपाल यांनी कापली, असे म्हणतात. संसदभवनाच्या परिसरात आनंद शर्मा यांच्या कारला वेणुगोपाल यांच्या कारने धडक मारली, सुदैवाने कारमधून आधीच उतरले असल्यामुळे यात आनंद शर्मा यांना कोणतीही दुखापत झाली नाही. विशेष म्हणजे वेणुगोपालही आपल्या कारमध्ये नव्हते.आनंद शर्मा संसदभवनाच्या प्रवेशद्वाराकडे जात असतांना तेथे वेणुगोपाल उभे होते, पण आनंद शर्मा येत असल्याचे पाहून वेणुगोपाल दुसऱ्या दिशेने निघून गेले. वेणुगोपाल यांच्या कारने




आनंद शर्मा यांच्या कारला मारलेली धडक हा निव्वळ अपघात होता की घडवून आणलेला योगायोग याची चर्चा आता सुरु झाली आहे.

●● ●●

### चांगले मामा बना, कंस मामा नाही...

**केंद्रीय मंत्री** आणि मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान मामाजी म्हणून ओळखले जातात, त्यांनी भोपाळमधील आपल्या बंगल्याचे नावही मामाजी का घर असे ठेवले आहे. महाराष्ट्रात भाजपाला सत्तेवर आणणारी लाडकी बहीण योजना मुळची मध्यप्रदेशचीच. लाडली बहना म्हणून ती तेथे ओळखली जाते, राज्यात भाजपाला सलग तिसऱ्यांदा सत्तेवर आणण्यात या योजनेचे मोठे योगदान आहे, मध्यप्रदेशातील बहिणीचे लाडके असलेले शिवराजसिंह चौहान बहिणींच्या मुलांचेही लाडके मामा आहेत. राज्यसभेत ग्रामीण विकास मंत्रालयाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु असतांना काँग्रेसचे शक्तिसिंह गोहिल यांनी मनरेगा योजनेच्या नामांतरावरुन चौहान यांच्यावर हल्ला चढवला, मनरेगा आता जी राम जी म्हणून ओळखली जाते, याचा उल्लेख करत गोहिल म्हणाले की, या योजनेचे नाव तुम्ही राम राम केले आहे, तिरडी उठली की, रामराम असे म्हणतात, तसे तुम्ही मनरेगाचे नाव रामराम केले.मुंह मे राम बगल मे छुरी असा हा प्रकार आहे, रामाचे नाव घ्यायचे आणि चांगली योजना मारुन टाकायची, असे तुमचे काम आहे, हे योग्य नाही. नंतर शिवराजसिंह चौहान यांच्याकडे वळून गोहिल म्हणाले, शिवराजसिंहजी तुम्हाला सगळे जण मामा म्हणून ओळखतात, तुम्ही चांगले मामा बना, कंसमामा बनू नका. पंतप्रधान तुमचे किती ऐकतात, ते माहिती नाही. पण त्यांना समजावण्याचा प्रयत्न करा. यावर शिवराजसिंह काय बोलणार आहे, ते आपला चेहरा हसरा करत बसून राहिले.

●● ●●

### तृणमूल काँग्रेसने दुसऱ्यांदा केली चूक

**राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू यांच्या पश्चिम बंगाल दौऱ्यात राजशिष्टाचाराचा भंग केल्याचा आरोप पश्चिम बंगाल सरकारवर केला जात आहे. या मुद्यावरुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपा नेत्यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. राष्ट्रपती हे देशातील सर्वोच्च असे घटनात्मक पद आहे, त्यामुळे पक्षीय राजकारण बाजूला ठेवत त्या पदाचा मान राखणे देशातील सर्व राजकीय पक्षांचे कर्तव्य आहे, पण याचे भान ममता बॅनर्जी यांच्या सरकारला ठेवता आले नाही. या मुद्यावरुन वातावरण तापले, राज्य आणि केंद्र सरकारमध्ये जुंपली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात विविध राज्यातील खासदारांना राष्ट्रपती भवनात चहापानासाठी आमंत्रित केले. तृणमूल काँग्रेसच्या राज्यात म्हणजे पश्चिम बंगालमध्ये आपला झालेला अपमान विसरत आणि मनाचा मोठेपणा दाखवत मुर्मू यांनी तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनाही आमंत्रित केले. पण रमजान महिन्याचे कारण देत या कार्यक्रमात सहभागी होण्यास तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी नकार दिला. हा प्रकार योग्य नाही. तृणमूल काँग्रेसने दुसऱ्यांदा राजशिष्टाचाराचा भंग करत राष्ट्रपतींचा अपमान केला, असे म्हणायला पाहिजे. याची राजकीय शिक्षा पश्चिम बंगालमधील जनतेने तृणमूल काँग्रेसला द्यायला पाहिजे.

● दिल्लीवाला

**श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर, जि. सोलापूर**

**ई निविदा सुचना - २०२६**

श्रीच्या दर्शनरांगेत बॅरीगेटींग, तात्पुरते पत्राशेड उभारणे, विद्युत व्यवस्था व इतर अनुषंगीक कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. त्याची सर्व माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
बांधकाम विभाग/कावि/१९/२०२६
दि.१५/०३/२०२६

सही/-
कार्यकारी अधिकारी
(संपर्क क्र. ०२१८६-२२८८८८)

## थोडक्यात महत्त्वाचे...



### टेक स्पार्क स्पर्धेत चोपड्याच्या विद्यार्थ्यांचे यश

**चोपडा :** दोंडाईचा (ता. शिंदखेडा, जि. धुळे) येथील अहिंसा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत आयोजित टेक स्पार्क या राज्यस्तरीय तांत्रिक स्पर्धेत येथील श्रीमती शरच्चद्रिका सुरेश पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. प्रोजेक्ट कॉम्पिटिशनमध्ये तंत्रनिकेतनमधील विद्युत शाखेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'स्मार्ट सिंचनप्रणाली' प्रकल्पास प्रथम बक्षीस मिळाले. प्रकल्पासाठी कल्पेश योगेश पाटील, ओम शैलेश इखणकर, यशवंत मनोज पवार व लोकेश जगदीश सोनवणे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. तसेच रोबोटिक्स आणि ऑटोमेशनअंतर्गत 'रांगोळीची शक्ती' स्पर्धेत दीपाली भारत पाटील व पूजा बाबुलाल चौधरी यांनी द्वितीय बक्षीस मिळविले. विद्यार्थ्यांना प्रा. भूषण पवार व प्रा. कमलेश पाटील यांचे मागदर्शन लाभले. या यशाबद्दल प्राचार्य प्रा. व्ही. एन. बोरसे, प्रभारी प्राचार्य डॉ. के. एन. सोनवणे, संस्थेचे अध्यक्ष ॲड. संदीप सुरेश पाटील, संस्थेच्या सचिव डॉ. स्मिता संदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांचा गौरव करीत सत्कार केला.



### एरंडोल येथे जागतिक ग्राहक दिन उत्साहात

**एरंडोल :** ग्राहक हक्कांविषयी जनजागृती करणे आणि ग्राहक संरक्षणाचे महत्त्व पटवून देणे या उद्देशाने येथील पुरवठा विभाग, तहसील कार्यालय यांच्यातर्फे रविवारी (१५ मार्च) जागतिक ग्राहक दिनानिमित्त पंचायत समिती सभागृहात विशेष कार्यक्रम घेण्यात आला. प्रा. शिवाजीराव अहिरराव अध्यक्षस्थानी होते. विचारमंचावर ग्राहक कल्याण फाउंडेशनच्या तालुकाध्यक्षा आरती ठाकूर, जिल्हा संघटक कैलास महाजन, ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे तालुकाध्यक्ष रवींद्र पाटील, अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे तालुकाध्यक्ष नुरुद्दीन मुल्लाजी यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवाली देशमुख यांनी यावर्षीच्या जागतिक ग्राहक दिनाच्या संकल्पनेवर मार्गदर्शन करत ग्राहकांनी आपले हक्क जाणून घेणे आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी सजग राहणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रा. शिवाजीराव अहिरराव, आरती ठाकूर, रवींद्र पाटील, नुरुद्दीन मुल्लाजी यांनी ग्राहक हक्क संरक्षण, बाजारपेठेतील पारदर्शकता आणि ग्राहकांनी फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. अमोल महाजन यांनी सूत्रसंचालन केले. पुरवठा निरीक्षण अधिकारी विवेक वैराळकर यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी विवेक वैराळकर, वैशाली पाचपोर, ऋषिप्रसाद पोळ, नीरज सुरळकर यांनी सहकार्य केले.



### महिला दिनानिमित्त अंगणवाडी सेविकांच्या कार्याचा गौरव

**पारोळा :** येथील श्री स्वामी समर्थ सार्वजनिक वाचनालय आणि स्वामी समर्थ इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त अंगणवाडी सेविकांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रतिमेचे पूजन आणि आरतीने करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून सावखेडा होळच्या पोलीस पाटील शुभांगी राजपूत, ज्येष्ठ शिक्षिका सुरेखा निकम उपस्थित होते. सूत्रसंचालन रिंकल आंबेकर यांनी केले तर आभार सोनाली टोळकर यांनी मानले. कार्यक्रमाला भारती चौधरी, दिपाली चौधरी, चेतना चौधरी, जयश्री कायस्थ, ज्योती पाटील, सविता पाटील व सोनाली टोळकर यांच्यासह शाळा आणि वाचनालयाचे पदाधिकारी उपस्थित होत्या. यांनी उपस्थितांचे आभार मानले.




### संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या भूगोल विभागाची कोकणदर्शन शैक्षणिक सहल

**सोयगाव :** अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील भूगोल विभागाची शैक्षणिक सहल नुकतीच कोकण दर्शनासाठी रवाना झाली. या सहलीदरम्यान विद्यार्थी महाडचा गणपती, अलिबाग, काशीद बीच, मुरुड-जंजिरा किल्ला, रायगड किल्ला, पाली व उन्हेरे या ऐतिहासिक व पर्यटन स्थळांना भेट देणार आहेत. या शैक्षणिक सहलीचा शुभारंभ महाविद्यालयाचे संचालक, शारीरिक शिक्षण विभागाचे डॉ.निलेश गाडेकर यांच्याहस्ते नारळ फोडून व हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थ्यांना सहलीदरम्यान इतिहास, भूगोल व पर्यटनाची प्रत्यक्ष माहिती मिळावी तसेच सहल सुरक्षित व ज्ञानवर्धक ठरावी, अशा शुभेच्छा देण्यात आल्या.

## वाळूच्या भरधाव डंपरने तरुणाला चिरडले

**तभा वृत्तसेवा**
**अमळनेर, १५ मार्च**

शहरातील दगडी दरवाजा ते फरशी पुल परिसरात वाळूच्या भरधाव डंपरने मोटर सायकलस्वार तरुणाला चिरडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी घडली. घनश्याम तुकाराम पाटील (वय-३५, रा.पवन चौक, मुठे गल्ली, अमळनेर) असे मृत तरुणाचे नाव आहे.



घनश्याम हा मोटारसायकल (क्र.एम.एच.१९, ८७२१) वरून जात असताना भरधाव डंपर (क्र. एम.एच.२०, ई.जी.९६००) ने त्याला जोरदार धडक दिली. यात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले व त्याला तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याची तपासणी करुन मृत घोषित केले. मृत घनश्यामच्या पश्चात आई व पत्नी असा परिवार आहे. घनश्याम पूर्वी गॅरेजमध्ये काम करीत होता. नंतर तो आचारीकडे कामाला होता, अशी माहिती मिळाली.

**बेफाम वाहतुकीमुळे भीतीचे वातावरण**

घटना घडली तेव्हा त्या रस्त्यावर पाच ते सहा वाळू वाहतूक करणारे डंपर एकाच वेळी धावत होते. शहरातून दिवस-रात्र अंदाजे ५० ते ६० डंपरची ये-जा होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. दगडी दरवाजा परिसरातील रहिवाशांनी याबाबत अनेकदा तक्रारी केल्याचेही सांगितले जाते. दरम्यान, काल रात्री पैलाड परिसरातील नागरिकांनी डंपर हळू चालवावेत या मागणीसाठी सुमारे २५ ते ३० डंपर अडवून आंदोलन केले होते. त्यावेळी काही तरुणांना मारहाण झाल्याचा आरोपही स्थानिकांकडून करण्यात आला आहे. नागरिकांच्या मते, प्रशासनाने वेळेत कारवाई केली असती, तर हा अपघात टळला असता.

# चोपड्यात कर थकबाकीदारांवर पाण्याविनाच राहण्याची वेळ!

## पालिका प्रशासनातर्फे दोन दिवसांत १३० नळजोडणी खंडित

**चोपडा :** पालिका प्रशासनाने वारंवार सूचना देऊनही घरपट्टी व पाणीपट्टी कर न भरणाऱ्यांविरोधात कठोर पावले उचलली आहेत. विशेष वसुली मोहिमेत गेल्या दोन दिवसांत १३० हून अधिक थकबाकीदारांची नळजोडणी खंडित करण्यात आली. यामुळे कर थकबाकीदारांवर पाण्याविनाच राहण्याची वेळ आली असून, या कारवाईमुळे शहरातील अनेकांनी तातडीने थकबाकी भरण्यास सुरुवात केली आहे.

पालिकेकडून गेल्या काही महिन्यांपासून विविध माध्यमांतून थकबाकीदारांना वारंवार सूचना देण्यात येत होत्या. बॅनर, रिक्षाद्वारे घोषणाबाजी, घंटागाडी आणि नोटिसा बजावून नागरिकांना कर भरण्याचे आवाहन करण्यात आले. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने अखेर प्रशासनाने प्रत्यक्ष कारवाईचा मार्ग अवलंबला आहे.

**थकबाकीदारांवर पुढील टप्प्यात जप्तीची कारवाई**

या मोहिमेबाबत मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी सांगितले की, शहरातील सुमारे १८०० पाणीपट्टी आणि ६०० घरपट्टी थकबाकीदार प्रशासनाच्या रडारवर आहेत. पालिकेकडून नागरिकांना अनेक वेळा सूचना देण्यात आल्या आहेत. तरीही कर न भरणाऱ्यांवर आता कठोर कारवाई सुरू करण्यात आली आहे. ही मोहीम ३१ मार्चपर्यंत आणि त्यानंतरही सातत्याने सुरू राहणार आहे. गरज पडल्यास पुढील टप्प्यात थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्तीची प्रक्रियाही सुरू करण्यात येईल.

पालिकेच्या वसुली पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने शहरातील विविध भागांमध्ये मोहीम राबवली. पहिल्याच दिवशी बोरोलेनगर-१, महालक्ष्मीनगर, पंकजनगर परिसरात पथकाने घराघरांपर्यंत जाऊन थकबाकीदारांची तपासणी केली. वारंवार सूचना देऊनही पाणीपट्टी न भरलेल्या नागरिकांची नळजोडणी तत्काळ खंडित करण्यात आले. दुसऱ्या दिवशी मोहिमेचा प्रशासनाने भोकरवाडा, मोमीन गल्ली, कुंभारवाडा, बारीवाडा, समतानगर, गुजराथी गल्ली, तेलीवाडा आणि गोल मंदिर परिसरात कारवाई केली. या भागात अनेक वर्षांपासून पाणीपट्टी थकवलेल्यांवर पथकाने थेट नळजोडणी बंद करण्याची कारवाई केली. कारवाईमुळे अनेक नागरिकांनी तातडीने पालिका कार्यालयात धाव घेऊन थकबाकी भरून नळजोडणी पुन्हा सुरू करण्यासाठी अर्ज केले.

**पाणीपट्टीकडे दुर्लक्ष; पालिकेवर आर्थिक ताण**

पालिका प्रशासनाच्या माहितीनुसार, शहरात घरपट्टी काही प्रमाणात भरली जात असली, तरी पाणीपट्टी भरण्याकडे अनेक नागरिक जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे आढळून आले आहे. परिणामी पालिकेला मोठ्या आर्थिक ताणाचा सामना करावा लागत आहे. शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी दरमहा मोठ्या प्रमाणात खर्च होतो. पाणी शुद्धीकरण प्रक्रिया, मोटारपंपांचे वीजबिल, जलवाहिनी देखभाल-दुरुस्ती यासाठी लाखोंचा खर्च होतो. पाणीपट्टीची वसुली न झाल्यास ही संपूर्ण व्यवस्था चालवणे कठीण होऊ शकते, अशी चिंता प्रशासनाने व्यक्त केली.

**कारवाईदरम्यान वाद; पालिका प्रशासन ठाम**

वसुली पथक नागरिकांच्या दारात पोहोचताच काही ठिकाणी वादाचे प्रसंगही घडत असल्याचे दिसून आले. काही नागरिकांनी कारवाईला विरोध करीत 'आमची हेतुपुरस्सर बदनामी केली जात आहे' असा आरोप केला, तर काहींनी लोकप्रतिनिधींकडे जाऊन 'मुदत दिली नाही' असा कांगावा करण्याचाही प्रयत्न केला. ज्या नागरिकांनी पथकाकडे लेखी अर्ज करून मुदत मागितली आहे, त्यांनाच लोकप्रतिनिधींच्या मध्यस्थीने २ ते ७ दिवसांचा अवधी दिला जात आहे; अन्यथा नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. आरडाओरड करून किंवा दबाव टाकून कारवाई थांबविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना आता कुठलीही सवलत दिली जाणार नसल्याचे पालिका प्रशासनाने स्पष्ट केले.



**थकबाकीदारांना पालिका प्रशासनाकडून इशारा**

आपली सामाजिक प्रतिष्ठा जपण्यासाठी आणि शहराचा विकास थांबू नये यासाठी घरपट्टी व पाणीपट्टीची थकबाकी तातडीने भरावी; अन्यथा पुढील काही दिवसांत शहरातील इतर भागांतही अशाच प्रकारची कारवाई तीव्र करण्यात येणार आहे, असा इशाराही पालिका प्रशासनाने थकबाकीदारांना दिला आहे.

# पाचोऱ्यात भाजपतर्फे प्रशिक्षण महाअभियानाचा समारोप

## कार्यकर्त्यांच्या वैचारिक बळकटीसह संघटनात्मक सक्षमीकरणावर भर



**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा, १५ मार्च**

भाजपच्या कार्यकर्त्यांच्या वैचारिक बळकटीसाठी आणि संघटनात्मक सक्षमीकरणासाठी दोनदिवसीय पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानाचा रविवारी (१५ मार्च) उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. शिबिरात पक्षाचा इतिहास, संघटनात्मक कार्यपद्धती, वैचारिक अधिष्ठान, सोशल मीडिया व नमो ॲपचा प्रभावी वापर, बूथ व्यवस्थापन तसेच 'अंत्योदय'ची संकल्पना अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

शहरातील पुनगाव स्त्यावरील निर्मल इंटरनॅशनल स्कूलमध्ये झालेल्या प्रशिक्षण शिबिरात नगरदेवळा व पिंपळगाव मंडळातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पक्षविचार अधिक दृढ करण्याचा संकल्प व्यक्त केला. परिभक्त परायणज्ञानेश्वर महाराज जळकेकर यांनी भाजपचा इतिहास सखोल व प्रभावी पद्धतीने उलगडून सांगितला. पक्ष हा केवळ राजकीय नसून राष्ट्रनिष्ठ विचारसरणी आणि दूरदृष्टी असलेले संघटन आहे. भविष्यातील भारत घडविण्याचा स्पष्ट वैचारिक दृष्टिकोन पक्षासमोर असून, त्याच दिशेने कार्यकर्त्यांनी कार्य करावे, असे त्यांनी नमूद केले.

भाजपच्या नेत्या वैशाली सूर्यवंशी यांनी 'अंत्योदयातील संपृक्तता' या महत्त्वपूर्ण विषयावर मार्गदर्शन केले. केंद्रातील भाजप सरकार तसेच महाराष्ट्रातील महायुती सरकार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विविध कल्याणकारी योजना पोहोचविण्याच्या उद्देशाने सातत्याने प्रयत्नशील आहे. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचवणे हीच खरी 'अंत्योदय'ची संकल्पना असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यकर्त्यांनी शासनाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून समाजातील वंचित घटकांपर्यंत विकासाचा प्रवाह नेण्याचे कार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रशिक्षण शिबिराच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना पक्षविचारांची नव्याने ओळख मिळाली तसेच संघटन अधिक सक्षम करण्यासाठी प्रेरणा मिळाली.कार्यक्रमाला सुभाष पाटील, गोविंद शेलार, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा अर्चना पाटील व सविता शेळके यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रशिक्षण शिबिरामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, पक्षाची विचारधारा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. संघटन अधिक सक्षम, सजग आणि जनतेशी अधिक दृढपणे जोडण्यासाठी हा प्रशिक्षण उपक्रम उपयुक्त ठरल्याची भावना या वेळी व्यक्त करण्यात आली.



# झुरखेडे येथे समाधान शिबिर उत्साहात

## विविध योजनांचा शेकडो लाभार्थ्यांना मिळाला लाभ

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १५ मार्च**

धरणगाव तालुक्यातील झुरखेडे मंडळातील विठ्ठल मंदिर परिसरात शनिवारी (१४ मार्च) सकाळी छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियानांतर्गत शिबिर घेण्यात आले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते विविध शासकीय योजनांचे लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले.

पालकमंत्री पाटील यांनी प्रशासनाने नागरिकांच्या अडचणी संवेदनशीलतेने व तातडीने सोडविण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील नागरिकांना छोट्या कामांसाठी तालुका किंवा जिल्हा कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नये, यासाठी शासनाच्या सेवा थेट गावपातळीवर पोहोचविण्याचा हा उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले. गरीब, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांची कामे या शिबिरातून तसेच पुढेही प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकारी व ग्रामस्तरावरील कर्मचाऱ्यांना दिल्या. शिबिरात विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी आवश्यक असलेले ७६५ दाखले वितरित करण्यात आले. तसेच 'जिवंत ७/१२' मोहिमेंतर्गत तालुक्यातील ७५९ मृत खातेदारांच्या वारस नोंदी घेऊन त्यांची नावे ७/१२ वर नोंदवून उतारे वितरित करण्यात आले. विविध विभागांच्या माध्यमातून अनेक सेवाही देण्यात आल्या.

या वेळी नायब तहसीलदार लक्ष्मण सातपुते, संदीप मोरे, मंडळ अधिकारी हेमंत महाजन, ग्राम महसूल अधिकारी शांतिलाल नाईक, हर्षल थाटे, मोहन चौगले, जावेद देशमुख, गौरव बाविस्कर, गट विकास अधिकारी किशोर वानखेडे, तालुका कृषी अधिकारी प्रशांत देसाई, दत्तात्रय वाघ, भूमी अभिलेख उपअधीक्षक तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सुनील पाटील यांनी सूत्रसंचालन केले. तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकात, या अभियानामागील उद्देश स्पष्ट केला.

कार्यक्रमाला परिसरातील सरपंच म्हणून सुरेश पाटील, छाया पाटील, विजय पाटील, वंदना शंकर पाटील, उत्तम देवचंद सोनवणे, मंजुळाबाई श्रीकांत चव्हाण, गुलाबकांत चव्हाण, सुरेश पाटील, गुलाबराव सोनवणे, धीरज पाटील, मिलिंद पाटील, कैलास पाटील आदींची विशेष उपस्थिती होती. तसेच परिसरातील पोलीसपाटील म्हणून प्रल्हाद चौधरी, छाया नवल अहिरे, दिलीप सावळे, वर्षा अनिल बोरसे, मुकुंदराव यशवंत निकम, भिका पाटील, सुनील धनगर, पुरुषोत्तम पाचपोळ आदींसह पदाधिकारी, लाभार्थी, ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते.

# सुटवा नाल्याच्या खोलीकरणासह रुंदीकरणाचे काम प्रगतिपथावर

## पातोंडा परिसर विकास मंच, नाम संस्थेचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा**
**पातोंडा (अमळनेर), १५ मार्च**

पातोडा परिसर विकास मंच व नाम फाउंडेशनच्या पुढाकारातून आणि मदतीने सुटवा नाला खोलीकरण व रुंदीकरणाचे काम सुरू झाले आहे. आता काम प्रगतिपथावर असून, यामुळे परिसरातील जलपातळी वाढून, पिकांचे होणारे नुकसान भविष्यात थांबणार आहे.

येथील सुटवा नाला खोलीकरण व रुंदीकरण कामाबाबत शेतकऱ्यांची बऱ्याच वर्षांपासून मागणी होती. सुटवा नाला रुंदी आणि खोली नसल्यामुळे दरवर्षी पावसाच्या पुराचे पाणी शेतात पसरून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान होत होते. सुटवा नाला खोलीकरण व रुंदीकरणाबाबत पातोंडा परिसर विकास मंचने शेतकऱ्यांच्या सहाय्याने सर्वेक्षण करीत कामाचे नियोजन केले. नाम






संस्थेने नाला खोलीकरणासाठी पोकलेन उपलब्ध करून दिले, तसेच लोकसहभागातून डिझेल उपलब्ध करण्यात आले. या कामासाठी पातोंडा ग्रामपंचायतीसह ग्रामस्थांचे सहकार्य लाभत आहे. यावर्षी शेतकऱ्यांच्या मागणीवर लवकरच कामाला सुरुवात करण्यात आली आहे. नाला खोलीकरण आणि रुंदीकरणामुळे पिकांचे होणारे नुकसान निश्चितपणे भविष्यात थांबणार आहे. यातून शेतकऱ्यांना मोठा लाभ होणार आहे.

दरम्यान, पातोडा परिसर विकास मंच व नाम फाउंडेशनतर्फे यापूर्वीही नाला खोलीकरण, कालवा पुनर्जीवित करणे, तसेच रिचार्ज सॉफ्ट, वृक्ष लागवड यांसारखी कामे करण्यात आली आहेत. या कामांमुळे परिसरातील जलपातळी उंचावली आहे.

# महापुरुषांची स्मारके प्रेरणा देणारी

## शेंदुर्णी येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या लोकार्पणप्रसंगी मंत्री महाजन यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**शेंदुर्णी (ता. जामनेर), १५ मार्च**

अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा हा प्रेरणा व आदर्श निर्माण करणारा ठरेल. यासाठी जामनेर तालुक्यात मागेल त्या गावी पुतळा उभारण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार आहे. थोर पुरुषांचे पुतळे केवळ निर्माण न करता, जीवनामध्ये त्यांचा आदर्श घेऊन तरुणांनी व्यसनापासून लांब जावे, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी केले.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवसृष्टी व अश्वारूढ पुतळ्याचा लोकार्पण सोहळा शनिवार, दि.१४ रोजी शिवतीर्थ, रेल्वे स्टेशन परिसर येथे पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी रोहन घुगे, धी शेंदुर्णी एज्युकेशन सोसायटी को ऑफ सोसायटीचे अध्यक्ष संजय गरुड, तहसीलदार नानासाहेब आगळे, जामनेर एज्युकेशन संस्थेचे सचिव जितेंद्र पाटील, भाजपाचे ज्येष्ठ नेते जे.के. चव्हाण, बाबुराव घोंगडे, प्रकाश झंवर, तालुकाध्यक्ष कमलाकर पाटील, नगरसेवक अरविंद देशमुख, दीपक तायडे, अविनाश सूर्यवंशी, प्रदीप लोढा, डॉ.सागर गरुड, शिवप्रतिष्ठान समितीच्या अध्यक्षा विजय खलसे, शिवस्मारक समितीचे पदाधिकारी उत्तमराव थोरात, पंडितराव जोहरे, सागरमल जैन, विजय वानखेडे, योगेश बारी, ॲड.धर्मराज सूर्यवंशी, डॉ.विजयानंद कुलकर्णी, फरीद पठाण, पंडित दीनदयाल उपाध्याय पतसंस्थेचे चेअरमन अमृत खलसे, राजेंद्र भारुडे, जामनेर मार्केट कमिटीचे संचालक सुभाष पाटील, जामनेर शेतकी संघाचे संचालक तुकाराम पाटील, डॉ.हेडगेवार शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा कौमुदि साने, माजी जिल्हा परिषद सदस्या सरोजिनी गरुड, शेंदुर्णी फ्रुटसेल सोसायटीचे उपाध्यक्ष डॉ.किरण सूर्यवंशी, हभप कडोबा माळी, सुधाकर बारी, भाजपा युवा मोर्चा तालुकाध्यक्ष हर्षल चौधरी, पंकज सूर्यवंशी, सामाजिक कार्यकर्ते सिद्धू लुनिया, लोकनियुक्त नगराध्यक्ष गोविंद अग्रवाल, उपनगराध्यक्ष शरद बारी, भाजपा गटनेते अतुल बारी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या



पुतळ्याचे पाद्यपूजन करण्यात आले. त्यानंतर ना.गिरीश महाजन यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.

पुढे बोलतांना ना.महाजन यांनी, शेंदुर्णीत समाज मंदिर, विविध मंदिरे, रस्ते, गटारी, पाणीपुरवठा योजनांसाठी करोडो रुपयाचा निधी देऊन विकास केला आहे. शिवस्मारकाचेही स्वप्न पूर्ण झाले आहे. आता लवकरच महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नवीन पुतळ्याचा लोकार्पण सोहळा होणार आहे. शेंदुर्णी बस स्थानकाची केलेली मागणी ही रास्त आहे, ती सुद्धा लवकरात लवकर पूर्ण होईल, असे सांगून विकास कामांच्या माध्यमांतून शेंदुर्णीचा चेहरा मोहरा बदलल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी कोणताही निधी अपुरा पडू देणार नाही, अशी ग्वाही देखील त्यांनी यावेळी दिली. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष गोविंद अग्रवाल यांनी देखील मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याधिकारी विवेक धांडे यांनी तर सूत्रसंचालन अपूर्वा वाणी यांनी केले. आभार नगरसेवक शांताराम गुजर यांनी मानले.

पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी फटाक्यांची आतिषबाजी व विद्युत रोषणाईने परिसर जण उजळून निघाला होता या सोहळ्यासाठी शेंदुर्णीत शिवप्रेमींचा जनसागर उसळला होता. शाहीर शिवाजीराव पाटील यांच्या बहारदार पोवाड्यांनी वातावरण शिवमय झाले होते. गरुड विद्यालय व गुरुकुल विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी देखील शिवाजी महाराजांच्या जीवनावरील देखावे सादर केले. या कार्यक्रमाचे स्वागत गीत गरुड विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केले

जळगाव
तरुण भारत
www.tarunbharatjalgaon.com






## महत्त्वाचे

### आज जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन

**जळगाव :** जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन सोमवारी (१६ मार्च) जिल्हाधिकारी यांच्या दालनात सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रफिक हुरमत रुबाब तडवी यांनी ही माहिती दिली आहे. समस्याग्रस्त व पिडीत महिलांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे. तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होवून त्यांना न्याय मिळावा. या दृष्टीने महिलांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी व समाजातील पिडीत महिलांना मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी. यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून महिला लोकशाही दिन जिल्हा स्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी राबविण्यात येतो. त्यानुसार आज लोकशाही दिनाचे आयोजन केले आहे.

### पैशांसाठी विवाहितेचा छळ

**जळगाव :** चारित्र्याचा संशय घेत तसेच रिक्षा घेण्यासाठी माहेरुन दोन लाख रुपये घेऊन आणण्याची मागणी करत २६ वर्षीय विवाहितेचा मानसिक शारिरीक झळ करत सासरच्या लोकांनी त्रास दिला. ५ फेब्रुवारी २०१७ नंतर सहा महिने ते २७ जून २०२५ पावेतो तिचा छळ केला. लग्नात मानपान,हुंडा दिला नाही. मुळ दिले नाही अशा कारणांवरुन विवाहितेला माहेरी त्रास देण्यास सुरुवात केली. त्यांनतर वारंवार टोचुन बोलणे, चारित्र्यावर संशय घेणे असा त्रास दिला. दोन लाखाची मागणी केली. या जाचाला कंटाळत विवाहितेने थेट पोलिसात कैफियत मांडली. त्यानुसार याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात पती राहुल पाटील (रा. कुसुंबा) , सासु सुनंदाबाई पाटील यांच्यासह माम सासरे, संतोष पाटील, मावस दिर, ननंद ,नंदोई अशा सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार मुकूंद पाटील हे तपास करीत आहेत.

### बेशुद्ध होऊन मृत्यू


**जळगाव :** शौचास गेलेले गृहस्थ बेशुध्द अवस्थेत मिळाले. त्यांना तत्काळ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलविले असता तपासणीअंती डॉक्टरांनी मृत घोषीत केले. शनिवारी (१४ मार्च) दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास ही घटना शहरात जोशीपेठ परिसरात घडली. रवी सुरेश वाणी (वय ५०, रा. जोशीपेठ) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी शनिपेठ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. सहायक फौजदार गणेशकुमार नायकर हे तपास करीत आहेत.

### अपघातात सहा जण जखमी

**जळगाव :** वेगवेगळ्या रस्ता अपघाताच्या घटनेत सहा जण जखमी झाले. शासपकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात जखमींना दाखल करण्यात आले आहे. दिलीप दामु सोनार (वय ४७,रा.जुने जळगाव), प्रमोद शिवाजी ठोंबरे (वय ३७,रा.खेडी), आशाबाई निवृत्ती शिंदे ( वय ३५,रा. भागंदरे),गोकुळ रामलाल पाटील (वय ५२,रा.रामेश्वर कॉलनी), योगेश विश्वनाथ कोळी (वय ४०,रा. सावळदा), अमोल खैरनार (वय २२,रा. सुप्रिम कॉलनी) यांचा जखमींमध्ये समावेश आहे. सर्वांवर उपचार सुरु असुन प्रकृती स्थिर असल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले.

### सर्पदंशाने तिघे अत्यवस्थ

**जळगाव :** वेगवेगळ्या ठिकाणी सर्पदंश होऊन तीन जणांना विषबाधा झाली. गुलशेर शेख (वय ४८, रा.फर्दापूर), योगेश सुरेश गवळे (वय ३४, खामखेडा), विनोद धोंडू कोळी (वय ३७,रा. आडगाव) अशी बाधितांची नावे आहेत.



गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध
संपर्क – (०२५७) २२३६१६६, २२२३६९९

अंकासाठी संपर्क
'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९०२३३४५५५०
९६२३६०४७१२

# सात जणांना पोलीस कोठडी

## पोलीस ठाण्यात हाणामारीप्रकरणी शासकीय कामात अडथळा; शांतताभंग प्रकरणी गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १५ मार्च**

भाजपाचे माजी नगरसेवक तसेच शिवसेना शिंदे गट पदाधिकारी असे दोन गट शनिवारी (१४ मार्च) शनिपेठ पोलीस ठाण्यात थेट भिडले होते. हा राडा सोडविण्यासाठी पोलिसांची कसरत झाली. कायदा आणि सुव्यवस्था अडचणीत आणल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात पोलिसांनी दहा जणांना ताब्यात घेतले आहे. रविवारी (१५ मार्च ) संशयितांना न्यायालयात हजर करण्यात आले. त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. हाणामारीत जखमी झालेल्या तिघांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



भाजपाचेत माजी नगरसेवक कैलास सोनवणे तसेच शिवसेना शिंदे गटाचे पादाधिकारी राहुल ठाकरे यांच्यात महापालिकेतील निविदेच्या कारणावरुन वाद झाला होता. यावादातून दोघे परस्पर विरोधात तक्रार देण्यासाठी शनिपेठ पोलीस ठाण्यात शनिवारी आले होते. ही प्रक्रिया होत असताना राहुल ठाकरे यांनी माजी नगरसेवक कैलास सोनवणे यांना पोलीस ठाण्यात शिरुन मारहाण केली. त्यानंतर दोन्ही गट आमनेसामने आले. पोलिसांनी कार्यकर्त्यांची आवराआवर करत वाद मिटविला. या प्रकरणी रात्री उशिरा पोलिसांनी दहा जणांना ताब्यात घेतले.

रोहीत कैलास सोनवणे (वय ३७), कल्पेश कैलास सोनवणे (वय २९) विलास नारायण सोनवणे (वय ४७, तिघे रा.शनिपेठ) तसेच राहुल उर्फ मोगली मोहन ठाकरे (वय ३५) जयेश विठ्ठल सोनवणे (वय १९), आशिष शैलेश ठाकरे (वय २४), यश अशोक बाविस्कर ( वय १९, रा. वाल्मिकनगर), शैलेश उर्फ डिंगबर ठाकरे (वय ५५), हितेश डिंगबर ठाकरे (वय २८) विशाल उर्फ टायगर प्रल्हाद सोनवणे (वय ३०) असे ताब्यात घेतलेल्या संशयितांची नावे आहेत.

दरम्यान शैलेश ठाकरे, हितेश ठाकरे,विशाल सोनवणे या तिघांना दुखापत झाली असुन त्यांना शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

# पैसे पडले सांगत रिक्षामधून रोकड लांबविली

## बँकेत भरणा केल्याने चालकाचे वाचले एक लाख रुपये

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १५ मार्च**

तुमचे पैसे पडले, असे पाठीमागुन येणाऱ्याने एका रिक्षा चालकाला सांगितले. चालकाने खाली पाहिले असता दहा आणि वीस रुपयांच्या नोटा पडल्या होत्या. त्या उचलण्याचा प्रयत्न चालकाने केला असता पुढुन आलेल्या भामट्याने रिक्षामध्ये ४५ हजार रुपये ठेवलेली कापडी पिशवी घेत दोघे भामटे दुचाकीने पसार झाले.

शुक्रवारी (१३ मार्च ) दुपारी एक वाजेच्या सुमारास भामट्यांनी हा कारनामा नवीपेठेत एथर दुचाकी शोरुमजवळ रस्त्यावर केला. याप्रकरणी शनिवारी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

शुभम प्रकाशचंद राठी (वय ३१,रा. गणपतीनगर, कुसुंबा खुर्द) हे रिक्षा चालवुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांनी घरुन एक लाख ५५ हजार रुपयांची रोकड एका कापडी पिशवीत ठेवली. ती घेऊन ते शहरात आले. नेहरु चौकातील आयडीबीआय बँकेत त्यांनी सीडीएममशीनव्दारे ५२ हजार ६०० रुपयांची रोकड भरणा केली. त्यानंतर त्यांनी त्यांच्या मित्राकडून हात उसनवारीने घेतलेली ४६ हजार ५०० रुपयांचा भरणा एचडीएफसी बँकेत त्यांनी केला. ४५ हजार रुपये ते अन्य बँकेत भरणा करणार होते.

**भामट्यांनी साधला डाव**

दोन बँकेत पैसे भरणा केल्यानंतर तिसऱ्या ठिकाणी नवीपेठेतील एथर दुचाकीसमोर चालक शुभम राठी आले.याठिकाणी दोन भामट्यांनी त्यांच्यावर डाव साधला. रिक्षा मागुन आलेला भामट्याने चालक राठी यांना आवाज देत म्हणाला, तुमचे पैसे खाली पडले. रिक्षा चालकाने खाली वाकुन पाहिले असता वीस आणि दहा रुपयांच्या नोटा खाली पडल्या होत्या. त्या नोटा खिशातून पडल्या,असे समजुन चालक वाकुन नोटा हातात जमा करू लागला. तेवढ्यात पुढे उभा असलेल्या साथीदाराने रिक्षाकडे येत रिक्षामधुन कापडी पिशवी शिताफीने काढली. त्यावर मागे असलेला भामटा दुचाकीवर बसुन फरार झाला.

घटनास्थळी पोलीस निरीक्षक सागर शिंपी तसेच अंमलदार यांनी जावुन प्रकार जाणुन घेतला. जागेवर पंचनामा केला. तसेच फुटेज प्राप्त करुन तपासाला गती दिली. हवालदार दीपक शिरसाठ हे तपास करीत आहेत.

# उपमहापौर मनोज चौधरी यांचा आज मनपात 'जनता दरबार'

## कर्मचाऱ्यांशीही संवाद साधणार; दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १५ मार्च**

महापालिकेत अडीच वर्षानंतर महायुतीची सत्ता स्थापन झाली आहे. महापौर आणि उपमहापौरांनी सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी महत्वाचे निर्णय घेतले आहे. उपमहापौर मनोज चौधरी यांनी सोमवारी १६ रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत जनता दरबारचे आयोजन केले आहे.



महापालिकेच्या दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात हा जनता दरबार होणार आहे. यात उपमहापौर मनोज चौधरी हे कर्मचाऱ्यांशीही संवाद साधणार आहेत. काम करताना अनेक वेळा कर्मचारी वर्गाला विविध प्रशासकीय, सेवा विषयक तसेच कार्यस्थळी येणाऱ्या अडचणींना सामोरे जावे लागते. कर्मचाऱ्यांच्या या समस्या व अडचणींबाबतचे म्हणणे तसेच सूचना प्रत्यक्ष ऐकून घेण्यासाठी तसेच त्यावर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी ''कर्मचारी संवाद व जनता दरबार''आयोजित करण्यात येत आहे.

या संवादाच्या माध्यमातून महानगरपालिकेतील सर्व विभागांतील स्थायी कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी यांना त्यांच्या सेवा विषयक अडचणी, कामकाजातील समस्या, सूचना तसेच इतर प्रश्न थेट मांडण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. कर्मचाऱ्यांनी मांडलेल्या प्रश्नांवर संबंधित विभाग व प्रशासनाकडे योग्य त्या स्तरावर पाठपुरावा करून न्याय्य व सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. तरी नागरिक आणि कर्मचारी यांनी आपल्या समस्या, तक्रारी, सूचना व मागण्या लेखी स्वरूपात सादर करून जनता दरबारास उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



# 'वाणी प्रीमियर लीग' रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १५ मार्च**

तिसऱ्यांदा आयोजित वाणी प्रिमियर लिग तर्फे रविवारी (१५ मार्च) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात २५ रक्तदात्यांनी स्वयंस्फुर्तीने रक्तदान केले.

श्री काथार(कंठहार) वाणी समाज सेवा संघाचे शेठ नागो गणू वाणी मंगल कार्यालय व छात्रालय येथे घेण्यात आलेल्या या रक्तदान शिबीरात वाणी प्रिमियरचे खेळाडू , समाज बांधव, भगिनी यांच्यासह २५ रक्तदात्यांनी स्वेच्छेने सहभाग घेतला.

रक्तदान शिबिर चे आयोजन हे वाणी प्रीमियर लीग सदस्य राज वाणी यांच्या वाढदिवस निमित्त तसेच वाणी प्रिमियर लिगचा खेळाडू गौरव हरिपाल वाणी व पायल यांनी सुध्दा जोडीने रक्तदान केले. या रक्तदान शिबिरात रक्तादान केलेल्या सर्व रक्तदात्यांचे वाणी प्रिमियर लिग चे सर्व खेळाडूंनी मनापासून आभार मानले. कार्यक्रमासाठी सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. राज वाणी,गौरव वाणी, जितेंद्र वाणी, मनीष वाणी, दिनेश वाणी, केशव वाणी, जीवन वाणी, दिपक वाणी, हितेश वाणी, अजय वाणी आदी समाज बांधव यावेळी उपस्थित होते.

# जळगावात आज प्लेसमेंट ड्राइव्ह

**जळगाव :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव यांच्या वतीने सोमवारी ( १६ मार्च) सकाळी १० वाजता शहरातील शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, जी.एस. ग्राउंड जवळ, प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करण्यात आला आहे. या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये छबी इलेक्ट्रिकल्स तसेच सुप्रीम इंडस्ट्रीज लि., जळगाव यांसारख्या नामांकित उद्योगसंस्था सहभागी होणार असून विविध पदांसाठी मुलाखती घेतल्या जाणार आहेत.

ड्रिपलाईन मशीन ऑपरेटर, एचडीपीई लाईन इंजिनिअर, मेंटेनन्स इंजिनिअर, रॉ मटेरियल स्टोअर मॅनेजर, अकाउंट ऑफिसर, क्वालिटी टेक्निशियन, प्रोडक्शन इंजिनिअर, लॉजिस्टिक अँड अकाउंट असिस्टंट, स्टोअर/परचेस इंजिनिअर आदी पदांसाठी संधी उपलब्ध आहेत. यासाठी बी.कॉम, एम.कॉम, बीएस्सी (फिजिक्स), बी.ई., डिप्लोमा, एमबीए (फायनान्स) अशा शैक्षणिक पात्रता असलेले उमेदवार पात्र राहतील. ज्या उमेदवारांनी नोंदणी केलेली नाही त्यांनी सर्व शैक्षणिक कागदपत्रांसह मुलाखतीच्या दिवशी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, जी.एस. ग्राउंड जवळ, जळगाव येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा किंवा दूरध्वनी क्रमांक ०२५७-२९५९७९० वर संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त संदीप गायकवाड यांनी केले आहे.

# जिओ टॉवरचे डिझेल नेले चोरून

**जळगाव :** जिओ कंपनीच्या टॉवरजवळील जनरेटरसाठी असलेले सुमारे१५ हजार ६३४ रुपये किमतीचे १७० लिटर डिझेल चोरट्यानी चोरुन नेले. तरसोद गावातील आसोदा रोडवरील जिवो टॉवर याठिकाणी ही घटना सोमवारी (१६ फेब्रुवारी) मध्यरात्री ही घटना घडली. याप्रकरणी शनिवारी (१४ मार्च) तक्रारीनुसार नशिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विजय नागराज पाटील (वय ४९,रा. अथर्व कॉलनी, आशाबाबानगर,जळगाव) हे जिओ कंपनीत सुपर वायझर म्हणून कार्यरत आहेत. आसोदा रोड तरसोद शिवारात जिओ कंपनीचे टॉवर कार्यरत आहे. या ठिकाणी जनरेटरसाठी डिझेल ठेवले होते. ते चोरट्यांनी चोरुन नेले. या प्रकरणी गुन्ह्याचा तपास सहायक फौजदार राजेश मेढे हे करीत आहेत.

# पोलीस शिपाई भरती : २०४० उमेदवारांनी दिली लेखी परीक्षा

**जळगाव :** जळगाव जिल्हा पोलीस दलाच्या आस्थपनेवरील रिक्त १७१ पोलीस पदे भरण्यासाठी रविवारी शारीरिक व मैदानी चाचणीत पात्र ठरलेल्या २०४० उमेदवारांनी रविवारी (१५ मार्च) लेखी परीक्षा दिली. एम.जे. कॉलेज या परीक्षा केंद्रावर सकाळी ११ ते दुपारी १२.३० दरम्यान अतिशय कडक बंदोबस्तात आणि पारदर्शकतेने ही प्रक्रिया पार पडली. लेखी परीक्षेसाठी पात्र २०९६ उमेदवारांना बोलविण्यात आले होते. प्रत्यक्षात २०४० उमेदवार हजर राहिले. तर ५६ उमेदवार गैरहजर राहिले.

पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांच्या थेट मार्गदर्शनाखाली आणि कडक बंदोबस्तात ही प्रक्रिया राबविण्यात आली. परिक्षा दरम्यान कोणताही गैरप्रकार अथवा अनुसुचित प्रकार घडला नाही. पुढील प्रक्रिया लेखी परिक्षेचा निकाल आणि अंतिम निवड यादीबाबतच्या सूचना जळगाव पोलीस दलाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या जातील. भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शकतेवर आधारित आहे. उमेदवारांनी अफवांना बळी पडू नये,असे आवाहन करण्यात आले आहे.

# पावणेदोन लाख किमतीचे पाच मोबाईल कुरिअरचे बॉक्स भामट्याने नेले चोरून

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १५ मार्च**

वेगवेगळ्या कंपनीचे पाच मोबाईल कुरियर बॉक्समध्ये ठेवले होते. भामट्याने संधी साधत सुमारे एक लाख ७९ हजार ८९६ रुपये किमतीचे मोबाईल चोरुन नेले. ही घटना मंगळवारी (३ फेब्रुवारी) दुपारी १२.२४ वाजेच्या सुमारास शहरातील आकाशवाणी चौकापुढे श्रीस्वामी ट्रॅव्हल्सचे कार्यालयासमोर घडली. याप्रकरणी शनिवारी (१४ मार्च) जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

भुषण रमेश पाटील (वय ३०,रा. पंढरपूरनगर मु.पो.कंडारी) हे कुरीयर सेवा देतात. वेगवेगळ्या कंपनीचे पाच मोबाईल त्यांनी कुरीयरचे बॉक्समध्ये पॅक करुन ते आकाशवाणी चौकापुढील श्रीस्वामी ट्रॅव्हल्सचे कार्यालयासमोर ठेवले होते.एकाने हे पार्सल शिताफीने लांबवून पसार केले.

या बॉक्समध्ये २२ हजार ९९९ रुपये किमतीचा विवो (वाय ४००) , २९ हजार ९९९ किमतीचा ओप्पो( एफ ३१), २१ हजार ९९९ किमतीचा ओप्पो (ए ६), २१ हजार ९९९ ओप्पो ए ६, ८२ हजार ९०० रुपये किमतीचा ॲप्पल आयफोन ( २५६ जीबी) असा एकुण एक लाख ७९ हजार ८९६ रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

सहायक पोलीस निरीक्षक अनिल वाघ यांनी घटनास्थळी जावुन प्रकार जाणुन घेतला. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा शोध घेऊन फुटेज प्राप्त केले जाईल. तसेच हा बॉक्स कोणाच्या स्वाधीन केला होता किंवा कसे? या अनुषंगाने तपासातून शोध घेतला जाईल,असे सुत्रांकडून सांगण्यात आले. हवालदार नरेश सोनवणे हे तपास करीत आहेत.

# गुंगीचे औषध देत महिलेवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १५ मार्च**

थंडपेयमध्ये गुंगीचे औषध टाकत ते पिण्यासाठी दिले. त्यानंतर नातेवाईक असलेल्या संशयितांनी पीडित महिलेवर आळीपाळीने अत्याचार केला. ही संतापजनक घटना शहरात एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत शुक्रवारी आणि शनिवारी (१३ व १४ मार्च) रात्री घडली. पीडितेने दिलेल्या जबाबानुसार याप्रकरणी दोन संशयितांविरोधात अत्याचार केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असुन एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

३१ वर्षीय महिला वॉचमन म्हणून शहरात कार्यरत आहे. पीडित महिलेच्या जबाबानुसार नातेवाईक असलेल्या संशयिताकडे तिला नेले होते. त्याठिकाणी तिला थंडपेयमधुन गुंगीचे औषध प्यायला दिले. त्यानंतर दोघांनी तिच्यावर अत्याचार केला.

## शहरात क्लेषदायी घटना उघड

दरम्यान प्रकृती अत्यवस्थ असल्याने पीडितेला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे, पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांनी घटनास्थळी धाव घेतली. सहायक पोलीस निरीक्षकक माधुरती बोरसे यांनी रुग्णालयात जावुन महिलेची विचारपुस केली. पीडितेने दिलेल्या जबाबानुसार याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात राजेंद्र शिवराम पवार, राजेंद्र शंकरसिंह पवार यांच्यावर अत्याचार केल्याचा गुन्हा शनिवारी (१४ मार्च) दाखल करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी राजेश पवार याला ताब्यात घेत अटक केली. त्याच्या अन्य साथीदाराचा शोध घेतला जात आहे. सहायक पोलीस निरीक्षक गणेश वाघ तपास करीत आहेत.

**महिलेचा विनयभंग**

मावस भावाला संशयित मारहाण करीत होता. ते सोडविण्यासाठी ३१ वर्षीय महिला गेली असता संशयिताने महिलेचा विनयभंग करत लज्जास्पद कृत्य केले. ही घटना शनिवारी (१४ मार्च) संध्याकाळी साडेसात वाजेच्या सुमारास एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. मावशी तसेच मावसभाऊ यांनी पिडीतेला सोडविले असता याचा राग येऊन संशयिताने जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी तक्रारीनुसार भावेश पाटील (रा.कुसुंबा) याच्या विरोधात विनयभंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक संजय पाटील हे तपास करीत आहेत.

# उद्यापासून वादळी पावसाची शक्यता

## काढणी पिकांची शेतकऱ्यांनी घ्यावी काळजी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १५ मार्च**

उद्या मंगळवारी १७ ते शुक्रवारी (२० मार्च) दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. अवकाळी पावसाने मका, बाजरी तसेच केळी या पिकांची सुरक्षेचा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावणारा आहे.

सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील नाकारता येत नाही. त्यामुळे काढणी पिकांची शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी,असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे कृषी विभागाकडून आवाहन करण्यात आले आहे.

# आयुष्यमान भारत योजनेचा लाभ घेण्यासाठी ई-केवायसी करा : जिल्हाधिकारी रोहन घुगे

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १५ मार्च**

आयुष्यमान भारत योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी इ केवायसी करुन घ्यावी,असे आवाहन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

एकत्रित आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समितीची बैठक नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालय येथे समितीचे पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी घुगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. स्वप्निल सांगळे यांनी आयुष्यमान भारत योजना घेतलेल्या रुग्णालयांनी दर्जेदार सुविधा रुग्णांना उपलब्ध करून द्याव्यात,असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. स्वप्निल सांगळे यांनी केले. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्वप्रथम आयुष्यमान कार्ड असणे आवश्यक आहे. महाराष्ट्राचा रहिवासी हा या योजनेत उपचार घेण्यासाठी पात्र आहे. पांढरी , केशरी व पिवळी यापैकी त्याची कोणतीही शिधापत्रिका असणे आवश्यक आहे. तसेच आयुष्यमान कार्ड काढण्यासाठी कुटुंचबाची ऑनलाईन शिधापत्रिका (डिजिटल) करून घ्यावी, तसेच त्यात नवीन सदस्य असतील तर त्यांचे नवे समाविष्ट करून अपडेट करून घ्यावे. एकत्रित कुटुंबाची माहिती यात असल्याने मोबाईल नंबर लिंकिंग आधार कार्डही योजना प्रणालीशी जोडणे गरजेचे आहे.



### सहा हजार आरोग्य मित्रांची टीम तत्पर

जिल्हा समन्वयक डॉ.सुमित जैन यांनी आशा सेविका, रेशन दुकानदार , सीएससी केंद्र तसेच रुग्णालयातील आरोग्य मित्र आदी जवळपास सहा हजार लोकांची टीम जिल्ह्यात कार्यरत आहेत. यापैकी कोणाकडेही गेल्यास ते आयुष्यांनान कार्ड काढून देतील,अशी माहिती नागरिकांना देण्यात आली. आयुष्यमान अप डाउनलोड करून सामान्य नागरिक स्वतः त्यांचे आयुष्यमान कार्ड काढू शकतात,असेही सांगण्यात आले. शून्य ते सत्तर वर्षापर्यंत या योजनेत कसा लाभ मिळू शकतो याबाबत सविस्तर माहिती देऊन शहर,तालुका तसेच जिल्हा स्तरावर रुग्णालयांची माहिती यावेळी देण्यात आली.

**तर रुग्णालयावर कठोर कारवाई**

जे रुग्णालय योजना घेऊन रुग्णांसाठी काम करीत नाही किंवा ज्यांनी काम अद्याप सुरू केले नाही अशा रुग्णालयांनी महिन्याभरात काम सुरु करावे,असे आदेश याबैठकीतून देण्यात आले. काम सुरू केले नाही,असे निदर्शनास आल्यास अशा रुग्णालयावर कठोर कारवाई करण्यात येईल,असा इशारा या बैठकीतून देण्यात आला. व्याधीग्रस्त गंभीर रुग्णांना रुग्णालयात गेल्यानंतर योजनेत लाभ घेताना त्रास होऊ नये, याकरिता सर्व नागरिकांनी आयुष्यमान कार्ड काढावे,असे आवाहन यावेळी करण्यात आले. या बैठकीत जिल्ह्यातील रुग्णालयांचा संलग्नीकरण, रुग्णालयांचा योजनेच्या काम ,आयुष्यमान कर्ड केवायसी, आयुष्यमान भारत वय वंदना योजना याचा आढावा घेण्यात आला.

**जगजागृतीवर भर**

योजनेत नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी सेवाभावी डॉक्टरांतर्फे तसेच सोशल मिडिया द्वारे जनजागृती करावी असे आवाहन डॉ. भरत बोरावले यांनी केले.जेष्ठ नागरिक यांनी आयुष्यमान भारत वय वंदना कार्ड काढून यात यात स्वयस्फूर्त सहभागी व्हावे असे आवाहन अरुण माळी यांनी केले . अस्थिरोग शस्त्रक्रिये करिता योजनेत समाविष्ट रुग्णालयांना काही अडचणी किंवा त्रुटी आहेत त्या दूर करण्यासाठी आरोग्य मित्र व त्या रुग्णालय प्रमुखांची कार्यशाळा घेऊन रुग्णहितासाठी कार्य करण्याचे आवाहन सदस्य मुकुंद गोसावी यांनी केले. आरोग्य योजनेचे कार्ड जोड उपक्रमासाठी आरोग्य विभागाला सहकार्य असेल,अशी ग्वाही त्यांनी दिली. याप्रसंगी समितीचे जिल्हा सदस्य सचिव तथा जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.स्वप्नील सांगळे ,जिल्हा आरोग्य अधिकारी ,जिल्हा समन्वयक( राज्य आरोग्य हमी सोसायटीचे)डॉ.सुमित जैन ,आयएमएचे डॉ. भरत बोरोले, समिती अशासकीय सदस्य मुकुंद गोसावी ,ज्येष्ठ नागरिक संघ प्रतिनिधी अरुण देवराम माळी तसेच अंमलबजावणी सहाय्य संस्थेचे विभागीय प्रमुख डॉ. सुनिल राजपूत, जिल्हा प्रमुख डॉ. अनुराधा वाडीले, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ कुणाल फेगडे, जिल्हा पर्यवेक्षक निलेश चौधरी, आरोग्यमित्र सुनील परखड, सागर राणे, दानिश शेख आदी उपस्थित होते.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### जळगाव पेसचे क्षितिज, अथर्व यांचा सत्कार

**जळगाव :** ऑलिंपियाडअंतर्गत घेण्यात येणाऱ्या एनएसर्सजेएसच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निकालामध्ये जळगाव येथील इयत्ता ९ वीतील गुणी विद्यार्थी क्षितीज वारके याने संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवत जळगाव शहराचे नाव उज्ज्वल केले आहे. विशेष म्हणजे संपूर्ण जळगाव शहरातून निवड झालेला हा एकमेव विद्यार्थी असून तो या संस्थेचा विद्यार्थी आहे. तसेच अथर्व चव्हाण (इयत्ता १२ वी) याने आणि मध्ये होण्याचा मान मिळवला आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचा गौरव करण्यासाठी विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्या सुषमा कंची, गुरुकुलच्या संचालिका सविता वाणी, दिलीप वाणी उपस्थित होते.



### गणित विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**जळगाव :** विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी गोडी निर्माण करणे तार्किक विचारशक्ती विकसित करणे आणि गणित हे दैनंदिन जीवनाशी निगडित आहे ही जाणीव निर्माण करणे हा या उपक्रमाच्या मुख्य उद्देश होता असे डॉ. विलास नारखेडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यालयाचे समन्वय प्रतिभा खडके, संतोष पाटील, विशाल पाटील, अजय कुवर यांनी परिश्रम घेतले या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील भीती कमी होऊन आत्मविश्वास वाढल्याचे दिसून आले कार्यक्रमाचे शेवटी गणित विषयाचे महत्त्व विशद करीत गणित म्हणजे फक्त आकड्यांचा खेळ नसून विचार करण्याची शिस्त हा संदेश डॉ.विलास नारखेडे व राजेश वाणी यांनी विद्यार्थ्यांना दिला.




### डॉ. आचार्य विद्यालयात आनंद सोहळा

**जळगाव :**विवेकानंद प्रतिष्ठान संचलित डॉ.अविनाश आचार्य विद्यालयात प्राथमिक विभागात इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा आनंद सोहळा साजरा करण्यात आला.या वेळी विवेकानंद प्रतिष्ठानच्या माजी अध्यक्षा शोभाताई पाटील, डॉ.अविनाश आचार्य विद्यालय शालेय समिती सदस्या रचना जोशी, व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. विजेता सिंग, शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. रत्नमाला पाटील, समन्वयक छोटू पाटील यांची उपस्थिती होती. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचे शाळेतील शेवटचे वर्ष असल्याने हा आनंद सोहळा साजरा करण्यात आला.संगीत शिक्षिका रंजना बाभूळके व विद्यार्थ्यांनी आज मोकळ्या आकाशी चालली घरट्यातील पाखरे हे सुमधुर गीत सादर केले. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी यावेळी कलाविष्कार सादर केला यात स्वरचित कविता, मिमिक्री, नृत्य, नाट्ययांचा समावेश होता. इयत्ता चौथीच्या पाच विद्यार्थ्यांनी शाळेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. विजेता सिंग यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले शालेय शिस्त ही महत्त्वाची असून या पुढेही ही शिस्त आपण पाळावी शाळेचे नाव मोठे करावे व देशाचे चांगले नागरिक बनावे असे आवाहन केले.कार्यक्रमाचे नियोजन सौ.कविता पाटील, वंदना सावदेकर, प्रमोद इसे, सुनील वाघ,. योगेश जोशी यांनी केले, सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे यावेळी सहकार्य लाभले.

### आदिवासी कोळी समाज वधू-वर परिचय सूचीचे प्रकाशन

**जळगाव :** जळगाव जिल्हा कोळी जमात विकास मंच माध्यमातून रणरागिनी ग्रुप आयोजित आदिवासी कोळी जमातीचा राज्यस्तरीय उपवर वधूवर परिचय मेळावा २०२६ च्या वधुवर सूचीचे प्रकाशन रविवारी (१५ मार्च) सकाळी दहा वाजता शहरातील तायडे गल्लीत शरद तायडे यांच्या कार्यालयासमोर करण्यात आले. याप्रसंगी वधुवर परिचय मेळाव्याचे मुख्य आयोजक नारायण कोळी,प्रचार व प्रसिध्दी प्रमुख प्रा.भाऊसाहेब सोनवणे यांनी मार्गदर्शन केले. नुकतीच लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून भारत सरकारच्या आर्मी डिपार्टमेंट मध्ये लेफ्टनंट जयेश संजय तायडे यांची निवड झाली. त्यानिमित्ताने त्यांचा समाजाच्या वतीने यावेळी यथोचित सत्कार करुन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला समाजातील मान्यवर शरद तायडे,नगरसेवक किशोर बाविस्कर, मुकेश सोनवणे,नामदेव सोनवणे,शेखर सोनवणे,अनिता सपकाळे,शोभा कोळी,ॲड.गणेश सोनवणे,छाया कोळी,लिलाधर सोनवणे,योगेश बाविस्कर व समाज बांधव उपस्थित होते.

# गुढीपाडव्यापासून श्रीराम मंदिरात रामनवमी महोत्सवास प्रारंभ

## २७ मार्चपर्यंत होणार विविध धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १५ मार्च**

कान्हदेशातील वारकरी संप्रदायाचे थोर सत्पुरुष व जळगांव नगरीचे ग्रामदैवत श्रीराम मंदिर संस्थान गादी परंपरेतील मुळसत्पुरुष श्री सद्गुरू आप्पा महाराजांनी प्रारंभ केलेला श्रीरामनवमी जन्मोत्सव परंपरेने प्रतीवर्षाप्रमाणे ह.भ.प. मंगेश महाराजांच्या नेतृत्वाखाली यंदाही कलियुग वर्ष:- ५१२८, चैत्र शुद्ध वर्ष प्रतिपदा शके १९४८ श्री शालिवाहन शके १९४८ पराभव नाम नूतन संवत्सर १९ मार्च गुरूवार गुढीपाडव्यापासुन श्रीराम जन्म महोत्सवास प्रारंभ होत असुन २६ मार्चला श्रीरामनवमी व २७ मार्च रोजी महोत्सवाची सांगता होईल.

ग्रामदैवत असलेल्या श्रीराम मंदिर संस्थान येथे हिंदू नववर्ष अर्थात १९ मार्च रोजी गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळी ४



वाजता काकड आरती, सकाळी ६.५४ नंतर पराभव संवत्सर (नुतनवर्ष) जलग्राम वासीयांच्या सुखशांतीसाठी ग्रामदैवत प्रभु श्रीरामांचे चैतन्यमयी मुर्तीस महापुजा अभिषेक, आरती होईल.

सकाळी ९ वाजता महाआरती होईल. नंतर श्रीराम मंदिर संस्थानच्या प्रांगणात गोमाता पुजन, वार्षिक उत्सवाचे ध्वजस्तंभपूजन विद्यमान गादीपती ह.भ.प. मंगेश महाराजांचे हस्ते होईल. दुपारी ११ वाजता नूतन पंचांग पूजन वाचन मुकुंद धर्माधिकारी गुरुजी, दुपारी १२ वाजता महानैवेद्य आरती होईल. १९ ते २६ मार्च रोजी विविध रामसेवा यात पहाटे ५ वाजता काकडा भजन काकड आरती,सकाळी पूजाभिषेक विष्णुसहस्त्रनाम तुलसी अर्चना, गोमाता पूजन, मंगल आरती, दासबोध पारायण :- मकरंद देशमुख, दुपारी १२ महानैवेद्य, दुपारी ४ ते ६ महिला मंडळ भजन सेवा, संध्याकाळी ६.१५ संध्यावंदन, श्रीरामरक्षा स्तोत्र पठण, धुपारती, वेदमंत्रपठण सेवा श्रीरामनामजप रात्री ८ वाजता नित्यनेमाचे परंपरेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज हरिपाठ, भजनसेवा. १९ मार्च रोजी श्री समर्थ भजनी महीला मंडळ (रामपेठ), पंचांग पूजन वाचन वे. मू. श्रीराम महाराज जोशी २० मार्च शुक्रवारी दिनी मोरया महीला मंडळ (मारुतीपेठ) २१ मार्च रोजी जय श्रीकृष्ण महिला मंडळ २२ मार्च रोजी राष्ट्र सेविका महीला मंडळ, २३ मार्च रोजी सुरेल सखी महिला भजनी मंडळ २४ मार्च रोजी गणेश भजनी गणेश वाडी, २४ मार्च रोजी ७ ते ९ या वेळात प्रभू श्रीरामजींच्या जन्माचे अभंग सोहळा होणार आहे. श्री संत नामदेव महाराज श्री संत एकनाथ महाराज श्री संत तुकाराम महाराज श्री संत सेना महाराज रचित श्रीराम जन्माचे अभंग दुष्यंत जोशी, मकरंद देशमुख, दिलीप चौधरी, संपदा छापेकर, राजेंद्र माने, सौ. स्वरा पाठक, सौ.पद्मजा नेवे, भागवत पाटील, नीलकंठ कासार, रेणुका जोशी, पुष्पा साकळीकर, श्रुती जोशी गायन सेवा यावेळी तबला साथ संगत सुयोग गुरव, संवादिनी दुष्यंत जोशी, पखवाज श्रीधर जोशी, व्हायोलिन स्वरा पाठक, बासरी, राजेश्वरी व ज्ञानेश्वरी श्रीकांत रत्नपारखी हे करतील. निवेदन सुचिता नेवे करतील.

### २६ रोजी रामनवमी उत्सव

चैत्र शुद्ध नवमी २६ मार्च रोजी रामनवमी या दिनी प्रात:समयी चैतन्यमय प्रभू श्रीरामचंद्रांची पंचामृत महापूजा अभिषेक, तुलसी अर्चना मंगल आरती, गोमाता पूजन सकाळी ठीक १०:०० ते १२:०० प्रभू श्रीरामजन्म सोहळ्याचे कीर्तन (गुलालाचे कीर्तन) ह.भ.प. श्रीराम महाराज मंगेश महाराज जळगावकर कीर्तन सेवा, नंतर श्रीराम जन्म सोहळा साजरा होईल. महाआरती संध्याकाळी हरिपाठ ,सामूहिक उपासना व परंपरेचे नित्यनेम जळगावातील समस्त ब्रह्मवृंद मंडळीचा शांतीपाठ, वेद मंत्रजागर व सामुहिक श्रीराम रक्षा स्तोत्र पठणसेवा होईल. रात्री ९ वाजता गीतरामायण सेवा'' संस्कार भारती'' चे साधक कलावंत सादर करतील. २७ मार्च सकाळी८ वाजता महादेवास रुद्राभिषेक, सकाळी १० ते १२ गोपाळकाल्याचे भजन होईल. या महोत्सव प्रसंगी भाविकांनी भजन, कीर्तन श्रवणाचा व ग्रामदैवत प्रभु श्रीरामांचे दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीराम मंदिर संस्थानचे विद्यमान गादीपती, वहिवाटदार व प्रमुख विश्वस्त ह.भ.प. मंगेश महाराज जोशी तसेच समस्त विश्वस्त मंडळींनी केले आहे.



## कोरोनाकाळातील कंत्राटी कामगारांना शासकीय रुग्णालयात काम द्या

### कोरोना योद्धा संघर्ष समितीचे पालकमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १५ मार्च**

कोरोनाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेमध्ये कंत्राटी तत्वावर शासकीय वैद्यकीय रूग्णालयात काम करणारे कामगार बेरोजगार झाले आहेत. त्यांना शासकीय वैदयकीय महाविदयालय व रुग्णालय येथील स्मार्ट कंपनीच्या कंत्राटामध्ये कामावर रुजू करावे अशा मागणीचे निवेदन कोरोना योध्दा संघर्ष समितीतर्फे पालकमंत्र्यांना देण्यात आले.

कोविड-१९ महामारीत पहिल्या-दुसऱ्या लाटेत शासकीय वैद्यकीय महाविदयालय व रुग्णालय जळगाव तसेच जळगाव शहर महापालिकेच्या कोविड केअर सेंटर,जिल्हा शासकीय महिला रुग्णालय मोहाडी,जळगाव येथे कंत्राटी पद्धतीने वर्ग-३ व वर्ग-४ च्या कंत्राटी कामगारांची नियुक्ती करण्यात आलेली होती.वास्तविक पाहता कोरोनाच्या पहिल्या-दुसऱ्या लाटेत सेवा बजाविलेल्या काही अनुभवी कोविड कंत्राटी कामगार यांना स्मार्ट कंपनीने पुन्हा सेवेत घेतले पाहिजे होते. परंतू जुन्या काही अनुभवी कंत्राटी कामगारांना डावलण्यात आलेले आहे. त्यांच्या व त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे. कोविड कंत्राटी कामगारांना स्मार्ट कंपनीच्या ठेक्यामध्ये रुजू करून घेण्यात यावे अशा मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी निलेश बोरा, बबन गोकूळ सावळे, भूषण पाटील, विलास तायडे,कुणाल विसपूते, कृष्णा सावळे, विनोद सपकाळे, रविंद्र कोळी, सागर चौधरी, रमेश वानखेडे, जयेश रविंद्र वसाने, सागर बाविस्कर, सुनिल परदेशी, शब्बीर खान, अजय सैंदाणे, शिला सपकाळे, एश्वर्या सपकाळे, प्रतिक्षा सोनवणे, सोना सुरवाडे, दिपाली भालेराव, ललीता पवार, जितेंद्र वाणी, मयूर मराठे, मयूर लोहार, सुमित पोलभूणे, गजेंद्र सोनार, प्रशांत सोनवणे, युवराज रखमे उपस्थित होते.

## महसूल सहाय्यकाच्या कुटुंबाला २.६४ लाखांची मदत

### विद्यार्थिनींना शालेय साहित्य वाटप

**जळगाव, १५ मार्च**

जळगाव जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय, येथे एक सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. तहसील कार्यालय एरंडोल येथे कार्यरत असलेले दिवंगत महसूल सहाय्यक कै. शिवाजी महाजन यांच्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर जिल्हाभरातील महसूल कर्मचारी बांधवांनी एकत्रितपणे मदत निधी जमा केला होता.या निधीतून २,६४,००० रूपये इतकी मदत जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते दिवंगत महाजन यांच्या कुटुंबीयांना प्रदान करण्यात आली.

जळगाव शहरातील कन्या छात्रालयातील एकूण ४२ विद्यार्थिनींना शालेय दप्तर, वह्या, कंपास साहित्य व इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम महसूल कर्मचारी संघटना, जिल्हा जळगाव यांच्या माध्यमातून राबविण्यात आला. तसेच जळगाव शहरातील दानशूर अधिकारी व कर्मचारी वर्ग यांच्या



सहकार्याने विद्यार्थिनींना शालेय साहित्य उपलब्ध करून देण्यात आले.

**यांची होती उपस्थिती**

या कार्यक्रमास महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष योगेश्वर नन्नवरे, उपाध्यक्ष किरण बाविस्कर, कार्याध्यक्ष अतुल सानप, खजिनदार घनश्याम सानप, सरचिटणीस दिपक चौधरी, प्रसिद्धी प्रमुख गणेश हटकर, कायदेविषयक सल्लागार नम्रता नेवे, जळगाव तालुका अध्यक्ष संजय अंभोरे, ॲड. दीपक सपकाळे, भारतीय स्टेट बँकेचे गजानन पाटील, कॅनरा बँकेचे चंद्रकांत सूर्यवंशी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रदीप बाविस्कर, रितेश छाजेड तसेच व्यावसायिक सदस्य राहुल नवगिरे, महेश सपकाळे, सुरेश महाले, महेश विसपुते, सुनिल निकम, चंद्रकांत खैरे, निलेश केदार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समन्वयाची जबाबदारी जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक अमोल जुमडे यांनी पार पडली.

## नेत्रज्योती हॉस्पिटलतर्फे आजपासून शिबिर

**जळगाव :** सिंधी नववर्ष व गुढीपाडव्यानिमित्त शहरातील नेत्रज्योतील हॉस्पीटलतर्फे सोमवार १६ ते ३१ एप्रिल पर्यंत दुपारी ३ ते सायंकाळी ७ यावेळेत मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

नेत्रज्योती हॉस्पीटलतर्फे आयोजित या शिबीरात नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. शिरीष पाटील, डॉ. हिरा जोशी, डॉ. तुषार बोंबटकर यांच्याकडून रूग्णांची तपासणी केली जाणार आहे. ज्या रूग्णांच्या डोळ्यात मोतिबींदू आहे अशा रूग्णांवर मोफत शस्त्रक्रिया देखील केली जाणार आहे.

या शिबीरामध्या ज्या रूग्णांकडे पिवळे किंवा केशरी रेशनकार्ड व उत्पन्नाचा दाखला असे त्या रूग्णांवर शस्त्रक्रिया करून फेको लेन्स टाकण्यात येणार आहे. मोतिबींदू शस्त्रक्रियेसाठी निवडलेल्या रूग्णांना पॅथॉलॉजी तपासणी देखील मोफत करण्यात येणार आहे. तसेच रूग्ण व त्याच्यासोबत येणाऱ्या नातेवाईकास राहण्याची व भोजनाची सुविधा देखील मोफत केली जाणार आहे. तरी सर्व समाजातील गरजू रूग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. गुरूमुख जगवाणी, उपाध्यक्ष दिलीपकुमार मंघवाणी, सचिव धनराज चावला व विश्वस्तांनी केले आहे. नेत्रज्योतील हॉस्पीटलतर्फे आत्तापर्यंत हजारो रूग्णांच्या डोळ्यांची तपासणी करून गरजू रूग्णांवर शस्त्रक्रिया देखील मोफत स्वरूपात करण्यात आल्या आहेत. त्यामुळे रूग्णांनी १६ ते ३१ एप्रिल या कालावधीत डोळ्यांची तपासणी करून घ्यावी असे आवाहन नेत्रज्योतील हॉस्पीटलतर्फे करण्यात आले आहे.

## बालनिकेतन विद्यामंदिर, हॅपी स्कूल इनरव्हील क्लबची संकल्पना

**जळगाव :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शाळेत निकोप वातावरण निर्माण करण्यासाठी इनरव्हील क्लब ऑफ जळगाव ईस्टतर्फे वर्षभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आल्याने कमल वाणी बालनिकेतन विद्यामंदिर व ललिता वाणी विद्यालयाचे यशस्वी रूपांतर हॅपी स्कूलमध्ये करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी विद्यार्थिनींच्या आरोग्यासाठी सॅनिटरी पॅड वेंडिंग आणि डिस्पोजल मशीन भेट देण्यात आले.

जुलै २०२५ पासून सुरू झालेल्या या प्रकल्पांतर्गत शाळेतील शौचालयांची संपूर्ण पुनर्बांधणी आणि रंगरंगोटी करण्यात आली आहे. शाळेत स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण असावे, या उद्देशाने क्लबने सर्व आवश्यक निकष पूर्ण



केले आहेत. विशेषतः किशोरवयीन विद्यार्थिनींच्या आरोग्याचा विचार करून शाळेत सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीनसह विल्हेवाटीसाठी इन्सनेरेटर (मशीन) बसवण्यात आले आहे. हा उपक्रम इनरव्हील क्लबच्या डिस्ट्रीक्ट चेअरमन रमा गर्ग आणि पीडीसी तथा डीपीसीसी संगीता घोडगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी बोलताना रमा गर्ग यांनी विद्यार्थिनींना वैयक्तिक स्वच्छता आणि आरोग्याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रोत्साहनपर उपस्थितीमुळे या उपक्रमाची व्याप्ती अधिक प्रभावी ठरली.

**सांस्कृतिक कार्यक्रमाने स्वागत**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला इयत्ता पहिलीच्या विद्यार्थिनींनी अतिशय सुंदर वेलकम गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते मशीनचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी इनरव्हील क्लबच्या प्रेसिडेंट संगीता घोडगावकर, सीमरन पाटील, रितू शर्मा, मुख्याध्यापक नीलेश नाईक, ज्योती बिऱ्हाडे आणि शिक्षक-वृंद उपस्थित होते.

## दुर्गांवरील जलसंस्कारांची परंपरा आजही मार्गदर्शक

### रोटरी क्लब जळगावतर्फे व्याख्यानात गोखले यांचे प्रतिपादन



**जळगाव,१५ मार्च :** छत्रपती शिवाजी महाराजांनी गड किल्ले दुर्गांवर केलेल्या जलसंस्कारांची परंपरा आजही मार्गदर्शक आहे असे किल्ले अभ्यासक देवदत्त गोखले यांनी प्रतिपादन केले.

गणपती नगरातील रोटरी हॉल मध्ये रोटरी क्लब जळगावच्या वतीने रोटरी कॅलेंडर प्रमाणे वॉटर सॅनिटेशन अँड हायजिन महिना व जागतिक जल दिनाच्या निमित्ताने दुर्गांचे जलसंस्कार या विषयावर देवदत्त गोखले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष गिरीश कुळकर्णी व मानद सचिव सुभाष अमळनेरकर उपस्थित होते.

गोखले यांनी व्याख्यानात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील दुर्गांवरील जलव्यवस्थापन हे केवळ पाण्याचे नियोजन नसून येणाऱ्या पिढ्यांसाठी जलसंस्कार असल्याचे सांगितले.

आज्ञापत्रातील पाण्याचा उदक पाहुनी किल्ला बांधावा, किल्ल्यावर पाणी बहुत जतन राखावे हा उल्लेख सांगत त्यांनी दुर्गबांधणी तील जलदृष्टी स्पष्ट केली. प्रतापगड,अजिंक्यतारा, रायगड, शिवनेरी, सिंहगड यांसारख्या किल्ल्यांवरील विविध जलरचना त्यांनी उदाहरणांसह व छायाचित्रांसह मांडल्या.

रायगडावर १२ तलावांची परस्पर जोडणी, सिंहगडावरील देवटाक्याचा नैसर्गिक जलस्रोत, अजिंक्यताऱ्यावर अतिरिक्त पाण्याचे दुसऱ्या तलावात नियोजन, तसेच अजिंठा किल्ल्यावर सायफन तंत्राचा वापर ही त्या काळातील अद्वितीय अभियांत्रिकीची उदाहरणे असल्याचे त्यांनी सांगितले.

किल्ल्यांवरील टाक्या, तलाव, विहिरी, खंदक आणि नैसर्गिक जलस्रोत यांचा वापर करून पाणी अडवा-पाणी जिरवा ही संकल्पना त्या काळात प्रभावीपणे राबवली गेल्याचे त्यांनी नमूद केले.

अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी, किल्ल्यांवरील पाण्याचे नियोजन, व्यवस्थापन, त्यामागील तंत्र याद्वारे उपस्थितांनी इतिहास, विज्ञान व पर्यावरणाचा सुंदर संगम अनुभवला.

पंकज जयस्वाल यांनी परिचय तर जयवर्धन नेवे यांनी आभार मानले. कार्यक्रमास कंवरलाल संघवी, अशोक जोशी, सुरेंद्र लुंकड, पूनम मानुधने, किशोर मंडोरा, कॅप्टन मोहन कुलकर्णी, मनोज जोशी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काथार सखी ग्रुपतर्फे आगळावेगळा महिला दिन

### रांगोळी कला, कर्तबगार महिलांची वेशभूषा स्पर्धेने रंगत

**जळगाव :** मोनाली कामळस्कर फाउंडेशन संचलित काथार सखी मंच व काथारसखी ग्रुप तर्फे विविध कार्यक्रम घेत जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

आर आर विद्यालयातील शिक्षिका सारिका वाणी, कासोदा येथील संगीता वाणी, उषा कामळसकर, अंजली वाणी व सुनीता वाणी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यात पिंप्राळा श्रद्धा वाणी हिने उपस्थित महिलांना सर्वप्रथम संस्कार भारती रांगोळीचे प्रशिक्षण दिले, रांगोळी कशी काढायची, कलर कसे भरायचे तसेच उपलब्ध जागेनुसार रांगोळीचा आकार कसा कमी जास्त करायचा हे सोप्या पद्धतीने शिकवले. शुभांगी वाणी कोमल वाणी व जयश्री वाणी



यांनी सुमधुर आवाजाने उपस्थित स्त्रियांसाठी प्रोत्साहन पर गीत गाऊन कार्यक्रमाची रंगत वाढवली.

कर्तबगार महिलांची वेशभूषा करुन त्यांची सुप्रसिध्द वाक्य म्हणून वेशभूषा स्पर्धा स्मरणीय ठरली. या स्पर्धेचे परीक्षक जयश्री श्रीपाद वाणी यांनी केले. यात पाळधी येथील महिला भगिनी निशा राहुल वाणी व हर्षा विनोद वाणी यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.महिला दिनाचे औचित्य साधून समाजातील दहा कष्टकरी महिलांना साडी, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले..

यात ७५ वर्षाच्या २ वयोवृद्ध पुष्पाबाई भिका वाणी आणि चंद्रकला सोनू वाणी यांचा लुगडं चोळी देऊन विशेष रंजना वाणी व सौ. वैशाली वाणी व हर्षा वाणी यांच्या मार्गदर्शनात वन मिनिट गेम व सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आली. यात वन मिनिट स्पर्धेत हर्षदा लक्ष्मीकांत वाणी यांनी प्रथम क्रमांक मिळविला. सामान्य ज्ञान स्पर्धेत शिरसोली येथील माधुरी संदीप वाणी यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. सूत्रसंचालन वर्षा अजय कामळस्कर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिपाली वाणी ,सीमा वाणी, गुंजन वाणी, अपर्णा वाणी, संध्या वाणी, शकुंतला वाणी, हर्षदा वाणी महेश्वरी वाणी व भावना वाणी यांनी परिश्रम घेतले.

## रोटरी जळगाव सेंट्रलतर्फे आकाशच्या भरारीचा यशोत्सव

### आयएएस परीक्षेत ७३ व्या क्रमांकाने उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १५ मार्च**

येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रलतर्फे आकाश त्रिवेदी हा आयएएस परीक्षेत देश पातळीवर ७३ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल यशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

गणपती नगरातील रोटरी हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमास अध्यक्ष जितेंद्र बरडे, मानद सचिव ॲड. केतन ढाके, आकाशचे वडील ॲड. ओम त्रिवेदी, आई रेखा त्रिवेदी व भाऊ अभय यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वप्नांची आकाश भरारी या कार्यक्रमात आकाश त्रिवेदी याने त्याचा प्रवास व यशोगाथा त्याच्या शब्दात व्यक्त केली. त्यात आयआयटी कानपूर येथून कॉम्प्युटर सायन्स शाखेतून बी टेक पूर्ण केले.

आयआयएम अहमदाबाद येथे शिक्षण घेत असताना युपीएससी - सीएसई ही परीक्षा देऊन वयाच्या २३ व्या वर्षी देश पातळीवर ७३ व्या क्रमांकाचे यश संपादन केल्याचे सांगितले. आकाशने उद्देश आधारित करिअर करण्याच्या



दृष्टीने प्रशासकीय सेवेत वरिष्ठ पदावर जाऊन मूलभूत विकासाचे निर्णय घ्यायची इच्छा आहे असे सांगितले. भविष्यात असे काही निर्णय ही माझ्या कार्यशैलीची ओळख व्हावी असे वाटते. काहीतरी अर्थपूर्ण असे काम करावे. जिथे मी समाजात योगदान देऊ शकेल समाजाला काहीतरी परत देणे ही माझी जबाबदारी आहे, असेही आकाश याने मत व्यक्त केले.

आकाशचे वडील ॲड. ओम त्रिवेदी यांनी एरंडोल- जळगाव असे अपडाऊन करीत लहानपणापासून आकाशने शिक्षणाची सुरुवात केली असे सांगितले. काशिनाथ पलोड सीबीएससी शाळेतच त्याला संस्कारांचे बाळकडू मिळाले. जंकफूड व व्यसनांपासून तो दूर असून स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा त्याच्यावर प्रभाव आहे. पहाटे उठण्याची सवय व विपश्यना हे त्याचे आवडीचे विषय आहेत. आईकडून योग व ध्यान याचा त्याला वारसा लाभला आहे असेही ते म्हणाले.परिचय दीपक नाथानी यांनी तर आभार डॉ. मिलिंद पाटील यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास रोटरी जळगाव सेंट्रलच्या सदस्यांची कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : १६/०३/२०२६ **वार** : सोमवार **शके** : १९४७
**अयन** : उत्तर **ऋतू** : वसंत **मास** : फाल्गुन **पक्ष** : कृष्ण **महिना** : मार्च
**संवत** : २०८२ **अयनांश** : २४-१३-२६ **तिथी** : दशमी **नक्षत्र** : पूर्वाषाढा
**योग** : शिव **करण** : तैतिल **सूर्योदय** : ६.४७ **सूर्यास्त** : १८-४७
**चंद्रराशी प्रवेश** : मकर **शुभाशुभ** : १० पावेतो शुभ

**दैनिक राशीभविष्य**

**मेष** : नशिबाची ओळख आपणास होणार आहे.
**वृषभ** : नवीन वस्तुची खरेदी कराल.
**मिथून** : शत्रुची नजर आपले कार्यावर आहे.
**कर्क** : विवाह प्रसंगात मानाचे स्थान मिळवाल.
**सिंह** : व्यापारी वर्गास लाभदायक दिवस असेलध
**कन्या** : विद्यार्थी वर्गास अतिउत्तम दिवस.
**तुला** : आजचा दिवस सुखकारक असणार.
**वृश्चिक** : कर्तव्यात वाढ होणार आहे.
**धनू** : आर्थिक समस्या दूर होणार आहे.
**मकर** : विद्यार्थी वर्गास प्रगतीकारक दिवस असेल.
**कुंभ** : आज दिवस विचारात जाईल.
**मीन** : नवीन माणसांची ओळखी होतील.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु.पो. रावेर, जि. जळगाव, मोबा. ९८५००१५५५८**

# भुसावळला स्वतंत्र जिल्हा अन् वरणगाव तालुकानिर्मिती करा

## लोकसंघर्ष समितीतर्फे मागणी; लोकचळवळ उभारण्याचे नागरिकांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १५ मार्च**

जिल्ह्याच्या पूर्व भागातील सर्वांगीण विकासासाठी भुसावळला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा द्यावा, तसेच वरणगावला स्वतंत्र तालुका घोषित करावे, अशी मागणी भुसावळ जिल्हा व वरणगाव तालुकानिर्मिती लोकसंघर्ष समितीतर्फे करण्यात आली आहे. या मागणीसाठी नागरिकांनी एकत्र येऊन लोकचळवळ उभारण्याचे आवाहन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

भुसावळ हे जळगावनंतर जिल्ह्यातील सर्वांत मोठे व मध्यवर्ती शहर असून, यावल, रावेर, मुक्ताईनगर, बोदवड, जामनेर या सहा तालुक्यांच्या दृष्टीने ते संपर्काचे प्रमुख केंद्र आहे. मुंबईनंतर मध्य रेल्वेमार्गावरील सर्वांत मोठे जंक्शन स्थानक म्हणून भुसावळची ओळख आहे. राष्ट्रीय महामार्गाशी जोडणी, गतिमान वाहतूक व्यवस्था आणि विकसित आरोग्य सुविधा यांमुळे भुसावळ शहराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

भुसावळ व वरणगाव येथे आयुधनिर्माणी प्रकल्प तसेच भुसावळ औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्प कार्यरत आहेत. तसेच वरणगाव येथे शासनाने पोलीस प्रशिक्षण केंद्र मंजूर केले असून, मोठ्या प्रमाणावर जागा उपलब्ध आहे. वाघूर व हतनूर (मुक्ताई सागर) ही दोन मोठी धरणे भुसावळच्या परिसरात असल्यामुळे पर्यटन विकासालाही मोठी संधी निर्माण होऊ शकते.

सध्या यावल, रावेर, मुक्ताईनगर, बोदवड व जामनेर या तालुक्यांतील नागरिकांना प्रशासकीय कामांसाठी जळगाव येथे जावे लागते. मात्र, हे अंतर




मोठे असल्याने सर्वसामान्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. भुसावळ जिल्हा झाल्यास या सर्व तालुक्यांसाठी भुसावळ हे कमी अंतराचे व सोयीस्कर प्रशासकीय केंद्र ठरेल, असे समितीचे मत आहे.

भुसावळ येथे जिल्हा न्यायालय आधीच कार्यरत असून, खडका व किन्ही परिसरातील मोठी एमआयडीसी आहे. जिल्हानिर्मितीनंतर उद्योगधंद्यांना अधिक गती मिळून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. जागतिक कीर्तीच्या अजिंठा लेणी भुसावळपासून सुमारे ५८ किलोमीटरवर असल्याने पर्यटन क्षेत्रालाही मोठी चालना मिळेल.

दरम्यान, भुसावळ जिल्हा निर्माण झाल्यानंतर वरणगावला स्वतंत्र तालुका करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. भुसावळ तालुक्यातील रस्ते व रेल्वेमार्गावरील मोठे शहर असलेल्या वरणगावशी सुमारे ३० ते ३५ गावांचा दैनंदिन संपर्क आहे. आयुधनिर्माणी, प्रस्तावित पोलीस प्रशिक्षण केंद्र आणि संत मुक्ताई सागर ही महत्त्वाची केंद्रे वरणगावच्या परिसरात असल्याने ग्रामीण भागाच्या विकासासाठी वरणगाव तालुकानिर्मिती गरजेची असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

**लोकसंघर्ष समितीतर्फे मागण्यांसाठी आंदोलनाची तयारी**

या मागण्यांसाठी शासनाकडे निवेदने देणे, जनजागृती करणे तसेच आवश्यक असल्यास आंदोलन उभारण्याची तयारीही समितीतर्फे करण्यात आली आहे. या मागणीला लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनील काळे, प्रा. डॉ. जतीन मेढे, माजी सभापती राजेंद्र पुंडलिक चौधरी, शहराध्यक्ष सुनील प्रभाकर माळी, उपनगराध्यक्ष शेख अखलाक शेख युसूफ यांच्यासह भुसावळ जिल्हा व वरणगाव तालुकानिर्मिती लोकसंघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांचा पाठिंबा आहे.

# प्रतिबंधित असताना अवजड वाहनांमुळे विचवा-सुसरीदरम्यान रस्त्याची चाळण!

## ग्रामसडक विभागाचे दुर्लक्ष; ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १५ मार्च**

तालुक्यातील विचवा- सुसरी रस्त्यावर अवजड वाहनांना प्रवेशबंदीचा फलक लावलेला असतानाही मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरूच आहे. त्यामुळे रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून, ग्रामस्थांसह वाहनधारकांमध्ये रोष व्यक्त केला जात आहे. रात्री-बेरात्री तसेच दिवसा भरधाव अवजड वाहने या मार्गावरून धावत असल्याने ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

सुरवाडा, शिंदी परिसरातील ग्रामीण जनतेसाठी वरणगावकडे जाणारा महत्त्वाचा विचवा-सुसरीदरम्यान संपर्क मार्ग आहे. वरणगाव येथे बाजारपेठ असल्याने परिसरातील अनेक गावांचा व्यापार, शेतीमालाची वाहतूक तसेच गुरेढोरे व्यापार यासाठी या मार्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. मात्र, परिसरात राखेचे उद्योग सुरू असल्यामुळे विचवा, शिंदी व कुऱ्हामार्गे अवजड वाहनांद्वारे राखेची मोठ्या प्रमाणावर वाहतूक केली जात आहे. प्रत्यक्षात या रस्त्यावरून अवजड वाहनांना बंदी असून, त्याबाबतचा फलकही विचवा गावाजवळ लावण्यात आला आहे. तरीही




वाहनचालकांकडून नियमांचे उल्लंघन केले जात असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.

ग्रामसडक विभागाने सहकार्याची अपेक्षा केल्याने ग्रामस्थ अनेकदा वाहनचालकांना समज देतात. मात्र, विभागाकडून पुढील कोणतीही कारवाई होत नसल्याने वाहनधारक जुमानत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. रात्री-बेरात्री तसेच दिवसा भरधाव अवजड वाहने या मार्गावरून धावत असल्याने ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

ग्रामस्थांनी सांगितले की, अनेक वर्षांनंतर हा रस्ता दुरुस्त करून तयार करण्यात आला होता. यामुळे ग्रामीण भागातील जनतेला दिलासा मिळाला होता. मात्र, अवजड वाहनांच्या बंदीची अंमलबजावणी होत नसल्यास नुकताच तयार झालेला रस्ता पुन्हा खराब होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या वेळी शिंदी येथील प्रगतिशील शेतकरी विजय भागवत ढाके, माजी सरपंच नवलसिंग राजपूत यांनीही अधिकृत फलक असतानाही या मार्गावर अवजड वाहतूक कशी सुरू आहे, असा सवाल उपस्थित करीत तातडीने प्रतिबंध घालण्याची मागणी केली.

दरम्यान, प्रधानमंत्री- मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत हा रस्ता तयार करण्यात आल्याचे फलकावरून दिसून येत असल्याने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या नीलिमा गिरीश नेमाडे (शिंदी), हटकर समाज महासंघाच्या जिल्हाध्यक्षा स्वाती पाटील (विचवा) यांनी केली आहे.

# हिंदू-मुस्लिम ऐक्याची झळकणारी छटा!

## वरणगावात वरात अन् नमाजाने दिला प्रेरणादायी संदेश

**भुसावळ** : वरणगाव (ता. भुसावळ) शहरातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचे एक मनमोहक उदाहरण उभे राहिले. गावातील विवाह सोहळ्याच्या वरातीदरम्यान मुस्लिम समाजाच्या नमाज वेळेचा आदर करत हिंदू बांधवांनी पूर्ण सहकार्य केले आणि या छोट्या; परंतु अर्थपूर्ण घटनेने गावात एकतेचा संदेश दिला.

शनिवारी (१४ मार्च) दुपारी विवाह सोहळ्याची वरात गावातून निघाली आणि नगरपरिषदेजवळील मशिदीजवळ पोहोचल्यावर डीजे जोरात वाजत होता. त्याच वेळी मुस्लिम समाजाच्या नमाजची वेळ आली होती. सध्या पवित्र रमजान महिना असल्यामुळे मुस्लिम बांधवांनी वरातीतल्या लोकांना नम्रतेने सांगितले की, १५ ते २० मिनिटांसाठी डीजे बंद करून त्यांना शांततेत नमाज अदा करण्याची सोय द्यावी. या विनंतीला वरातीत सहभागी हिंदू बांधवांनी तत्काळ प्रतिसाद दिला. डीजे बंद झाला, मुस्लिम बांधवांनी नमाज पूर्ण केली आणि त्यानंतर वरात पुन्हा आनंदात पुढे निघाली.

या घटनेमुळे वरणगावात धर्मनिरपेक्षता, सामाजिक ऐक्य आणि परस्पर सन्मानाचा संदेश देण्यात आला आहे. स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या घटनेचे विशेष कौतुक केले. ग्रामस्थ म्हणतात, ''अशा छोट्याशा सहकार्याचे क्षणच समाजात एकतेची खरी ताकद दाखवतात. वरणगाव हे फक्त शहर नाही, तर सामाजिक सुसंवादाचे प्रतीक बनले आहे.''

विशेष म्हणजे ही घटना फक्त एका धार्मिक समारंभापुरती मर्यादित राहिली नाही. त्याने सर्वसामान्यांमध्ये परस्पर आदर, सहिष्णुता आणि सहकार्याची भावना दृढ करण्याचे काम केले आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, अशा उदाहरणांमुळे भविष्यात सामाजिक ऐक्य अधिक मजबूत होईल आणि धार्मिक सौहार्दाची संस्कृती पसरत राहील. वरणगावच्या या घटनेतून स्पष्ट झाले आहे की, थोडेसे सहकार्य आणि आदर मोठे सामाजिक बदल घडवून आणू शकतो.

## थोडक्यात महत्त्वाचे.....




### पाल येथे पदविका प्रदान सोहळा उत्साहात

**पाल (ता. रावेर)** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (नाशिक) व मुक्त कृषी शिक्षण केंद्र (पाल) यांच्यातर्फे येथे पदविका प्रदान सोहळा उत्साहात झाला. सातपुडा विकास मडंळाचे अध्यक्ष अशोक झांबरे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून दादासाहेब चौधरी वनप्रशिक्षण संस्थेचे संचालक हेमंत शेवाळे यांच्यासह विविध विद्यापीठांतील कुलगुरू, कार्यकारी परिषदेचे सदस्य, अधिष्ठाता, शास्त्रज्ञ उपस्थित होते. सर्वप्रथम कृषी पत्रकारिता पदवीचे, त्यानंतर पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना पदके प्रदान करण्यात आली. उद्यानविद्या विभागात सिमरन नादर तडवी प्रथम, प्रमोद कृष्णल द्वितीय, पूजा शांताराम कोळी तृतीय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन विभागात लक्ष्मण पांडुरंग पाटील प्रथम, सांरभ गोपाळ पाटील द्वितीय, कृषी पत्रकारिता विभागात विशाल विक्रम बारेला प्रथम रोहित सीताराम पवार द्वितीय आला. विद्यार्थ्यांनाही विशेष प्रावीण्य पदविका प्रदान करण्यात आली. या वेळी कृषी विज्ञान केंद्रशचे प्रमुख शास्त्रज्ञ महेश महाजन, दादासाहेब चौधरी वनप्रशिक्षण संस्थेचे संचालक हेमंत शेवाळे, सातपुडा विकास मडंळाचे अध्यक्ष अशोक झांबरे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. धीरज नेहते यांनी प्रास्ताविक केले. शरद वाणी यांनी सूत्रसंचालन केले. अतुल पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी कुंदन चौधरी व अकबर तडवी यांनी सहकार्य केले.



### एचव्हीपी लसीकरण जनजागृतीची राष्ट्रवादीची मागणी

**यावल** : एचपीव्ही लसीकरण मोहिमेबाबत जनजागृती व मार्गदर्शक प्रणाली प्रसारित करून योग्य संदेश द्यावा, अशा मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातर्फे येथील तहसीलदार मोहनमाला नाझीरकर यांना देण्यात आले आहे. निवेदनात २०२२ वर्षाच्या आकडेवारीनुसार भारतात पेपिलोमा वायरसने सुमारे ३४ हजार ८०५ महिलांचा मृत्यू झाला असून, हा एकप्रकारचा विषाणू आहे. याच्या संसर्गामुळे महिलांमध्ये गर्भाशय मुखाचा कर्करोग होण्याचा धोका वाढतो. सध्या सोशल मीडियावर याबाबत चुकीची माहिती प्रसारित होत असून, या लसीमुळे वंध्यत्व, गर्भपात किंवा जन्मदोष होऊ शकतो, असे गैरसमज सोशल मीडियावर प्रसारित होत आहे. याबाबत मुलीच्या भवितव्याचा प्रश्न असल्याने एचपीव्ही लसीकरण मोहिमेबाबत जनजागृती व मार्गदर्शक प्रणाली प्रसारित करावी, असे निवेदनात म्हटले आहे. निवेदन देतेवील पालिकेच्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या गटनेत्या वर्षा चोपडे, युवक तालुकाध्यक्ष आकाश चोपडे, युवक जिल्हा उपाध्यक्ष जुगल पाटील, शहराध्यक्ष योगेश पाटील, प्रेम देवरे, गोलू महाजन, किरण महाजन, रोहित महाजन, जुनेद खान, अल्तमस शेख आदी उपस्थित होते.

### उटखेडा येथे हाणामारीत आठ जण जखमी

**रावेर** : दोन गटात किरकोळ कारणावरून झालेल्या हाणामारीत आठ जण जखमी झाल्याची घटना तालुक्यातील उटखेडा येथे घडली. या प्रकरणी परस्पर विरोधी फिर्यादीवरून ३१ जणांविरुद्ध रावेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे . याबाबतचे वृत्त असे की काल शनिवारी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास उटखेडा येथे दोन गटात किरकोळ कारणावरून तुफान हाणामारी झाली. यात लाठ्या, काठ्या,दगड,विळा याचा वापर करण्यात आला. या हाणामारीत मयुरी तायडे,राहुल अशोक तायडे, संतोष तायडे,अविनाश झाल्टे,राहुल अरुण तायडे,अरुण तायडे,किशोर तायडे, लाडकाबाई सोनवणे हे आठ जण जखमी झाले.याप्रकरणी एका गटाकडून मयुरी तायडे यांनी रावेर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून किशोर तायडे यांचे सह १२ जणांविरुद्ध तर दुसऱ्या गटातील राहुल अरुण तायडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रोहित संतोष तायडे यांचे सह १९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी दोन्ही गटातील एकूण ३१ जणांविरुद्ध रावेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हेड कॉन्स्टेबल सिकंदर तडवी करीत आहेत .

### गावठी पिस्तूलसह एकास अटक

**भुसावळ** : बाजार पेठ पोलिस स्टेशनच्या पथकाने संजय गोपाल चंदेले



(वय-५०, रा.ऑर्डनन्स फॅक्टरी, वरणगाव) यांच्यावर कारवाई करुन त्याच्याकडून २७ हजार रुपये किमतीची एक गावठी पिस्तुलसह दोन राऊंड जप्त केले. त्याला पुढील कारवाईसाठी वरणगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. प्रेमचंद सपकाळे, सलीम तडवी, उमाकांत पाटील, श्रीकृष्ण देशमुख, रविंद्र चौधरी, छगन तायडे, रतन गिते आदींच्या पथकाने ही कारवाई केली. शस्त्रसंबंधी माहिती किंवा संशयास्पद हालचाली असल्यास, त्वरित पोलीसांना कळवावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### उन्हाळी सुट्यांसाठी मध्य रेल्वेकडून विशेष रेल्वे

**भुसावळ** : उन्हाळी सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वे प्रशासनाकडून उन्हाळी विशेष गाड्या चालवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.



यात बडनेरा- नाशिक रोड दरम्यानच्या गाड्यांचाही समावेश आहे. परंतु, खंडवा, बऱ्हाणपूर, रावेर, निंभोरा, सावदा प्रवाशांसाठी अजून कोणत्याही विशेष रेल्वे गाड्या सुरू झालेल्या नाहीत, त्यामुळे तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. काही दिवसापूर्वी खंडवा-भुसावळ विशेष रेल्वे चार दिवसांसाठी चालवण्यात आली. ती सुद्धा बंद करण्यात आल्याचे प्रशांत बोरकर यांनी सांगितले.



# कुऱ्हे येथे ६७३ लाभार्थ्यांना योजनांचा लाभ वाटप

## महाराजस्व अभियानांतर्गत शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १५ मार्च**

छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान टप्पा क्रमांक १अंतर्गत दुसरे शिबिर भुसावळ तालुक्यातील कुऱ्हे महसूल मंडळात रेणुकामाता मंदिर परिसरात घेण्यात आले. शिबिरात विविध शासकीय सेवांचा ६७३ नागरिकांना लाभ देण्यात आला.

अपर जिल्हाधिकारी डॉ. श्रीमंत हारकर अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच दुर्गाताई शिंदे उपस्थित होत्या. या वेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. हारकर यांनी महिलांना गर्भाशयाच्या कर्करोगापासून बचावासाठी लसीकरण करून घेण्याचे आवाहन केले. तसेच पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी जनावरांमध्ये आढळणाऱ्या माउथ फूट रोगापासून बचावासाठी लसीकरणाचे महत्त्व सांगितले.

तहसीलदार नीता लबडे यांनी प्रास्ताविकात, अभियानांतर्गत कुऱ्हे मंडळातील १० पाणंद रस्ते मोकळे करण्यात आल्याची माहिती दिली. शिबिरात कृषी, पशुसंवर्धन, नोंदणी व मुद्रांक, तसेच पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी विविध शासकीय योजना व कायद्यांमधील नवीन बदलांबाबत नागरिकांना मार्गदर्शन केले.

शिबिरामध्ये नागरिकांना विविध शासकीय सेवांचा लाभ देण्यात आला. त्यात विशेष सहाय्य योजना- ७६, लक्ष्मी मुक्ती योजना- २७, ई-शिधापत्रिका- ४७, शालेय विद्यार्थ्यांना दाखले- २३९, उत्पन्न-जात-अधिवास प्रमाणपत्रे- १०४७, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्रे २५, जिवंत ७/१२- ८२, अचूक ७/१२- ९५, प्रलंबित फेरफार निर्गती- १३८, वर्ग २ चे वर्ग १ रूपांतरण- १८, तुकडा शेरा कमी- ८३ व खाते एकत्रीकरण- १७ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

नायब तहसीलदार प्रीती लुटे यांनी सूत्रसंचालन केले. नायब तहसीलदार पूजा अवघडे यांनी आभार मानले. शिबिराला नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, महसूल कर्मचारी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिबिरात ६७३ लाभार्थी नागरिकांनी सहभाग घेतला.

# पाणीप्रश्नी नगराध्यक्षा, मुख्याधिकाऱ्यांकडून लोहाऱ्यातील जॅकवेलची भेटीद्वारे पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर (ता. यावल), १५ मार्च**

शहरातील नागरिकांना उन्हाळ्याच्या काळात कोणत्याही प्रकारची पाणीटंचाई भासू नये तसेच शहराला स्वच्छ, सुरक्षित आणि मुबलक पाणीपुरवठा सातत्याने मिळत राहावा यासाठी नगरपरिषद प्रशासनाकडून विशेष लक्ष दिले जात आहे. या पार्श्वभूमीवर लोहारा येथे असलेल्या जॅकवेलची सविस्तर पाहणी व तपासणी करण्यात आली.

नगराध्यक्ष दामिनी पवन सराफ व मुख्याधिकारी अविनाश गांगोडे, नगरसेवक पवन सराफ यांनी प्रत्यक्ष भेट देऊन जॅकवेलची संपूर्ण व्यवस्था तपासली. लोहरा जॅकवेल ला २ पंप मोटारी आहे त्यातील एक मोटार अहमदाबाद येथे सर्व्हिसिंगला पाठवलेली आहे त्यामुळे पाणी थोडे उशिरा येत आहे. पाणी उचलण्यासाठी वापरण्यात येणारी पंप यंत्रणा, विद्युत व्यवस्था, पाण्याची उपलब्धता, तसेच फैजपूर शहरापर्यंत पाणी



पोहोचविणाऱ्या संपूर्ण पाणीपुरवठा यंत्रणेची सखोल पाहणी करण्यात आली. उन्हाळ्याच्या काळात पाण्याची पातळी कमी होणे, तांत्रिक अडचणी निर्माण होणे किंवा पाणीपुरवठ्यात अडथळा येणे अशा कोणत्याही समस्या यापुढे उद्भवू नयेत यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

फैजपूर शहराला स्वच्छ आणि सुरक्षित पाणी मिळणे ही नगरपरिषदेची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे पाण्याची गुणवत्ता उत्तम राहावी, पाणी शुद्धीकरण प्रक्रिया योग्य प्रकारे व्हावी आणि शहरातील प्रत्येक भागात पुरेशा प्रमाणात पाणी पोहोचावे यासाठी प्रशासनाकडून विशेष दक्षता घेतली जात आहे. यावेळी नागरिकांनी पाण्याचा जपून व जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन नगरप्रशासनाने केले आहे.

# भुसावळमध्ये भित्तिपत्रकांच्या प्रदर्शनातून व्यसनमुक्तीचा संदेश!

## रोटरी क्लबतर्फे प्रा. डॉ. विद्या पाटील यांच्यासह महिला सदस्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १५ मार्च**

रोटरी क्लब ऑफ भुसावळतर्फे महिला दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात नशाबंदी मंडळाच्या व्यसनमुक्ती जनजागृतीसंदर्भातील भित्तिपत्रकाचे प्रदर्शन भरविण्यात आले. याप्रसंगी प्रा. डॉ. विद्या पाटील यांचा स्मृतिचिन्ह देऊन, तसेच क्लबमधील महिला सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

रोटरी क्लबचे अध्यक्ष संजय चापोरकर अध्यक्षस्थानी होते. क्लबचे सचिव रत्नाकर क्षीरसागर, प्रेसिडेंट एन्क्लेव चेअरपर्सन गजानन ठाकूर, डॉ. एन. एस. आर्वीकर, अशोक निकम, गोपीनाथ अय्यर, गोपाल तिवारी, डॉ. दयाघन राणे, गजानन सेवलकर, मदन बोरकर, अनंत पाटील यांची उपस्थिती होती. सचिव रत्नाकर क्षीरसागर यांनी महिलांनी विकास आणि सामाजिक क्षेत्रात संधी मिळण्यासाठी केलेल्या




संघर्षाच्या इतिहासाला उजाळा दिला.

प्रा. डॉ. विद्या पाटील यांनी त्यांच्या संपर्कात आलेल्या काही महिलांच्या जीवनातील प्रसंग विशद करीत असताना महिलांनी मनावर घेतल्यास त्या कठीण परिस्थितीतही यशस्वी होऊ शकतात, याची उदाहरणे देऊन आव्हाने पेलणाऱ्या महिला सक्षम समाजाची निर्मिती करू शकतात, असे स्पष्ट केले.

संजय चापोरकर यांनी महिलांच्या सामाजिक विकासातील योगदानाचे महत्त्व स्पष्ट करून महिलांनी मनावर घेतल्यास त्या अत्यंत सक्षमपणे कुटुंबाचा विकास करू शकतात, असे मत व्यक्त केले. आजच्या सामाजिक परिस्थितीत व्यसनांना आळा घालण्याची क्षमताही महिलांमध्ये आहे, असेही त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी क्लबच्या डॉ. माया आर्विकर, आरती चौधरी, चारू महाजन यांच्यासह लता अय्यर, कुमुदिनी राणे, संजीवनी क्षीरसागर, सरला बोरकर, पद्मा तिवारी, विजया निकम यांचा भेटवस्तू आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान महिला आणि इतरही उपस्थितांमध्ये व्यसनमुक्ती जनजागृतीसाठी व्यसनमुक्ती भित्तिपत्रकाचे प्रदर्शन खुले करण्यात आले. आरती चौधरी यांनी सूत्रसंचालन केले. रत्नाकर क्षीरसागर यांनी आभार मानले.

# गॅसचा काळाबाजार, साठवणूक केल्यास कडक कारवाई

## बैठकीत भुसावळ पोलिसांचा वितरकांना इशारा

**भुसावळ, १५ मार्च**

शहरात गॅसचा पुरवठा सुरळीत राहावा, सामान्य नागरिकांची फसवणूक किंवा लूट होऊ नये, यासाठी भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशनच्यावतीने शहरातील सर्व गॅस वितरकांची बैठक घेण्यात आली. बैठकीत, गॅसचा काळाबाजार, साठवणुक आणि नियमबाह्य वितरण करतांना आढळल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असा वितरकांना इशारा देण्यात आला.

बाजारपेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल वाघ यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. बैठकीत पो.नि.राहुल वाघ यांनी, केंद्र व राज्य शासनाने गॅस वितरणासाठी घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक असल्याचेही वितरकांना सांगितले. भुसावळ शहरात सध्या सहा गॅस एजन्सी कार्यरत असून कुठेही अनुचित प्रकार आढळलेला नाही. मात्र नागरिकांना गॅसपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी पोलिसांनी आधीच खबरदारीचा उपाय म्हणून ही बैठक घेतली, असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

### अफवांवर विश्वास ठेवू नका...

दरम्यान, गॅस टंचाईबाबत पसरवल्या जाणाऱ्या अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात आले. शहरात गॅस पुरवठा पारदर्शक व सुरळीत पद्धतीने व्हावा, हा या बैठकीचा मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.